CMYK




धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची आज तिथीनुसार पुण्यतिथी

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

## आजचा सामना




मुंबई इंडियन्स वि. गुजरात टायटन्स

वेळ : रात्री ७.३० वाजता

ठिकाण : नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबाद

सोलापूर | शनिवार, २९ मार्च २०२५ | युगाब्द ५१२६ | वर्ष ४१ वे अंक १४० | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

हीआमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com epaper.
dainiktarunbharat.com

# म्यानमार, थायलंड भूकंपाने हादरले

**७.७ तीव्रतेचा धक्का, म्यानमारमध्ये १४४ मृत्यू तर ७३२ जखमी**

## इमारती पत्त्यासारख्या कोसळल्या, हजारो मलब्याखाली; तर शेकडो बेपत्ता

## थायलंडमध्ये आणिबाणी घोषित, भारतासह पाच देशांमध्ये हादरे

**नेपिता, २८ मार्च**

**शुक्रवारी सकाळी ११ वाजून ५० मिनिटांनी भारताचे शेजारी म्यानमारसह थायलंडला भूकंपाचा जोरदार धक्का बसला. ७.७ इतक्या तीव्रतेच्या धरणीकंपाने अनेक इमारती पत्त्याच्या बंगल्यासारख्या कोसळल्या. म्यानमारमध्ये प्रचंड नुकसान झाले असून १४४ जणांचा मृत्यू झाला तर ७३२ जण गंभीर जखमी झाले. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. भारत, बांगलादेश आणि चीनच्या काही भागालाही हादरे बसले.**



शुक्रवारी आलेल्या शक्तिशाली भूकंपाने बँकॉकमधील अनेक इमारती भुईसपाट झाल्या. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी भूकंपाच्या धक्क्यानंतर कोसळत असलेली इमारत सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाली. अवघ्या काही क्षणात इमारत जमीनदोस्त झाली

म्यानमारमध्ये १४४ जणांचा मृत्यू झाला, तर येथे ७३२ जण जखमी झाले. त्याच वेळी, थायलंडची राजधानी बँकॉकमध्ये बांधकाम सुरू असलेली ३० मजली इमारत कोसळली. या ठिकाणी ४०० लोक काम करत होते. यापैकी ८० लोक बेपत्ता आहेत, तर ३ जणांचा मृत्यू झाला आहे. भूकंपामुळे मंडाले शहरात बांधलेली बांधलेली मंदिरे आणि अनेक घरे उद्ध्वस्त झाली. म्यानमारमधील ऐतिहासिक राजवाडा असलेल्या मंडाले पॅलेसच्या काही भागाचे नुकसान झाले. त्याचवेळी भूकंपात सागाइंग प्रदेशातील सागाइंग टाऊनशिपमधील एक पूल पूर्णपणे उद्ध्वस्त झाला.

म्यानमारशिवाय बँकॉकमधील अनेक इमारतींचेही मोठे नुकसान झाले आहे. बांधकामाधीन काही इमारती क्षणार्धात भंगाराचे ढीग बनल्या. भूकंपामुळे पूल, मोठ्या इमारतींचे अतोनात नुकसान झाले असून रस्तेही खचले आहेत. रस्त्यांवर मोठमोठ्या भेगा पडल्याने वाहतूक खोळंबली आहे. लोक रस्त्यांवर चालण्यासही घाबरत आहेत. या पाच देशांच्या वेगवेगळ्या भागात शेकडो लोक घाबरून घरे आणि कार्यालये सोडून पळून गेले. मोठ्या प्रमाणात झालेल्या विद्ध्वंसामुळे थायलंडचे पंतप्रधान पिथोंगटार्न शिनावात्रा यांनी आणीबाणी जाहीर केली आहे.

(वृत्तसंस्था)

### भारत सर्वतोपरी मदत करण्यास तयार : मोदी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या एक्स खात्यावर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, म्यानमार, थायलंड, बांगलादेशात आलेल्या भूकंपामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे अतिशय दुःख झाले आहे. तेथील नागरिक सुरक्षित राहावे अशी प्रार्थना करतो. भारत भूकंप पीडितांना सर्वतोपरी मदत करण्यासाठी तयार आहे. मी प्रशासनाला सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाला म्यानमार आणि थायलंडमधील सरकारच्या संपर्कात राहण्याच्या सूचना दिल्या असल्याचे ते त्यांनी म्हटले आहे.

### कुठे घडले

यूएस जिओलॉजिकल सर्व्हे आणि जर्मन रिसर्च सेंटर फॉर जिओसायन्सेस नुसार, मध्य म्यानमारमध्ये ७.७ तीव्रतेचा शक्तिशाली भूकंप झाला. भूकंपाचा केंद्रबिंदू सागाईंग शहराच्या वायव्येस १६ किमी (१० मैल) अंतरावर १० किमी खोलीवर होता.

### कुठे परिणाम झाला

म्यानमार, थायलंड, बांगलादेश, भारत आणि नैऋत्य चीनसह ५ देशांमध्ये याचा परिणाम दिसून आला. येथील अनेक भागात जोरदार भूकंपाचे धक्के जाणवले. भारतातील कोलकाता, इंफाळ, मेघालय आणि ईस्ट कार्गो हिलमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले. ढाका, चितगावसह बांगलादेशातील अनेक भागांना ७.३ रिश्टर स्केल तीव्रतेचे भूकंपाचे धक्के बसले. बारा मिनिटांनंतर, म्यानमारमध्ये ६.४ तीव्रतेचा आणखी एक भूकंपाचा धक्का बसला.

### महाभूकंपाचे कारण 'सागांग फॉल्ट'

दोन तीव्र धक्क्यांनी हादरलेल्या म्यानमारमध्ये महाविनाशाचे चित्र दिसत आहे. म्यानमारमध्ये इतक्या तीव्र क्षमतेचा भूकंप का झाला, याचे उत्तर तेथील भूगर्भात दडले आहे. म्यानमारमध्ये जमिनीला बसलेल्या हादऱ्याचे कारण सागांग फॉल्ट आहे. सागांग फॉल्ट म्हणजे जिथे पृथ्वीचे दोन भूभाग एक दुसऱ्यावरून घसरतात. हे घर्षण दरवर्षी ११ एमएम ते १८ एमएम इतके होत असते. दोन्ही भूभाग घसरत राहिल्याने नेहमी भूगर्भात तणाव वाढतो. आता हे भूभाग घसरण्याचा वेग प्रतिवर्ष १८ एमएमपेक्षा अधिक आहे. त्यामुळे अधिक ऊर्जा जमा होत आहे. हीच ऊर्जा मोठ्या भूकंपाच्या स्वरूपात बाहेर पडते. नेमके हेच शुक्रवारी म्यानमारमध्ये घडले.

### भारताने जीर्णोद्धार केलेला 'सुवर्ण पॅगोडा' उद्ध्वस्त

म्यानमारमधील भीषण भूकंपामुळे मंडाले येथील महामुनी पॅगोडा उद्ध्वस्त झाला आहे. २०१६ मध्येही भूकंपामुळे पॅगोडाचे नुकसान झाले होते. भारत सरकारने २०२० मध्ये याच्या जीर्णोद्धारासाठी मदत केली होती. परराष्ट्र मंत्रालयाने हा प्रकल्प पूर्ण केला आहे. हा पॅगोडा म्यानमारमधील प्रमुख तीर्थस्थळ आहे. सायंकाळी येथील दृश्य अतिशय विहंगम असते. त्यामुळे पर्यटकांची कायम गर्दी होते.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या नागपूर दौऱ्यावर

**विविध प्रकल्पांचे उद्घाटन, अभिवादन कार्यक्रम**

**तभा वृत्तसेवा | विशेष प्रतिनिधी**

**मुंबई, दि. २८ मार्च -**

पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी, दि.३० मार्चला महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार असून, नागपुरातील विविध महत्त्वाच्या कार्यक्रमांना उपस्थित राहणार आहेत. मोदी यांच्या हस्ते सोलार डिफेन्स आणि एअरोस्पेस लिमिटेड येथे संरक्षण क्षेत्रातील अत्याधुनिक प्रकल्पांचे उद्घाटन होणार आहे. यामध्ये अनमॅन्ड एरियल व्हेईकल्ससाठी १२५० मीटर लांबीची विशेष धावपट्टी आणि लोइटरिंग म्युनिशन चाचणीसाठी अत्याधुनिक सुविधा राष्ट्राला समर्पित केली जाणार आहे.



तसेच नागपुरातील माधव नेत्रालय प्रीमियम सेंटरच्या विस्तार प्रकल्पाची पायाभरणीही प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत केली जाणार आहे. या प्रकल्पांतर्गत २५० खाटांचे रुग्णालय, १४ बाह्यरुग्ण विभाग आणि अत्याधुनिक १४ ऑपरेशन थिएटर उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे नागपूर आणि विदर्भातील नागरिकांना जागतिक दर्जाच्या नेत्रचिकित्सा सुविधा उपलब्ध होणार आहेत. मोदी दीक्षाभूमी येथे जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करणार आहेत. तसेच, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या 'प्रतिपदा' कार्यक्रमानिमित्त स्मृती मंदिराला भेट देऊन संघ संस्थापकांना अभिवादन करतील.

## 'ज्ञानेश्वर माऊली' दिंड्यांचे यंदा पंढरपूरकडे एकत्रित प्रस्थान

**अहिल्यानगर, दि. २८ मार्च-**

देहु आळंदीप्रमाणेच, संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिलेल्या ठिकाणाहून, नेवासा येथून परिसरातील सर्व दिंड्यांचा एकत्रित, ज्ञानेश्वर माऊलीचा यंदाच्या आषाढीला पालखी सोहळा निघणार असून यामुळे नेवासा तीर्थक्षेत्रास मोठे वैभव प्राप्त होईल, यासाठी सर्व संत महात्म्यांनी सहकार्य करण्याचे आवाहन ज्ञानेश्वर मंदिर देवस्थानचे विश्वस्त हभप देविदास महाराज म्हस्के यांनी केले. ज्ञानेश्वरी लिखाणस्थान संत ज्ञानेश्वरांची कर्मभूमी आणि वारकरी संप्रदायाची जन्मभूमी असलेल्या नेवासा येथील पैस खांबाला वारकरी संप्रदायामध्ये सर्वात मोठे स्थान आहे. या ठिकाणी महाराष्ट्रासह भारतातील वारकरी वर्षातून एकदाका होईना येऊन पैस चरणी नतमस्तक होतात. एकट्या नेवासा तालुक्यातून ११९ गावातून सुमारे १३० दिंड्या पंढरपूरकडे रवाना होतात.

# कठुआत ५ अतिरेक्यांचा खात्मा

**चार जवान हुतात्मा**

**जम्मू, २८ मार्च**

जम्मू-काश्मीरमधील कठुआमध्ये झालेल्या चकमकीत पाच दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात सुरक्षा दलाला यश मिळाले. त्याचवेळी अतिरेक्यांशी लढताना सुरक्षा दलाचे चार जवान हुतात्मा झाले. ठार झालेले सर्व दहशतवादी जैश-ए-मोहम्मदशी संबंधित असून त्यांच्याकडून शस्त्रसाठा जप्त करण्यात आला.

एका लष्करी अधिकाऱ्याने सांगितले की, देशाच्या सीमेत अतिरेकी घुसल्याची माहिती मिळाल्यानंतर मागील सहा दिवसांपासून त्यांचा शोध सुरू होता. कठुआ जिल्ह्याच्या सोपियान भागात अतिरेकी लपून असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिस आणि सीआरपीएफने परिसराला घेराव घालत मोहीम सुरू केली. मागील सहा दिवसांपासून अतिरेक्यांसोबत चकमक सुरू होती. गुरुवारी राजबागच्या घाटी जुथाना येथील जाखोले गावाजवळ तीन दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात यश आले. त्याचवेळी अतिरेक्यांशी लढा देताना तीन जवान हुतात्मा झाले. शुक्रवारी मोहीम सुरू असताना दोन अतिरेक्यांचा खात्मा करण्यात आला, तर एक जवान शहीद झाला. मारल्या गेलेल्या अतिरेक्यांकडे अत्याधुनिक शस्त्रे आणि दारूगोळा होता.

(वृत्तसंस्था)

# बंगळुरूने १७ वर्षांनंतर चेन्नईला चेपॉकमध्ये हरवले

**चेन्नई, दि. २८ मार्च -**

रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरुने चेन्नई सुपर किंग्जचा शुक्रवारी झालेल्या सामन्यात ५० धावांनी पराभव केला. एम ए चिंदबरम स्टेडियमवर १७ वर्षानंतर त्यांनी हा विजय मिळविला.

चेन्नईने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला पण त्यांना सामना जिंकता आला नाही. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने त्यांच्याच बालेकिल्ल्यात चेन्नई सुपर किंग्जचा पराभव केला. चेपॉक येथे आरसीबीने सीएसकेला ५० धावांनी हरविताना रजत पाटीदार यांच्यानंतर जोश हेझलवूडने आपली जादू दाखवली. आरसीबीचा कर्णधार रजत पाटीदारने ५१ धावा केल्या. फिल साल्ट ३२ धावा, विराट कोहली ३१ धावा आणि पडिकल २७ धावा करून बाद झाले. चेन्नईकडून नूर अहमदने ३ आणि पाथिरानाने २ विकेट घेतल्या.




## केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात २% वाढ

**नवी दिल्ली, दि. २८ मार्च -**

केंद्रीय कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या महागाई भत्त्यात (डीए) २% वाढ करण्यात आली आहे. शुक्रवारी (२८ मार्च) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत महागाई भत्ता वाढीचा निर्णय घेण्यात आला. यापूर्वी जुलै २०२४ मध्ये सरकारने त्यात ३% वाढ केली होती.

या वाढीमुळे, आठव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीपूर्वी महागाई भत्ता ५३% वरून ५५% पर्यंत वाढेल. याचा फायदा सुमारे ५० लाख केंद्रीय कर्मचारी आणि ६५ लाख पेन्शनधारकांना होईल. दर ६ महिन्यांनी डीए वाढतो. वाढलेला महागाई भत्ता १ जुलैपासून लागू होईल. म्हणजेच कर्मचाऱ्यांना ३ महिन्यांची थकबाकी मिळेल. महागाई भत्ता म्हणजे महागाई वाढली तरी सरकारी कर्मचाऱ्यांचे राहणीमान राखण्यासाठी दिले जाणारे पैसे. हे पैसे सरकारी कर्मचारी, सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचारी आणि पेन्शनधारकांना दिले जातात.

# ६४ लाख शेतकऱ्यांना २,५५५ कोटींची विमा नुकसान भरपाई

**कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांची माहिती**

**मुंबई, २८ मार्च**

राज्यातील ६४ लाख शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय शासनाने घेतला असून, त्यांच्या खात्यावर थेट २ हजार ५५५ कोटी रुपये विमा नुकसान भरपाई जमा होणार आहे. शासनाने विमा कंपन्यांना देय असलेला प्रलंबित राज्याचा हिस्सा अनुदान म्हणून २ हजार ८५२ कोटी वितरित करण्यास मान्यता दिली असल्याची माहिती कृषी मंत्री अॅड. माणिकराव कोकाटे यांनी दिली.

या निर्णयामुळे मागील विविध हंगामांतील प्रलंबित नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर थेट जमा होणार आहे.



ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना विमा कंपन्यांना देण्यात आल्या असून, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळणार असल्याचे कोकाटे यांनी सांगितले.

या अंतर्गत खरीप २०२२ आणि रबी २०२२-२३ या हंगामांसाठी २ कोटी ८७ लाख, खरीप २०२३ साठी १८१ कोटी, रबी २०२३-२४ साठी ६३ कोटी १४ लाख आणि खरीप २०२४ साठी २ हजार ३०८ कोटी इतकी नुकसान भरपाई शेतकऱ्यांना वितरित होणार आहे. एकूण २ हजार ५५५ कोटी रकमेचा लाभ राज्यातील ६४ लाख लाभार्थी शेतकऱ्यांना मिळणार आहे.

शासनाने विमा कंपन्यांना निधी वितरित केला असून, नुकसान भरपाईची रक्कम तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होईल. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल, असे कृषी मंत्री कोकाटे म्हणाले.

(तभा वृत्तसेवा)

# भारतासाठी २०२५ वर्ष राहणार सर्वांत उष्ण

**नवी दिल्ली, दि. २८ मार्च-**

यंदा देशात अपेक्षेपेक्षा जास्त उष्णता राहणार आहे. भारतीय हवामान विभागाच्या मते, यावर्षी देशातील उत्तर-पश्चिम राज्यांमध्ये म्हणजेच हरयाणा, पंजाब, राजस्थान, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, उत्तराखंड, दिल्लीमध्ये उष्णतेच्या लाटेच्या दिवसांची संख्या दुप्पट होण्याची शक्यता आहे.

२०२४ हे भारतासाठी सर्वात उष्ण वर्षांपैकी एक होते. गेल्या वर्षी, देशात ५५४ दिवस उष्णतेच्या लाटेचा फटका बसला होता. साधारणपणे, एप्रिल ते जून या कालावधीत सतत ५-६ दिवस उष्णतेच्या लाटा सुरू राहतात, परंतु यावेळी, १० ते १२ दिवसांचे अनेक लूप असू शकतात. तथापि, हवामान खात्याने यावर्षी उष्णतेच्या लाटेचा प्रभाव किती दिवस राहील याची माहिती दिलेली नाही. हवामान शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे की जर उष्णतेच्या लाटेच्या दिवसांची संख्या दुप्पट झाली तर २०२५ हे आतापर्यंतचे सर्वात उष्ण वर्ष असेल. या दिवसात तापमान ५ अंश किंवा सामान्यपेक्षा जास्त राहू शकते. सपाट, डोंगराळ आणि किनारी भागांसाठी उष्णतेच्या लाटेची परिस्थिती निश्चित करण्याचा आधार वेगळा आहे. जर सरासरी तापमान सामान्यपेक्षा ५ अंश सेल्सिअस जास्त असेल तर तो दिवस उष्णतेची लाट अनुभवत असल्याचे मानले जाते.



## कोरटकरला २ दिवसांची पोलिस कोठडी

**कोल्हापूर, दि. २८ मार्च-**

इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना धमकी दिल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या प्रशांत कोरटकरचा पोलिस कोठडीतील मुक्काम वाढला आहे. कोल्हापूर कोर्टाने त्याला २ दिवसांची वाढीव पोलिस कोठडी सुनावली. कोरटकरने फरार असताना कुठे व कसा प्रवास केला? कोणत्या वाहनांचा वापर केला? याचा तपास करण्यासाठी कोठडीची मागणी केली होती.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### मेथवडे येथील सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसीचे स्नेहसंमेलन उत्साहात

**सांगोला, दि. २८ मार्च-**

सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे, ता.सांगोला येथे वार्षिक स्नेहसंमेलन युफोरिया-२ के२५ चे आयोजन करण्यात आले होते. स्नेहसंमेलनाचे उदघाटन व्याख्याते व लोकप्रिय विनोदी कवी प्रा.संदीप जगताप, व्याख्यात्या सोनिया बाबर, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. दिलीपकुमार इंगवले, उद्योजक धनंजय शिंदे, मधुकर फाटे, बाळासाहेब आसबे, संस्था सचिवा सुवर्णा इंगवले, अनिता इंगवले, सह्याद्री संकुलाचे विश्वजित इंगवले, विश्वसृष्टी इंगवले, प्राचार्य डॉ. मनोजकुमार पाटील यांच्या हस्ते सरस्वतीमातेच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून झाले. यावेळी प्रा.संदीप जगताप व सोनिया बाबर यांच्या हस्ते राज्यस्तरीय व विद्यापीठ स्तरीय परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या, विविध क्रीडा स्पर्धेत व विविध सांस्कृतिक दिनामध्ये क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांचा तसेच प्रा.डॉ. ए.एम.तांबोळी, डॉ.एस. एम.मोरे, प्रा.एस. एस.काळे, डॉ.एन.ए.तांबोळी, प्रा.भारत गरंडे, डॉ. सुनयना माळी यांचा पेटंट तसेच पुस्तक लिहिल्याबद्दल व पुरस्कार मिळवल्याबद्दल सत्कार करण्यात आला. सूत्रसंचलन आदित्य कम्बीरे, स्नेहल लोकरे, प्राची पाटील, स्नेहल म्हारनूर, स्वाती बर्गे, रिहांन डोंगरी, प्रीती कारंडे, दीपाली पारेकर, रजनी गव्हाणे, नियती काटकर, नम्रता काळे, वैष्णवी शिंदे, भारती मोटे, प्राजक्ता रोकडे, मयुरी वाघ, रिया बनकर, सृष्टी चौगुले, सानिका मदने यांनी केले. आभार प्रा.एस.पी. जोकार यांनी मानले. स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी प्रा.ए.आर.पवार यांचे योगदान लाभले.कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी नाटक, सोलो डान्स, ग्रुप डान्स, गीत गाणे, फिश पॉन्ड, थरारक समूह नृत्य, रेखीव असा फॅशनशो, लावणी सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

### गडकिल्ले संवर्धनासाठी शासनाने लक्ष घालावे : शिवशंभू प्रिया जांभळे

**बार्शी, दि. २८ मार्च-**



महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवराय यांनी निर्माण केलेले स्वराज्य हे सतत तरुणपिढीला उर्जा देणारे आहे. शिवारायांची ऐतिहासिक संपत्ती गडकिल्ले यांचे सुध्दा संवर्धन होणे गरजेचे आहे. गडकिल्लयांच्या माध्यमातून छत्रपती शिवरायांच्या आठवणी अजूनही आपल्यात जिवंत आहेत. शिवरायांचा इतिहास किती जाज्वल्य होता हे कायम आपल्याला गडकिल्ले शिकवत राहतात, पण आज गड किल्लयांच्या संवर्धनासाठी सुध्दा शासनाने पुढाकार घेतला पाहिजे आणि गडकिल्लयांचे संवर्धन झाले पाहिजे, अशी मागणी आंतरराष्ट्रीय स्वाभिमानी मराठा महासंघाच्या भारत राष्ट्रीय उपाध्यक्ष महिला आघाडी शिवशंभू प्रिया जांभळे यांनी केली आहे. पुरातत्व विभागाने सुध्दा गडकिल्ले संवर्धनासाठी प्रयत्न करावे आणि शिवप्रेमींना न्याय द्यावा, आंतरराष्ट्रीय स्वाभिमानी मराठा महासंघाचे शिष्टमंडळ लवकरच महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांची भेट घेऊन गडकिल्ले संवर्धनाचे निवेदन देणार आहे. गडकिल्ले संवर्धन झाल्यास शिवरायांचा इतिहास आपल्यामध्ये कायम उर्जा निर्माण करत राहिल, अशी शिवप्रेमींची धारणा आहे. ही शिवप्रेमींची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पूर्ण करावी असे मत आंतरराष्ट्रीय स्वाभिमानी मराठा महासंघाच्या राष्ट्रीय महिला आघाडी उपाध्यक्ष शिवशंभू प्रिया जांभळे यांनी व्यक्त केले.

### जयहिंद करिअर ॲकॅडमीचा उद्या शुभारंभ

**बार्शी, दि. २८ मार्च-**

जयहिंद उद्योग समूह सामाजिक जाणिवेतून जयहिंद करिअर ॲकॅडमी व अभ्यासिकेचा शुभारंभ रविवार दि. ३० मार्च रोजी सकाळी ११ वाजता जय हिंद हाऊस, तिसरा मजला, कोटणीस नगर विजापूर रोड सोलापूर येथे गुढीपाढव्याच्या शुभ मुहुर्तावर करण्यात येणार आहे, अशी माहिती संचालक समर्थ माने यांनी पत्रकार परिषदेत दिली. या अभ्यासिकेचे उद्घाटन बब्रुवान माने - देशमुख, गुरूशांत भतगुणकी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. शालेय जीवनापासूनच विविध स्पर्धा परिक्षा तयारी करणे, अत्यंत गरजेचे आहे. स्पर्धा परिक्षेतून मुलांचे उत्तम करिअर होऊ शकते. विद्यार्थ्यांना शाळा महाविद्यालयासोबत स्पर्धा परिक्षा तयारी मार्गदर्शन व शांत अभ्यासिकेसाठी सोलापूरमध्ये आय.ए.एस. व आय.पी. एस. फाउंडेशन प्रशिक्षण देणारी संस्था म्हणून जयहिंद करिअर ॲकॅडमी कार्यरत आहे. इ. १० वी व १२ वी परिक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन व फाउंडेशन कोर्स सोमवार दि. ३१ मार्च पासून सकाळी ९ वाजता व सायंकाळी ६ वाजता सुरुवात होत असून, याचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन काशिनाथ भतगुणकी यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस माजी सैनिक तुकाराम राठोड उपस्थित होते.

### हिंदू नववर्ष समितीतर्फे अक्कलकोटमध्ये उद्या शोभायात्रा

**अक्कलकोट, दि. २८ मार्च-**

हिंदू नववर्ष महोत्सव समितीतर्फे रविवारी ३० मार्च रोजी अक्कलकोट शहरात भव्य शोभायात्रा काढण्यात येणार असून या शोभा यात्रेची तयारी समितीच्या वतीने करण्यात येत आहे. या शोभायात्रेत हिंदू बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन समितीचे प्रमुख आनंद खजूर्गीकर आणि सहप्रमुख ऋषिकेश लोणारी यांनी केले आहे. ही शोभायात्रा ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन मंदिर येथून दुपारी ४.३० वाजता निघणार आहे. शोभायात्रेत विशेष सजीव देखावा, भारतमाता प्रतिमा असणार आहे. श्री महात्मा बसवेश्वर महाराज, छत्रपती श्री शिवाजी महाराज, बाल श्री संभाजी महाराज आणि मावळे असा सजीव देखावा असणार आहे. याशिवाय हिंदू समाजातील सर्व देवतांची चित्रे तसेच वेशभूषा केलेली आणि सजवलेल्या बग्गीत बसलेली मुले असणार आहेत. महिला सक्षमीकरणासाठी लाठी काठी प्रदर्शन, भरतनाट्यम सादर करण्यात येणार आहे. रुद्र पठण, महिला भजन मंडळ, हरीभजन, लेझिम व ढोल पथकही सहभागी होणार आहे. तसेच आकर्षक रांगोळीने सजावट केली जाणार असून विविध वाद्यासमवेत ही शोभा यात्रा निघणार आहे. यंदाच्या शोभायात्रेत शहरातील सर्व गणेशोत्सव, नवरात्रोत्सव मंडळ सहभागी होणार आहेत. याबाबत तम्मा शेळके, गुंडू अण्णा येळमेली, संतोष वग्गाले, चेतन जाधव, संजय भागानगरे हे बैठका घेत आहेत. या शोभायात्रेमध्ये महिला मंडळ मोठ्या प्रमाणात सहभागी होण्याबाबत वीरशैव लिंगायत मंडळाच्या प्रमुख मल्लंमा पसारे, सुवर्णा साखरे, लक्ष्मी आचलेरसह अन्य महिला मंडळाच्या वतीने जनजागृती करण्यात येत आहे. ही शोभायात्रा विजय चौक, कारंजा चौक, मेन रोड, तूप चौक, फत्तेसिंह चौक, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या पटांगणात विसर्जित होईल.

# पंढरपूर बाजार समितीमध्ये बेदाण्यास विक्रमी ७०१ रुपयांचा दर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२८ मार्च -**



पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये मंगळवारी (ता.२५) बेदाणा शेतीमालाची रू.७०१/- प्रति किलो या उच्चांकी दराने विकी झाल्याची माहिती बाजार समितीचे सभापती हरिष गायकवाड आणि उपसभापती राजुबापू गावडे यांनी दिली.

सभापती गायकवाड यांनी सांगितले की, पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती दर मंगळवारी आणि शनिवारी दुपारी एक वाजता बेदाण्याचे होत असतात. या सौद्याच्या वेळी मंगळवारी (ता.२५) बेदाण्याला प्रतिकिलो ७०१ रुपये इतका उच्चांकी दर मिळाला. या दिवशी बेदाण्याला रू.५० ते रू.७०१/- व सरासरी २५०/- प्रति किलो दर निघाला. बेदाण्याची सुमारे २६७ गाडीची आवक होवून बेदाणा २४० गाडीची विकी झाली. या सौद्यामध्ये एकुण ६७ कोटी रूपयांची उलाढाल बाजार समिती मध्ये झाली.

दरम्यान येथील बाजार समिती मध्ये बेदाणा आवक चांगली असुन खरेदीदार व्यापारी मोठया संख्येने येत आहेत. व्यापारी मोठ्या प्रमाणावर माल खरेदीसाठी येत आहेत. आवक चांगली असुन, दर चांगला मिळत असल्याने शेतकरी माल विक्रीसाठी पंढरपूर बाजार समितीस प्राधान्य देत आहेत. शेतकरी बंधुंनी जास्तीत-जास्त माल विकी साठी पंढरपूर बाजार समितीमध्ये आणावा.

**शेतकऱ्यांचे मानले आभार :** बाजार समिती मध्ये मंगळवारी (ता.२५) पार्श्वनाथ ट्रेडर्स प्रो.स्वप्नील कोठाडिया यांचे आडत दुकानी अभिजीत राजेंद्र डोंगरे (रा. आष्टी ता.मोहोळ) यांच्या बेदाण या शेतीमालास रू. ७०१/- प्रती किलो उच्चांकी दर मिळाला. हा माल खरेदीदार मनोहर सारडा यांनी उच्चांकी दराने खरेदी केला अशी माहिती बाजार समितीचे सभापती हरिष गायकवाड व उपसभापती राजुबापू गावडे यांनी दिली. शेतकरी अभिजीत राजेंद्र डोंगरे (रा.आष्टी ता. मोहोळ ) व आडते स्वप्नील कोठाडिया, यांचे जिल्हयाचे माजी आमदार प्रशांत परिचारक, बाजार समितीचे सभापती हरिष गायकवाड व युटोपियन शुगर्सचे चेअरमन उमेश परिचारक यांनी शेतकरी व आडते, व्यापारी यांचे कौतुक केले. यावेळी सभापती गायकवाड यांनी उच्च प्रतीचा माल बाजार समितीमध्ये विक्रीस आणल्याबद्दल शेतकरी यांचे आभार व्यक्त केले.

सोलापूर जिल्हयाचे माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली पंढरपूर बाजार समितीचे कामकाज उत्तम प्रकारे चालु आहे. तसेच बेदाणा सौद्यासाठी युटोपियन शुगर्सचे चेअरमन उमेश परिचारक यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभते. असे सभापती हरिष गायकवाड व उपसभापती राजुबापू गावडे यांनी सांगीतले. यावेळी बेदाणा असोसिएशनचे अध्यक्ष व बाजार समितीचे संचालक सोमनाथ डोंबे, यासीन बागवान, महादेव लवटे, महादेव बागल व अन्य संचालक आडते, व्यापारी, तसेच बाजार समितीचे अधिकारी, कर्मचारी आदी उपस्थित होते.



## सांगोला महाविद्यालयात वादविवाद स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २८ मार्च-**

सांगोला महाविद्यालय येथे राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा उत्साहात पार पडल्या.

या स्पर्धेसाठी सांगोला, पंढरपूर, अकलूज, कणकवली या भागातून पाच संघ सहभागी झाले होते. स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी संस्था सदस्य सुरेश फुले, कार्यक्रमाचे अध्यक्ष प्र. प्राचार्य डॉ.सुरेश भोसले, परीक्षक संजय माळी, उन्मेष आटपाडीकर, सागर पाटील उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र लोकशाहीस तारक की मारक या विषयावर विचारमंथन केले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ.विजयकुमार गाडेकर यांनी तर निकाल वाचन प्रा.प्रसाद लोखंडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.विशाल कुलकर्णी यांनी तर आभार प्रा.संतोष लोंढे, प्रा. समाधान माने यांनी मानले. स्पर्धा पार पाडण्यामध्ये डॉ. मालोजी जगताप, डॉ. खानापुर यांचे सहकार्य केले.

स्पर्धेमध्ये सांगोला महाविद्यालय प्रथम, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर व्दितीय तर शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज यांनी तृतीय तसेच सर्वोत्कृष्ट वक्ता म्हणून पंढरपूरच्या मोनाली पाटील (मारक बाजू) तर कणकवलीच्या शुभम खरात (तारक बाजू) यांनी पारितोषिक पटकावले. अकलूजच्या वैष्णवी खंडागळे, इफत शेख यांनी उत्तेजनार्थ वैयक्तिक क्रमांक पटकावला.

## जैनवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी शोभा नेताजी गोफणे बिनविरोध

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२८ मार्च-**



पंढरपूर तालुक्यातील जैनवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी शोभा नेताजी गोफणे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना ॲड. दिपक पवार यांनी नूतन सरपंच यांचे अभिनंदन केले व त्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी अध्यासी अधिकारी आर.ए. शिंदे, ग्राम महसूल अधिकारी संदीप शिनगारे, ग्राम पंचायत अधिकारी अविनाश ढोपे, उपसरपंच कल्पना शिंगटे, ग्रामपंचायत सदस्य मधुरा पवार, कल्पना माने, रुक्मिणी गोफणे, संगिता गोफणे, हणमंत सोनवले, अशोक सदलगे आदींसह तसेच, महादेव लिंगडे, किरण दानोळे, दिनेश मिरजे, नेताजी गोफणे, विलास गोफणे, मोहन माने, हिम्मत हसुरे, विजय साळवे, संजय गोफणे, मच्छिंद्र गोफणे, पांडुरंग जमदाडे, गणेश जमदाडे, चंद्रप्रभू मिरजे, दत्तात्रय सुतार, बाबासो दानोळे, कुमार शिंगटे, शिवाजी पवार, रमेश इंगोले, सुभाष पवार, जालिंदर गोफणे, धनाजी गोफणे, अनिल शिंदे, बाळासो जमदाडे, बाळासो पवार, सुकुमार मिरजे, मल्हारी गोफणे, सुरेश भोसले, मनोज मिरजे, कुमार पवार, सत्यवान गोफणे, गणपतराव दासरे, सुहास पवार उपस्थित होते.

● फसवणूक करुन जागा बळकविल्याचे प्रकरण

## पंढरपुरातील ६ जणांविरुध्द वृध्द महिलेची तक्रार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२८ मार्च -**

जागा खरेदी करताना मुळ मालकाने जागा खरेदीदाराला जागे संदर्भातील पूर्वी झालेल्या कराराची माहिती देवूनही जागा खरेदीराने त्याचे पालन न करता पूर्वीच्या करारानाम्याला फाटा देत करारामध्ये नमूद असलेल्या कुटुंबाच्या परस्पर त्यांच्या हिश्याची जागा बळकाविल्या प्रकरणी मधुवंती निरंगुदीकर (रा.करंदीकर बंगला, पंढरपूर, वय ७५) या ज्येष्ठ नागरिक महिलेने संबंधित खरेदीदार, त्याची पत्नी, त्याचा मुलगा, त्याचा पुतण्या आणि अन्य दोन अनोळखी व्यक्ती अशा सहा जणांविरुध्द येथील शहर पोलिस ठाण्यात फसवणूक केल्याची तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार पोलिसांनी फसवणूकी बरोबरच विविध कलमान्वये राजेश घोगरदरे व अन्य पाच जणांविरुध्द गुन्हा दाखल केलेला आहे.

विशेष म्हणजे कोर्टाच्या आदेशान्वये या ज्येष्ठ महिलेची तक्रार शहर पोलिसांनी दाखल करुन घेतली असून त्याच्या तक्रारीनुसार शहर पोलिसांनी संबंधित फसवणूक करुन जागा खरेदी केलेला खरेदीदार व त्याच्या इतर पाच साथीदारां विरुध्द फसवणूकीचा व इतर विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

या संदर्भात संबंधित ज्येष्ठ महिलेने शहर पोलिस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारी मध्ये म्हटले आहे की, मी मधुवंती येथे सन १९६९ पासून वास्तव्यास असून माझे सासरे १९५७ सालापासून येथेच वास्तव्यास होते. माझ्या पतींचे २०२०मध्ये कोरोना काळात पुणे येथे निधन झाले. माझ्या दोन्ही मुली पुणे येथेच असल्याने मी एकटीच करंदीकर बंगल्यात राहत आहे. सदर बंगला मूळ मालक करंदीकर यांनी कमलाकर कुलकर्णी यांना खरेदी देताना आम्ही राहत असलेली जागा माझ्या पतीच्या म्हणजे नंदन निरंगुदीकर यांच्या नावे करण्याचे असता कुलकर्णी यांनी लेखी कराराद्वारे नंतर करण्याचे आश्वासन देऊन सदर जागा आमच्याच कब्जात ठेवली आहे. त्यानंतर आम्हाला कोणतीही कल्पना न देता राजेश घोगरदरे यांनी ती विकत घेतली आणि त्यानंतर मी एकटीच असल्याचा गैरफायदा घेत मला राहत्या जागेतून हुसकावून लावण्यासाठी प्रचंड त्रास म्हणजे घरात जाऊ न देण्यासाठी धमकी देणे, धक्काबुक्की करणे, अंगावर कुत्री सोडणे यासारखे कृत्ये करू लागला आणि वहिवाट बंद करण्यासाठी घरासमोर भिंतच बांधली. इतकेच नाही तर मी राहते त्या घरच्या भिंती पाडून मी आयुष्यभर पै पै करून जमवलेला संपूर्ण प्रापंचिक वस्तू आणि संसाराची देखील विल्हेवाट लावली आहे.

**पालकमंत्र्यांसमोर करणार अन्नत्याग**

दरम्यान आपणाला योग्य तो न्याय पोलिसांनी मिळवून द्यावा अन्यथा पालक मंत्र्यांसमोर देखील आपण अन्न त्याग उपोषण करणार असल्याचा इशारा देखील मधुवंती निरंगुदीकर या ज्येष्ठ महिलेने दिला आहे.

## दिगंबर मुनिनाथ महाराज पुण्यतिथीनमित्त उत्सव समितीचे पदाधिकारी जाहीर

**▶▶ अध्यक्षपदी विक्रम कास्मपुरी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

येथील श्री दिगंबर मुनिनाथ महाराज यांच्या ४९ व्या पुण्यतिथी उत्सव समितीचे पदाधिकारी जाहीर करण्यात आले. श्री दिगंबर मुनिनाथ सांस्कृतिक मंडळाच्या अधिपत्याखाली कुचन नगर येथील सुशीलम्मा मठ येथे ३० मार्च ते ६ एप्रिल या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

उत्सव समिती पदाधिकारी असे; अध्यक्ष-विक्रम कास्मपुरी, उपाध्यक्ष-नागार्जुन कुसुरकर, सचिव-ॲड. मुनिनाथ कारमपुरी, खजिनदार-अक्षय चिलवेरी, पूजा प्रमुख-श्रीकांत कुसुरकर, भजन प्रमुख बालाजी कोटा. सल्लागार-विष्णु कारमपुरी, श्रीनिवास कुसुरकर, नागनाथ कारमपुरी, दशरथ नंदाल, विष्णू चिलका. यावेळी नागनाथ कारमपुरी, व्यंकटेश कैरमकोंडा, रमेश सुंचू, सदानंद पिस्का, विठ्ठल कुऱ्हाडकर, यमुना पिस्का, रेणुका येरगुंटला, अनुसया कारमपुरी, सुनीता चिलवेरी, सुनीता कारमपुरी, रेखा म्हंता, कौशल्या कुसुरकर, सुनंदा कुसुरकर, कलावती कुसुरकर यांच्यासह श्री दिगंबर मुनिनाथ महाराज साधक मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एसपीएममध्ये किर्लोस्कर कंपनीचा कॅम्पस ड्राईव्ह

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**




एस.पी.एम. पॉलिटेक्निक, कुमठे येथे किर्लोस्कर फेरस इंडस्ट्री लिमिटेड सोलापूर या नामांकित कंपनीचा पूल कॅम्पस ड्राईव्ह पार पडला. सदर ड्राइव्ह मध्ये जिल्ह्यातील विविध पॉलिटेक्निक महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी किर्लोस्कर फेरस इंडस्ट्री लिमिटेडचे एचआर हेड ऋषिकेश कुलकर्णी, सिनियर मॅनेजर अनंत जाधव, अक्षता पुराणिक, नवीन संगा, संस्थेचे मुख्य विश्वस्त जयकुमार माने आणि विश्वस्त प्रा. स्वाती माने यांची प्रमुख उपस्थिती होत. कार्यक्रमाच्या प्रस्ताविकेत प्राचार्या रोहिणी चव्हाण यांनी पूल कॅम्पस ड्राईव्हच्या आयोजनाचा उद्देश स्पष्ट करताना, विद्यार्थ्यांना नामांकित उद्योगांमध्ये रोजगार संधी उपलब्ध करून देणे हे संस्थेचे प्राधान्य असल्याचे सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना उद्योगांच्या गरजा लक्षात घेऊन कौशल्यसंपन्न बनण्याचा सल्ला दिला.

किर्लोस्करचे एचआर हेड ऋषिकेश कुलकर्णी यांनी कंपनीच्या कार्यपद्धती, औद्योगिक योगदान आणि विद्यार्थीसाठी उपलब्ध संधी याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी किर्लोस्कर ही देशातील एक अग्रगण्य आणि विश्वासार्ह कंपनी असून, इच्छुक आणि मेहनती उमेदवारांसाठी ती उत्तम करिअरची संधी प्रदान करते, असे सांगितले. संस्थेचे मुख्य विश्वस्त जयकुमार माने यांनी अध्यक्षीय भाषण यांनी केले. या कॅम्पस ड्राईव्हच्या यशस्वी आयोजनासाठी एस.पी.एम. पॉलिटेक्निकच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल ऑफिसर प्रा. ज्ञानेश्वर जाधव, प्रा. सोमनाथ थळंगे, प्रा. श्रुती सुतकर, प्रा. प्रशांत पाटील, प्रा. मल्लेश संकुल, समीर जमादार, शैलेश जाधव तसेच सर्व विभाग प्रमुख प्रा. मल्लेशी बगले, प्रा. अनंत चौधरी, प्रा. विवेक राशिनकर आणि प्रा. गिरीजा दीक्षित यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. सविता म्हेत्रे यांनी केले, तर आभार प्रा. ज्ञानेश्वर जाधव यांनी मानले.

## शिवसृष्टीकडून टिळक चौकात गुढी पूजनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ मार्च -**



सोलापूर शहरातील शिवसृष्टी प्रतिष्ठानच्यावतीने रविवार, दि. ३० मार्च रोजी टिळक चौक येथे हिंदू नववर्षानिमित्त गुढी पूजनाचे आयोजन करण्यात आले आहे. चैत्र शुध्द प्रतिपदा म्हणजे गुढी पाडवा. याच दिवसापासून हिंदू नववर्ष प्रारंभ होतो.

हिंदू नववर्ष प्रारंभानिमित्त शिवसृष्टी प्रतिष्ठानच्यावतीने रविवारी सकाळी १० वाजता टिळक चौक येथे गुढी पूजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. पाश्चिमात्य संस्कृतीचे आक्रमण रोखण्यासाठी तसेच हिंदू संस्कृतीचे महत्व आजच्या तरूण पिढीला कळण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष अमोल केकडे यांनी दिली. या कार्यक्रमास हिंदू समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केकेडे यांनी केले आहे.

# एमआयटीसमोर ट्रकला टेम्पोची पाठीमागून धडक एक ठार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

सोलापूर-पुणे महामार्गावरी केगाव येथील एमआयटी कॉलेज समोरील रस्त्यावर समोरील ट्रकला पाठीमागून धडक दिल्याने टेम्पोतील एक जण ठार झाला तर एकजण जखमी झाला. हा अपघात शुक्रवारी पहाटे चार वाजता घडला. आकाश पापा झुंदाळे ( वय २८, रा. अमर नगर, नूतन शाळेजवळ , मुलून कॉलनी, मुंबई) असे अपघातात ठार झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.

सलिम अब्दुल रशीद शेख ( वय ४६, रा. अमर नगर, नूतन शाळेजवळ , मुलून कॉलनी, मुंबई) असे जखमीचे नाव आहे. वरील आकाश आणि सलिम हे मुंबईहून टेम्पो घेऊन सोलापूरच्या दिशेने जात होते. पहाटे ४.३० वाजता ते केगाव परिसरातील एमआयटी कॉलेजसमोरील रस्त्याने जाताना समोरील ट्रकला टेम्पोची धडक बसली. यात दोघेही जखमी झाले. त्यांना जखमी अवस्थेत रुग्णवाहिकेतून शासकीय रुग्णालयात पहाटे साडेपाच वाजता उपचारात दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच आकाश हा मृत्यू पावला तर सलीम शेख हा बेशुद्धावस्थेत आहे. नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.

**९ वर्षिय बालिकेचा विनयभंग करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल**

सोलापूरातील बाळे परिसरात एका ९ वर्षीय बालिकेचा विनयभंग करणाऱ्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीतेच्या नातेवाईकाच्या फिर्यादीवरुन विशाल विजय जाधव (रा. बाळे, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ ऑक्टोबर २०२४ ते २५ मार्च २०२५ या कालावधीत यातील पिडीतेची ९ वर्षाची मुलीचा विशाल जाधव याने घरात कोणी नसताना येऊन तिचा विनयभंग केला. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**कॉट्रॅक्टरला मारहाण करणाऱ्यांवर गुन्हा दाखल**

शहरातील जोडबसवण्णा चौकात कॉट्रॅक्टरला मारहाण करणाऱ्यांवर जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत प्रमोद लक्ष्मण खटके (वय २६, रा. बुधवार पेठ, जुना पूना नाका, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन अकिल बागवान, अरफत बागवान व इतर १० ते १२ जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २६ मार्च रोजी पहाटे तीन ते चार च्या सुमारास जोडबसवण्णा चौकातील राज हॉटेल येथे सार्वजनिक रोडवर अकिल बागवान व अरफत बागवान यांनी व त्याच्या साथीदारांनी मोटारसायकलला लागलेल्या धक्क्यामुळे गर्दी जमवून प्रमोद खटके, पंकज काटकर, सुधाकर पाटील यांना बांबूने व हाताने मारहाण करून शिवीगाळ केली. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक सोनवणे पुढील तपास करीत आहेत.

**दोन दुचाकी चोरीस**

शहराच्या विविध परिसरातून चोरट्याने दोन दुचाकी चोरून नेल्या. महेश विठ्ठल आधेली (वय ३८, रा. भद्रावती पेठ, सोलापूर) यांनी त्यांची एमएच १३ बी झेड ९९८८ क्रमांकाची दुचाकी ही २० मार्च रोजी सायंकाळी घराजवळ हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जेलरोड पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलिस हवालदार नदाफ पुढील तपास करीत आहेत.

दुसऱ्या घटनेत संदीप अनंत केंची (वय ३६, रा. एच ग्रुप, विडी घरकुल, सोलापूर) यांनी त्यांची एमएच १३ बीएस ७१६२ क्रमांकाची दुचाकी ही २१ मार्च रोजी सग्गम नगर येथे हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद एमआयडीसी पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार भांगे पुढील तपास करीत आहेत.

## संक्षिप्त वृत्त



### काँग्रेस पक्षात संघटनात्मक फेरबदल प्रक्रिया; निरीक्षकांच्या अहवालानंतर बदल होणार

**मुंबई दि. २८ मार्च -**

काँग्रेस पक्षाला नवी ऊर्जा आणि बळ देण्यासाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी संघटनात्मक फेरबदलाची प्रक्रिया सुरु केली आहे. या प्रक्रियेचा भाग म्हणून शुक्रवारी काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांची जिल्हानिहाय निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या अहवालानंतर संघटनेत बदल करण्यात येणार आहेत. फेरबदलाच्या या प्रक्रियेत मंडल स्तरापासून प्रदेश पातळीपर्यंत काँग्रेस संघटना मजबूत करण्यासाठी आवश्यक ते बदल केले जाणार आहेत. रिक्त पदावर नियुक्त्या करण्यात येणार आहेत. तसेच जिथे आवश्यक आहे तिथे नवीन चेह-यांना जबाबदारी दिली जाणार आहे. या संदर्भात नियुक्त करण्यात आलेल्या निरीक्षकांची बैठक आज प्रदेश काँग्रेसचे मुख्यालय टिळक भवन येथे प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव बी. एम. संदीप, कुणाल चौधरी, प्रफुल्ल गुडदे पाटील, प्रदेश कार्याध्यक्ष कुणाल पाटील, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन ॲड. गणेश पाटील, मोहन जोशी उपस्थित होते. या बैठकीत प्रांताध्यक्षांनी निरीक्षकांना यासंदर्भात सूचना केल्या. हे सर्व निरीक्षक त्यांना नेमून दिलेल्या जिल्ह्यात जाऊन काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधून १५ दिवसांत प्रदेश काँग्रेसला आपला अहवाल सादर करणार आहेत. त्यानंतर संघटनात्मक फेरबदलांच्या प्रक्रियेला सुरुवात होणार आहे.

### राज्यातील ६४ लाख शेतकऱ्यांना मिळणार २ हजार ५५५ कोटी विमा नुकसान भरपाई

**मुंबई, दि. २८ मार्च-**

: राज्यातील तब्बल ६४ लाख शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला असून, त्यांच्या खात्यावर थेट रु. २५५५ कोटी विमा नुकसान भरपाई जमा होणार आहे. शासनाने विमा कंपन्यांना देय असलेला प्रलंबित राज्य हिस्सा अनुदान म्हणून रु. २८५२ कोटी वितरित करण्यास मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे मागील विविध हंगामांतील प्रलंबित नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर थेट जमा होणार आहे. ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना विमा कंपन्यांना देण्यात आल्या आहेत., शेतकऱ्यांनात्याचा प्रत्यक्ष लाभ मिळणार असल्याचे कृषी मंत्री ड. माणिकराव कोकाटे यांनी सांगितले. या अंतर्गत खरीप २०२२ आणि रब्बी २०२२-२३ या हंगामांसाठी २.८७ कोटी, खरीप २०२३ साठी १८१ कोटी, रब्बी २०२३-२४ साठी ६३.१४ कोटी आणि खरीप २०२४ साठी २३०८ कोटी इतकी नुकसान भरपाई शेतकऱ्यांना वितरित होणार आहे. एकूण २,५५५ कोटी रकमेचा लाभ राज्यातील ६४ लाख लाभार्थी शेतकऱ्यांना मिळणार आहे. शासनाने विमा कंपन्यांना निधी वितरित केला असून, नुकसान भरपाईची रक्कम तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होईल. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मि ळेल, असेही कृषीमंत्री कोकाटे यांनी सांगितले.

### उन्हाळी सुट्टीच्या हंगामात एसटी बसेसच्या रोज ७६४ नवीन फेऱ्या

**मुंबई दि. २८ मार्च -**

उन्हाळ्याच्या सुट्टींमध्ये प्रवाशांच्या सेवेसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत यंदा जादा वाहतूकीसाठी राज्यात दररोज लांब पल्ल्याच्या ७६४ फेऱ्यांचे नियोजन केले आहे. या सर्व फेऱ्या आगाऊ आरक्षणासाठी उपलब्ध केल्या आहेत. दरवर्षी उन्हाळ्याच्या सुट्टीत १५ एप्रिल ते १५ जूनपर्यंत एसटी मार्फत नियोजित फेऱ्या व्यतिरिक्त जादा वाहतूक केली जाते. स्थानिक पातळीवर शटल सेवा आणि जवळच्या फेऱ्या संबंधित आगारातून चालवल्या जातात. परंतु उन्हाळी सुट्टीमुळे परगावी जाणाऱ्या प्रवाशांसाठी लांब पल्ल्याच्या बसेसची मागणी वाढते. त्यासाठी या काळामध्ये शालेय फेऱ्या रद्द करून, त्या ऐवजी लांब पल्ल्याच्या फेऱ्या सुरू केल्या जातात. उन्हाळी हंगाम कालावधीत विभागांकडून प्रवाशी गर्दी होणाऱ्या मार्गावर १५ एप्रिलपासून जादा फेऱ्या टप्याटप्याने सुरु करण्यात येणार आहेत. उन्हाळी हंगामासाठी एसटीच्या मध्यवर्ती कार्यालयमार्फत राज्यातील विविध मार्गावरील ७६४ जादा फेऱ्यांना मंजूरी देण्यात आली असून, या जादा फेऱ्यांव्दारे दैनंदिन ५२१ नियतांव्दारे २.५० लाख किमी चालविण्यात येणार आहे. उन्हाळी जादा फेऱ्या संगणकीय आरक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तरी, प्रवाशांच्या सोयीसाठी रा.प.महामंडळाच्या अधिकृत वेबसाईट .... वर तसेच .. या सकेतस्थळावर व मोबाईल ॲपव्दारे या बरोबरच महामंडळाच्या बसस्थानकांवरील आरक्षण केंद्रावर आगाऊ आरक्षण करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तरी प्रवाशांना उन्हाळ्याच्या सुट्टीतील प्रवासाचे नियोजन करून महामंडळाच्या मार्फत जादा वाहतूक सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन महामंडळाद्वारे करण्यात येत आहे.



१५ एप्रिलपासून जादा गाड्या

### अयाज यांच्या माहे रमजान ध्वनिचित्रफितीचे प्रकाशन

**सोलापूर, दि. २८ मार्च-**

पवित्र रमज़ानचे औचित्य साधुन येथील गायक मोहम्मद अयाज यांच्या माहे रमजान ध्वनिचित्रफितीचे प्रकाशन अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. ऐ मोमीनो उठो माहे रमजान आगया, ये रबका है फ़रमान माहे रमजान आगया, असे या गीताचे बोल असुन हे गीत टि सिरीज़ म्यूजिक कंपनीमधुन प्रसारित करण्यात आले आहे. या गीताचे गायक, संगीतकार, गीतकार स्वता मोहम्मद अयाज आहेत. हे गीत अल्लाह कृपावंत, दयावंत आहे. ब्रह्मांड नायक आहे, तथा या सृष्टिचा निर्माण करता आहे, झोपेतून जागे व्हा आणि अल्लाह ईश्वरच्या चरणी नतमस्तक व्हावं तसेच अल्लाहच्या नावाने रोजा (उपवास) करुन वाईट विचारांचा त्याग करुन एक चांगला माणूस म्हणून जगण्याचा संदेश या गीतातुन मोहम्मद अयाज यांनी सांगितला आहे. समस्त मानवजातीला हे गीत समर्पित म्हणायला हरकत नाही.



# ५६० गोशाळांच्या खात्यात २५ कोटींचे अनुदान

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ऑनलाईन वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २८ मार्च-**

राज्यातील ५६० गोशाळांच्या खात्यात देशी गोवंश परिपोषण योजनेचे २५ कोटी ४४ लाख रुपयांचे अनुदान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने जमा करण्यात आले.

जानेवारी , फेब्रुवारी व मार्च असे ३ महिन्याचे अनुदान आहे. गोशाळांमध्ये ठेवण्यात येणाऱ्या देशी गायींच्या पालनपोषणासाठी प्रती दिन प्रती गाय रु. ५०/- अनुदान योजनेर्गत राज्यातील ५६० गोशाळांमधील ५६ हजार ५६९ गायींसाठी पहिल्या टप्प्यात २५ कोटी ४५ लाख ६० हजार ५०० रुपये इतके अनुदान महाराष्ट्र गोसेवा आयोगामार्फत लाभार्थी गोशाळांना वितरीत करण्यात आले.



महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या या कार्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी आयोगाचे अभिनंदन केले. देशी गोवंश संवर्धन ही काळाची गरज असून, देशी गोवंशाचे संवर्धनामुळे ग्रामीण विकासाचे गतिमान होण्यास मदत होणार आहे. राज्यातील अधिकाधीक गोशाळांना या योजनेचा लाभ देण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे सदस्य, अधिकारी व कर्मचारी प्रयत्नशील असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आयोगाच्या या कार्याला शुभेच्छा दिल्या असून, देशी गोसंवर्धनाला चालना देण्यासाठी गोसेवा आयोगाच्या माध्यमातून देशी गोवंश संवर्धनाचे सुरु असलेले काम प्रशंसनीय आहे. यामुळे देशी गोवंश संरक्षण व संवर्धन होणार असल्याचे, म्हटले आहे. देशी गायींची उत्पादनक्षमता कमी आहे. त्यामुळे त्यांचे संगोपन करणे व्यावसायिकदृष्ट्या किफायतशीर ठरत नाही. तसेच भाकड - अनुत्पादक गायींचे संगोपन करणे पशुपालकांना फायदेशीर ठरत नाही. असे पुशधन गोशाळेत ठेवण्यात येतात. अशा गोशाळांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणी असलेल्या गोशाळेतील गायींना ५०/- रुपये प्रती दिन गोवंश परिपोषण योजना सुरु केली आहे. ही योजना राज्यातील शेकडो गोशाळांना दिलासादायक ठरली असून, यातून आतापर्यंत ५६० गोशाळांना प्रत्यक्ष लाभ देण्यात आल्याचे आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी सांगितले. ऑनलाईन अनुदान वितरण प्रसंगी आयोगाचे अध्यक्ष श्री. मुंदडा, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, आयोगाचे सदस्य आदी मान्यवर उपस्थित होते.

### अशी आहे योजना

महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या गोशाळांतील भारत पशुधन प्रणालीवर नोंद असलेल्या देशी गायींच्या परिपोषणासाठी प्रती दिन अनुदान देय राहिल. अनुदानाची रक्कमः रुपये ५०/- प्रती दिन प्रती देशी गाय

### अनुदान पात्रतेच्या अटी

महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या गोशाळा, गोसदन, पांजरपोळ व गोरक्षण संस्था अनुदानासाठी पात्र. संस्थेस गोसंगोपनाचा कम ीतकमी तीन वर्षाचा अनुभव असावा. गोशाळेत किमान ५० गोवंश असणे आवश्यक. संस्थेतील गोवंशीय पशुधनास ईअर टॅगींग करणे अनिवार्य. ईअर टॅगिंग झालेले गोवंशीय पशुधन अनुदानास पात्र. संस्थेचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे आवश्यक आहे.

# वडिलांचे अफेअरमुळे दिशा सालियनने आत्महत्या केल्याचे क्लोजर रिपोर्टमध्ये नमूद

## फेरतपासामुळे पोलिसांचा अहवाल मागे

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि.२८ मार्च -**

पाच वर्षापूर्वी झालेल्या दिशा सालियान हिच्या मृत्यूप्रकरणी तिच्या वडिलांनी फेर याचिका दाखल केल्याने सत्ताधाऱ्यांनी ठाकरे कुटुंबीयांवरआरोपांचा फैरी होत असतानाच आता आणखी धक्कादायक माहिती समोर आली आहे. दिशाने

वडिलांच्या अफेअरमुळे संबंधिताला द्यावी लागलेली रक्कम व आर्थिक तणावातून आयुष्य संपवल्याचा मालवणी पोलिसांनी क्लोजर रिपोर्टमध्ये नमूद केले होते. कष्टाने कमावलेला पैसा नको त्या बाबींसाठी खर्च होत असल्याने ती मानसिक तणावात होती असे निष्कर्ष काढून पोलिसांनी तपास बंद करण्याबाबत मिळालेला कळविले होते मात्र आता पुन्हा तिच्या वडिलांनी याचिका दाखल केल्याने हा क्लोजर रिपोर्ट मागे घेण्यात आला असल्याचे मुंबई पोलिसातील सूत्रांकडून सांगण्यात आले.

दिशा सालियनचा मृत्यू ८ जून २०२० रोजी झाला होता. त्यानंतर तीन दिवसांनी तिचे पोस्टमॉर्टम झाल्याची नोंद आहे. त्यामध्ये दिशाच्या शरीरावर हाताला, पायाला, छातीवरही जखमा झाल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. दिशाच्या डोक्यावर गंभीर जखम झाल्यामुळेच तिचा मृत्यू झाल्याचं या रिपोर्टमध्ये नमूद करण्यात आलं आहे. तसेच दिशाच्या नाकातून आणि तोंडातून देखील रक्त येत होतं, असं देखील रिपोर्टमध्ये नमूद करण्यात आलं आहे. मात्र तिच्यावरती कुठलाही लैंगिक अत्याचार किंवा बलात्कार झालेला नाही असं रिपोर्टमध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आलं आहे.

वडिलांच्या एका अफेअरमुळे दिशा त्यांना पैसे देऊन देऊन थकली होती. याबाबत दिशाने वडिलांच्या विवाहबाह्य सबंधांबद्दल होणारा पती व अन्य मित्रांनाही सांगितले होते. या गोष्टींमुळेच तणावातून दिशाने आत्महत्या केल्याचा मालवणी पोलिसांचा निष्कर्ष आहे.

याच आर्थिक तणावातून तिने आत्महत्या केल्याचे मालवणी पोलिसांच्या तपासानंतर अहवालात नमूद केले होते. यापूर्वी झालेल्या शवविच्छेदन अहवालामध्येही दिशावर कोणत्याही प्रकारचा अत्याचार झाला नसल्याचे स्पष्टपणे नमूद करण्यात आलं होतं. या अहवालात डोक्याला गंभीर इजा होऊन दिशाचा मृत्यू झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे जवळपास पाच वर्षानंतर पुन्हा याप्रकरणी सतीश शालिनी यांनी फेर तपास करण्याची मागणी केल्याने या प्रकरणाला वेगळे वळण निर्माण झाले आहे. उच्च न्यायालय याबाबत कोणता निर्णय देते ,यावर पुढील दिशा स्पष्ट होणार आहेत.

# माध्यमांमधील शासनविषयक बातम्यांची त्वरित दखल घेतली जाणार

## माहिती व जनसंपर्क प्रधान सचिवांची माहिती

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२८ मार्च -**

नागरिकांच्या तक्रारी आणि सार्वजनिक समस्यांविषयी विविध माध्यमांमधून प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांना त्वरित प्रतिसाद देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने शुक्रवारी महत्त्वपूर्ण परिपत्रक जारी केले आहे. याद्वारे विविध माध्यमातून प्रसिद्ध होणाऱ्या शासनविषयीच्या महत्त्वपूर्ण बातम्यांची दखल घेऊन त्याद्वारे शासनाची कार्यक्षमता वाढवून नागरिकांना अधिक चांगल्या सेवा देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आल्याचे माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव आणि महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी सांगितले.

विविध बातम्यांची शासकीय विभागांकडून तात्काळ दखल घेण्यात येणार आहे. कार्यक्षम सेवा, वितरण यंत्रणा, समस्यांचे जलद निराकरण करणे याकरिता माध्यमांमधून प्रसिद्ध होणारी माहिती तथा बातम्यांची महत्त्वपूर्ण मदत घेता येणार आहे.

माध्यमांशी संवाद वाढविणे,नागरिक-शासन दुवा मजबूत करणे, पारदर्शक संवाद प्रक्रिया राबविणे व नियमित माहितीची देवाण-घेवाण करणे हा उद्देश आहे. हे परिपत्रक म्हणजे पारदर्शक आणि जबाबदार प्रशासनाच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. यामुळे माध्यमांमधून प्रसिद्ध होणारी माहिती आणि बातम्यांची दखल घेऊन त्याद्वारे नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी अधिक प्रभावी यंत्रणा कार्यान्वित होईल, असे सिंह यांनी सांगितले.

# हिंदुत्व भाजपचा डीएनए तर उध्दव ठाकरेंकडे औरंगजेब फॅन क्लबचे नेतृत्व

## बावनकुळे यांचे प्रत्युत्तर

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई,दि.२८ मार्च -**

विधानसभा निवडणुकीत बंटेंगे तो कटंगे चा नारा देणारे भाजपा सौगाते -ए -मोदी नाही तर सौगाते-ए-सत्ता आहे, अशी टीका करणाऱ्या माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर आता भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ते औरंगजेब फॅन क्लबचे नेतृत्व करतात ,असे प्रत्युत्तर दिले आहे.

ठाकरे यांनी गुरुवारी पत्रकार परिषद घेऊन केलेल्या टीकेला एक्सवरून त्यांना प्रत्युत्तर देताना म्हटले आहे की, हिंदुत्व आमच्या डीएनए मध्येच आहे पण उद्धव ठाकरेंनी हिंदुत्वाचा त्याग केला. आणि आता ते औरंगजेब फॅन क्लबचे म्होरक्या झाले आहेत. सत्तेसाठी हिंदुत्वाचा वारसा सोडून काँग्रेसच्या दारात जाऊन बसले. त्यामुळेच जनतेने तुम्हाला घरी बसण्याचे तुमचे आवडते काम दिले. आता हिंदुत्वावर बोलण्याचा तुम्हाला कुठलाही अधिकार उरलेला नाही.

भाजपचा ''सौगात-ए-मोदी'' हा कार्यक्रम नाही, ही विकासाची गॅरंटी आहे. आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने देशाला २४ तास वीज, पाणी, रस्ते, घरं आणि रोजगार दिला. उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्री असताना महाराष्ट्राच्या जनतेला काय दिले? मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीवर असताना ते घरात बसून राहिले आणि स्वतःच्या कार्यकर्त्यांशी नाळ तोडून टाकली. अहोरात्र जनसेवेचा ध्यास घेऊन देशसेवा करणाऱ्या मोदीजींवर बोलण्याची उद्धव ठाकरे यांची पात्रता नाही. गुन्हेगार, बेकायदेशीर अतिक्रमण करणाऱ्या आणि समाजविघातक तत्त्वांना संरक्षण देणाऱ्या प्रवृत्तींचा मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्र फडणवीस कायद्याच्या म ार्गाने व्यवस्थित बंदोबस्त करीत आहेत. पण आता हेच लोकं उद्धव ठाकरेंना का प्रिय झाले आहेत? याची उत्तरं आधी त्यांनी जनतेला द्यावीत. अशी विचारणा केली आहे.



# घंटागाडी कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन

## आर्थिक शोषणाच्या विरोधात महापालिकेत केली निदर्शने

### अन्यथा मक्तेदाराच्या विरोधात उग्र आंदोलन : कामगार नेते जानराव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

महापालिकेच्या घंटागाडीवर काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांनी मक्तेदाराकडून आर्थिक शोषण होत असल्याचा आरोप करत शुक्रवारी काम बंद आंदोलन केले. महापालिका कामगार संघटना कृती समितीचे अध्यक्ष अशोक जानराव यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेत ठिय्या आंदोलन करून निदर्शने केली.

सोलापूर महापालिकेतील घंटागाडी कर्मचाऱ्यांचा किमान वेतनाप्रमाणे पगार काढला जातो. त्यानुसार ही रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा होते पण मक्तेदाराकडून हे पैसे जमा झाल्यावर कर्मचाऱ्यांचे पासबुक घेऊन खात्यावर जमा झालेला पगार काढला जातो व नियमानुसार १३ ते १४ हजार पगार दिला जात असताना त्यातील पैसे काढून कामगारांच्या हाती केवळ ८ हजार ५०० रुपये मक्तेदाराकडून दिले जातात, असा आरोप जानराव यांनी केला. इतकेच नाहीतर कंत्राटी कामगारांची पीएफ, ग्रॅज्युटी फंड, मेडिक्लेम आदींची पगारातून कपात केलेली रक्कम मक्तेदार संबंधित खात्यात जमा करत नाही व स्वतःचा हिस्सा देखील भरत नाहीत.या प्रश्नी महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शुक्रवारी घंटागाडी कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन केले. महापालिकेत येऊन त्यांनी अशोक जानराव यांच्या नेतृत्वाखाली ठिय्या मांडला. यावेळी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यानंतर कामगारांच्या शिष्टमंडळाने जानराव यांच्या नेतृत्वाखाली अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांची भेट घेतली. यावेळी शशिकांत शिरसट यांच्यासह पदाधिकारी व घंटागाडी कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी यासंदर्भात आयुक्तांशी बोलून मंगळवारपर्यंत आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.



### आश्वासनानंतर अखेर आंदोलन मागे

दरम्यान, अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी दिलेल्या आश्वासनानंतर घंटागाडी कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन मागे घेतले. त्यानंतर ते कामावर रुजू झाले, अशी माहिती अशोक जानराव यांनी दिली.पुढील काळात घंटागाडी कर्मचाऱ्यांना किमान वेतनाप्रमाणे पगार आणि इतर लाभ नाही मिळाला तर मक्तेदाराच्या विरोधात उग्र आंदोलन करावे लागेल, असा इशारा कामगार नेते अशोक जानराव यांनी यावेळी दिला.

# मंत्रालयात ऑनलाईन ॲपद्वारे मिळणार प्रवेश

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २८ मार्च-**

मंत्रालय सुरक्षा प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पातंर्गत पहिल्या टप्प्यात चेहरा ओळख आधारित प्रवेश प्रक्रिया कार्यान्वीत करण्यात आली. तसेच टप्पा - २ अंतर्गत प्रवेशासाठी व्हीजीटर मॅनेजमेंट सिस्टीम प्रणाली विकसित करण्यात आली आहे. मंत्रालयात क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, अभ्यागत यांना यापुढे कोणत्याही काम ाकरीता प्रवेश हवा असल्यास त्यांना 'डिजीप्रवेश' या ऑनलाईन ॲप आधारित प्रणालीद्वारे मंत्रालयात प्रवेश मिळणार आहे.

अभ्यांगतांना मंत्रालयाच्या ज्या विभागात कामानिमित्त प्रवेश आवश्यक आहे. केवळ त्यांना दिलेल्या वेळेत आणि अनुज्ञेय असलेल्या म जल्यावरच प्रवेश करावा. अनधिकृत मजल्यावर प्रवेश केल्यास अभ्यागत कारवाईस पात्र राहतील.




अभ्यागतांनी संबंधित विभागातील आपले काम पूर्ण झाल्यावर विहीत वेळेत मंत्रालयातून बाहेर पडावे. ज्येष्ठ नागरीक व दिव्यांग अभ्यागतांना रांगेत उभे राहण्यामुळे होणारा त्रास विचारात घेता त्यांना दुपारी १२ वाजता प्रवेश देण्यात येईल. तर दुपारी १२ नंतर ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग अभ्यांगत यांचेसाठी स्वतंत्र रांगेची व्यवस्था राहील. तसेच ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग अभ्यांगत यांनी तत्संबंधीचे वैध प्रमाणपत्र सोबत ठेवणे आवश्यक आहे.

मंत्रालयात येणाऱ्या सर्व अभ्यागतांना दुपारी २ वाजेनंतर प्रवेश देण्यात येईल. अशा प्रवेशासाठी त्यांना डिजीप्रवेश या ऑनलाईन ॲप आधारीत प्रणालीद्वारे मंत्रालय प्रवेशपास घेऊन मंत्रालयात प्रवेश मिळविता येईल. अभ्यागतांनी मंत्रालयात प्रवेश मिळविण्यासाठी आधार कार्ड, वाहन परवाना, पॅन कार्ड आदी शासन मान्य ओळखपत्र सादर करणे आवश्यक आहे. अशिक्षीत तसेच स्मार्टफोन नसलेल्या अभ्यांताकरीता गार्डन गेट येथे ऑनलाईन ॲप आधारीत प्रणालीद्वारे मंत्रालय प्रवेश नोंदणीकरीता तसेच मदतीकरीता एक खिडकी उपलब्ध असणार आहे.

'डिजीप्रवेश' ॲपद्वारे आपली नोंदणी केल्यानंतर मिळणाऱ्या क्यू आर कोड आधारे मंत्रालयाबाहेर असलेल्या खिडकीवर मंत्रालय प्रवेशाकरिता आरएफआयडी कार्ड वितरीत करण्यात येईल. हे आरएफआयडी कार्ड आधारे सुरक्षाविषयक तपासणी करून मंत्रालयात प्रवेश देण्यात येईल. अभ्यागतांना आरएफआयडी प्रवेश ओळखपत्र परिधान करणे व मंत्रालयातून बाहेर जाताना ते सुरक्षा कर्मचाऱ्यांकडे जमा करणे बंधनकारक राहील.

### अशी करावी नोंदणी

'डिजीप्रवेश' ॲप हे मोबाईल ॲप ॲण्ड्राईड आणि आयओएस ॲपल या दोन्ही प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात आले आहे. आपल्या मोबाईल च्या प्रणालीनुसार ॲण्ड्राईडमध्ये प्ले स्टोअर वर तर आयओएस ॲपलवर ॲपल स्टोअरवर हे सर्च केल्यास हे ॲप विनामुल्य डाऊनलोड करता येते. या ॲपवर सुरूवातीला केवळ एकदाच नोंदणी करणे आवश्यक राहील. नोंदणी झाल्यानंतर आधार क्रमांकावर आधारीत यंत्रणेद्वारे छायाचित्राची ओळख पटवून नोंदणी पूर्ण केल्यानंतर ज्या विभागात काम आहे, त्याचा स्लॉट बुक करून रांगेशिवाय प्रवेश घेता येईल. या संपूर्ण प्रक्रियेला तीन मिनीटांपेक्षा कमी कालावधी लागतो.

## अग्रलेख...

# सपाचे आत्मघातकी पाऊल

महान योद्धा राणा सांगा यांच्याबाबत केलेल्या वादग्रस्त आणि अवमानजनक विधानाची किंमत समाजवादी पक्ष तसेच या पक्षाचे बोलघेवडे खासदार रामजीलाल सुमन यांना चुकवावी लागत आहे. सुमन यांच्याबाबत वाढत असलेल्या रोषामुळे समाजवादी पक्ष अडचणीत आला आहे. मात्र तरीसुद्धा या जन्मात तरी मी माफी मागणार नाही, अशी उद्दामपणाची भूमिका त्यांनी घेतली आहे. सुमन यांची ही कृती निश्चितच निषेधार्ह आहे. आपल्या हातून एखादी चूक झाली असेल वा बोलताना अनवधानाने एखादा शब्द चुकीचा निघाला असेल तर माफी मागण्यात काहीच गैर नाही. माफी मागण्याने माणूस छोटा होत नाही, उलट माफी मागण्याने माणसाच्या मनाचा मोठेपणा दिसून येतो.

इतिहास हा नेहमीच प्रेरणादायी असतो, इतिहासापासून माणसाने काही शिकणे, बोध घेणे अभिप्रेत असते. मात्र इतिहासातील काही घटनांचा आपल्या राजकीय फायद्याच्या दृष्टीने सोयीस्कर अर्थ लावणे योग्य नसते. गेल्या काही दिवसांत इतिहासातील घटनांवरून आपल्या देशात काही लोकांनी विनाकारण वादंग निर्माण केले आहे. महाराष्ट्रात मुघल सम्राट औरंगजेबाच्या कबरीवरून निर्माण झालेला वाद आता कुठे शांत होत असताना उत्तरप्रदेशात राणा सांगा यांच्याबाबत वादग्रस्त विधान करणे, हा निव्वळ योगायोग म्हणता येणार नाही. यामागे एक मोठे कारस्थान असावे, असा संशय घ्यायला जागा आहे. समाजवादी पक्ष हा सुरुवातीपासूनच मुस्लिमधार्जिणा राहिला आहे. सपाचे बाबरप्रेम काही लपून राहिले नव्हते. त्यामुळेच राजन्मभूमी आंदोलनाला समाजवादी पक्षाने कडाडून विरोध केला होता. समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांचे वडील आणि तत्कालीन मुख्यमंत्री मुलायमसिंह यादव यांनी तर निर्दोष कारसेवकांवर गोळीबार केला होता. त्यामुळे रामजीलाल सुमन जे बोलले ती फक्त त्यांची भूमिका नव्हती, तर समाजवादी पक्षाची भूमिका होती, असे दिसते. तसे नसते तर अखिलेश यादव यांनी सुमन यांना समज दिली असती, ते त्यांचे व्यक्तिगत मत आहे, सपाची ती भूमिका नाही, असा खुलासा केला असता. पण अखिलेश यादव यांनी तसे न करता सुमन यांचा बचाव केला. सध्या सगळेच पक्ष इतिहासाची पाने उलटत आहे, भाजपाला औरंगजेबावर चर्चा हवी आहे, त्यामुळे सुमन यांनी राणा सांगा यांचा मुद्दा उपस्थित केला तर बिघडले काय, असे अकलेचे तारे अखिलेश यादव यांनी तोडले आहे. सुमन यांच्या विधानाची शिक्षा 'इंद्राय स्वाहा तक्षकाय स्वाहा' याप्रमाणे अखिलेश यादव यांनाही चुकवावी लागणार आहे.

गृहमंत्रालयाच्या कामकाजावर राज्यसभेत चर्चा करताना सुमन यांनी इब्राहिम लोदी यांना हरवण्यासाठी राणा सांगा यांनी मुघल सम्राट बाबर यांना बोलावले होते, असे स्फोटक विधान केले. या देशातील मुस्लिम बाबराचे वंशज असतील तर हिंदू गद्दार राणा सांगा यांचे वंशज असल्याच्या त्यांच्या या विधानाचे संतप्त पडसाद उमटणे स्वाभाविक होते. करणीसेनेने सुमन यांच्या घरावर हल्ला चढवला, त्यांच्या घराची नासधूस केली. मुळात राजकारणी लोकांनी आपण काय बोलतो आहे, त्याचा परिणाम काय होणार, याचा विचार करायला पाहिजे. आपल्या विधानामुळे समाजातील दोन वर्गांत तणावाचे वातावरण निर्माण होणार नाही, याची काळजी घेणे अपेक्षित असते. उचलली जीभ लावली टाळूला यासारखी विधाने करणे राजकारण्यांनी टाळले पाहिजे. मात्र रामजीलाल सुमन यांना तसेच भान राहिले नाही वा राजकीय फायद्यासाठी म्हणा त्यांनी तसेच भान ठेवले नाही वा मुस्लिम तुष्टीकरणासाठी जाणीवपूर्वक तसे भान त्यांनी ठेवले नाही, असे म्हणावेसे वाटते. माझे विधान कोणाही जातीच्या, समूहाच्या तसेच धर्माच्या विरोधात नव्हते, अशी मखलाशीही त्यांनी करण्याचा प्रयत्न केला. पण सुमन यांनी हिंदू धर्माच्या लोकांच्या श्रद्धास्थानावर आघात केला, त्या लोकांना डिवचण्याचा प्रयत्न केला, हे स्पष्ट आहे. महाराणा प्रताप यांच्याबद्दल लोकांच्या मनात जेवढी आदराची आणि श्रद्धेची भावना आहे, तेवढीच आदराची आणि श्रद्धेची भावना राणा सांगा यांच्याबद्दलही आहे. मेवाडचे राजपूत शासक संग्रामसिंहच राणा सांगा म्हणून ओळखले जात होते. राजपूत राजांना एकत्र करण्याचे मोठे काम त्यांनी केले होते. मेवाड आणि राजस्थानसाठी राणा सांगा यांचे योगदान खूप मोठे आहे, ते कोणाला नाकारता येणार नाही. राणा सांगा यांच्याबाबत अवमानजनक विधान करणे म्हणजे सूर्यावर थुंकण्यासारखे आहे. सूर्यावर जो थुंकण्याचा प्रयत्न करतो, त्यांच्याच तोंडावर ती थुंकी पडत असते. पण नावात राम असले तरी आपल्या आयुष्यात काही राम नसल्याचे, तर रावण भरला असल्याचे सुमन यांनी दाखवून दिले आहे. राणा सांगा यांच्या नखाचीही बरोबरी रामजीलाल सुमन करू शकत नाही. अस्थिर मानसिकतेच्या लोकांकडून यापेक्षा दुसरी अपेक्षाही करता येत नाही. सुमन आणि त्यांचे नेते अखिलेश यादव याच वर्गवारीतील आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांवर तर अजूनही अश्लाघ्य भाषेत टीका केली जाते. खरं म्हणजे देशाच्या स्वातंत्र्य आंदोलनात सावरकर यांचे जेवढे योगदान आहे, तेवढे अख्ख्या काँग्रेसमधील समस्त नेत्यांचेही नाही. सावरकरांच्या पायाच्या नखाचीही बरोबरी काँग्रेसमधील नेहरू-गांधी घराण्यातील नेते करू शकत नाही.

करणीसेनेने रामजीलाल सुमन यांच्या घरावर हल्ला केला असता ते दलित आहे, म्हणून त्यांच्या घरावर हल्ला चढवण्यात आला, असा हास्यास्पद आरोप सपाने केला आहे. मुळात राणा सांगा यांच्याबाबत वादग्रस्त विधान केले म्हणून सुमन यांच्या घरावर हल्ला झाला, ते दलित आहे, म्हणून झाला नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. अडचणीत आल्यावर जातीच्या आड लपण्याची आपल्या देशातील राजकारण्यांना सवय झाली आहे. अडचणीत आल्यावर त्यांना मग आपली जात आठवते, आपण दलित असल्याचा साक्षात्कार होतो, हे चुकीचे आहे. तुम्ही दलित म्हणून ते विधान केले नाही, तर समाजवादी पक्षाचे खासदार म्हणून विधान केले, मग दलित म्हणून तुमच्या घरावर हल्ला झाल्याचा अकांडतांडव करण्याचे कारण काय? सुमन यांच्या निवासस्थानावर हल्ला करणाऱ्यांवर सरकारने कारवाई केली नाही तर इदेनंतर राज्यात आंदोलन करण्याचा इशाराही समाजवादी पक्षाने दिला आहे. सुमन यांच्या विधानाचे पडसाद शुक्रवारी राज्यसभेत उमटले. सभापती जगदीप धनकड यांनी त्यांच्या विधानाबद्दल नाराजी व्यक्त केली. सुमन यांचे विधान चुकीचे आहे, त्याला काही आधार नाही, असे धनकड यांनी सुमन यांची कानउघाडणी करताना म्हटले.

संसदेच्या दोन्ही सभागृहांत बोलताना सदस्यांना स्वातंत्र्य आणि संरक्षण असते. सभागृहात केलेल्या विधानासाठी वा भाषणासाठी त्यांच्यावर कोणतीही कारवाई करता येत नाही वा त्यांच्यावर गुन्हाही दाखल करता येत नाही. सदस्यांनी कोणत्याही दबावाशिवाय सभागृहात व्यक्त होता यावे, म्हणून हे सुरक्षा कवच आहे. मात्र त्याचा दुरुपयोग कोणी करू नये, असे अपेक्षित असते. मात्र सुमन यांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्यांच्या नावाखाली त्याचा गैरफायदा घेतला. मुळात इतिहास जेवढा प्रेरणादायी आणि मार्गदर्शक असतो, तेवढाच तो संवेदनशीलही असतो. इतिहासातून काही शिकायचे असते. पण सुमन यांनी इतिहासातील तथ्यांचा वापर आपल्या राजकीय फायद्यासाठी करण्याचा प्रयत्न केला. एकप्रकारे यातून त्यांनी हिंदू आणि मुस्लिम या दोन समाजांत तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आपल्या विधानासाठी त्यांनी माफी मागितली असती तर प्रकरण कदाचित शांतही झाले असते. पण त्यांनी माफी मागण्यास नकार दिला. यामुळे त्यांच्या असे वादग्रस्त विधान करण्यामागच्या हेतूबद्दल शंका घ्यायला जागा आहे. २०२७ मध्ये उत्तरप्रदेश विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत, त्यासाठी धार्मिक आधारावर ध्रुवीकरण करण्याचा हा समाजवादी पक्षाचा हेतू आहे, असे वाटते. 'तुका म्हणे ऐशा नरा, मोजुनी माराव्या पैजारा' असे म्हटले आहे. तुकाराम महाराज यांचे हे विधान सुमन यांच्यासारख्या आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या लोकांसाठी असावे असे वाटते.

## यंगिस्तान

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

# आदित्य ठाकरे नैतिकता दाखवतील?



ठाकरे कुलोत्पन्न आदित्य ठाकरे यांच्यावर अत्यंत गंभीर असे आरोप सतीश सालियान यांचे वकील नीलेश ओझा यांनी केलेले आहेत. दिशा सालियानवर बलात्कार करुन खून, सुशांत सिंहचा खून एवढ्यापुरतेच हे आरोप आता मर्यादित राहिलेले नसून ड्रग्ज विक्री आणि डार्क वेबमध्ये लोकांचा खून किंवा बलात्कार होताना पाहणे असे अतिशय किळसवाणे, भयावह व गंभीर आरोप त्यांच्यावर करण्यात आले आहेत. या आरोपात किती तथ्य आहे हे पुराव्यांच्या आधारावर माननीय न्यायालयच ठरवू शकेल. पण ही केस उभी राहील की नाही हे राजकीय इच्छाशक्तीवर ठरणार आहे. विरोधक यास राजकीय अँगल देण्याचा प्रयत्न करत असले तरी हा अँगल राजकीय मुळीच नाही. कारण आतापर्यंत राणे कुटुंबाने केलेले दावे वगळल्यास यात राजकीय हस्तक्षेप कुठेच दिसला नाही. ज्या प्रकारे एफआयआर सुद्धा व्यवस्थित दाखल केला जात नाही, त्यानुसार हे प्रकरण कोणत्या दिशेला जाणार आहे कुणास ठावूक. हायकमांडच्या इच्छेशिवाय हे प्रकरण पुढे जाणार नाही हे निश्चित आहे. परंतु हा आपल्या लेखाचा विषय नाही.

ठाकरे कुटुंबाचे मूळ पुरुष म्हणून आपण प्रबोधनकार ठाकरेंना समोर ठेवू शकतो. मात्र कै. बाळासाहेब ठाकरे यांनी ठाकरे कुटुंबाला प्रचंड प्रतिष्ठा मिळवून दिली. महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक जडणघडणीत या कुटुंबाचा वाटा निश्चितच आहे. परंतु नाईट लाईफच्या मोहात अडकलेली चौथी पिढी कुटुंबाच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरेल असे कुणासही वाटले नसेल. खरं तर महाराष्ट्रातील पत्रकारांनीही आता या प्रकरणाचं गांभीर्य समजून घेतलं पाहिजे. पत्रकारांनी सतीश सालियान व नीलेश ओझा यांची बदनामी होईल अशा बातम्या द्यायला सुरुवात केलेली आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना 'बेस्ट सीएम'चा किताब त्यांना वेळोवेळी मीडियातर्फे देण्यात आला. आता सर्व्हे करण्याची ही पद्धत एकाएकी संपुष्टात आलेली आहे. त्यामुळे मीडियावर आता कुणाचाच विश्वास राहिलेला नाही. पण टिळक, जांभेकर यांचा वारसा सांगणाऱ्या मीडियाने जरा तरी आपला कणा ताठ ठेवला पाहिजे. या प्रकरणाकडे राजकीय दृष्टी बाजूला ठेवून पाहिलं पाहिजे. पत्रकारांना प्रश्न विचारता आले पाहिजे. 'राऊतांचा घणाघात' आणि 'शिंदेंचे वादग्रस्त वक्तव्य' अशा प्रकारचे मथळे देऊन आपण कुणाचे खातो, याचे दाखले देणे बंद केले पाहिजे. लक्षात घ्या वर म्हटल्याप्रमाणे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. म्हणून कोर्टात जे होईल त्यावर अवलंबून राहिलं पाहिजे. मात्र हे करत असताना ज्या प्रकारे पुरावे सादर करून आरोप केले जात आहेत, त्याचं गांभीर्यही जपायला हवं. आता विधानसभेतही यावर चर्चा होऊ लागली आहे. आदित्य ठाकरे यांच्या राजीनाम्याची मागणी होऊ लागली आहे. परंतु विरोध म्हणावा तसा तीव्र नाही.

तरी ठाकरे या घराण्याची शोभा होऊ नये म्हणून स्वतः माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी प्रकरण चिघळत न ठेवता आदित्य यांना राजीनामा देण्यास भाग पाडले पाहिजे व स्वतःचा राजीनामाही सुपूर्द केला पाहिजे. हा राजीनामा नैतिकतेच्या आधार दिला पाहिजे. कारण हा केवळ ठाकरे पिता-पुत्रांचा प्रश्न नसून हा ठाकरे घराण्याचा आहे. ठाकरे म्हटले की प्रबोधनकार आणि हिंदुहृदयसम्राटच आठवतात. हा त्यांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. ठाकरे घराण्याच्या इतिहासात पहिल्यांदाच अशा प्रकारचे पुराव्यासहित गलिच्छ आरोप झालेले आहेत. त्यामुळे जनतेसमोर ते कोणता आदर्श ठेवतील याकडे लोकांचे लक्ष लागलेले आहे. ज्यावेळी दिशा व सुशांतचा मृत्यू झाला तेव्हा दिशाच्या वडिलांनी अधिकृत आरोप केलेले नव्हते. मात्र आता पीडितेच्या रक्ताच्या नात्यातील व्यक्तीनेच पोलिसात व कोर्टात आरोप केल्यामुळे या प्रकरणाला वेगळी दिशा मिळालेली आहे. म्हणूनच या प्रकरणाला राजकीय म्हणून पाहता येत नाही.

संतोष देशमुख हत्या प्रकरणात धनंजय मुंडेंवर प्रत्यक्षा आरोप झालेले नसतानाही त्यांचा राजीनामा घेण्यासाठी विरोधकांनी रान पेटवलं. मग आज तर आदित्य यांच्यावर थेट व देशमुख प्रकरणापेक्षाही गंभीर आरोप झालेले आहेत. अशा वेळी विरोधकांची नैतिकता कुठे गेली आहे? राजीनामा देणं म्हणजे नैतिक जबाबदारी स्वीकारणं. म्हणजेच यापुढे तपास पूर्ण होईपर्यंत व निकाल लागेपर्यंत सालियान व ओझांवर कोणताही राजकीय दबाव टाकला जाणार नाही, याची ग्वाही देणं. ही संधी ठाकरेंकडे आयती चालून आलेली आहे. दबाव वाढण्यापूर्वीच त्यांनी नैतिकतेच्या दृष्टिकोनातून राजीनामा दिला तर जनतेच्या नजरेत त्यांची प्रतिमा चांगली राहील. नाहीतर लोकांच्या मनात संशयाची पाल चुकचुकत राहील. तसेच हा तपास आणि एकंदर प्रकरण निष्पक्षपणे हाताळले जाईल याची ग्वाही सरकारने द्यायला हवी. आता सरकारमधील महत्त्वाच्या व्यक्तींनी यावर बोलायला हरकत नाही. लोक या प्रकरणाच्या बाबतीत सरकारकडे आशेने पाहत आहेत. सर्वसामान्य माणसाचा जन्म श्रीमंत व राजकीय वजन असलेल्यांच्या गाडीखाली किंवा ऐयाशीखातर मरण्यासाठीच झाला आहे, असा संदेश यातून जायला नको असेल तर सरकारने यावर पुढाकार घेणं आवश्यक आहे. सरकारी पक्षातील लोकांनीही नैतिकता दाखवून ठाकरे पिता-पुत्रांच्या राजीनाम्याची मागणी करायला हवी. मात्र राजीनामा खिशात ठेवण्याची सवय असलेले आदित्य नैतिकता दाखवतील का?

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

विजय कुळकर्णी

# ७५ टक्के उपस्थितीचा निर्णय अभिनंदनीय!

दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य असल्याचा निर्णय केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतला आहे. बोर्डाचा हा निर्णय अभिनंदनीयच म्हणावा लागेल. वास्तविक, १० वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांनी शाळेत १०० टक्के उपस्थित राहणे आवश्यकच आहे. असे असले तरीही केंद्रीय बोर्डाने विद्यार्थ्यांचे आजरपण, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत भाग घेणे व इतर गंभीर कारणांसाठी म्हणून २५ टक्के अनुपस्थिती ग्राह्य धरली आहे. पुढील वर्षापासून ७५ टक्क्यांपेक्षा कमी उपस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेला बसता येणार नाही, असे सीबीएसई बोर्डाने स्पष्ट केले आहे. आजकाल १० वी व १२ वीतील विद्यार्थी एखाद्या शाळेत केवळ नावाला प्रवेश घेतात. मात्र, शाळेत न जाता खाजगी शिकवणी वर्ग लावून परीक्षेची तयारी करतात. तर, त्यांना प्रवेश देणाऱ्या शाळा देखील त्यांच्या पालकांकडून भरमसाट शैक्षणिक शुल्क घेऊन त्यांना शाळेत गैरहजर राहण्याची मुभा देतात. एवढेच नव्हे तर, काही खाजगी शिकवणी वर्ग संचालकांचे शैक्षणिक संस्था चालकांशी साटेलोटे झालेले असते. शिकवणी वर्ग संचालकच विद्यार्थ्याच्या पालकांना कोणत्या शाळेत प्रवेश घ्यायचा ते सांगतात. एकदा शाळेत प्रवेश निश्चित झाला की, तो विद्यार्थी खाजगी शिकवणी वर्गाच्या माध्यमातून १० वी व १२ वीच्या बोर्डाच्या परीक्षेची तयारी करतो. शाळेत फक्त प्रात्यक्षिक परीक्षा देण्यासाठी व हॉल तिकीट घेण्यासाठीच हे विद्यार्थी जातात. त्यामुळे शाळेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी दिसत असली तरी प्रत्यक्ष शाळेत येणारे विद्यार्थी कमी असतात. ज्यांना खाजगी शिकवणी नाही, असेच विद्यार्थी शाळेत जातात. त्यामुळे त्या शाळेची पटसंख्या देखील जास्त दिसते. ही बाब आता सीबीएसई बोर्डाच्या निदर्शनास आली असल्याने बोर्डाने विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबत कठोर धोरण अलंबविण्याचे ठरविले आहे. तसेच, ज्या शाळा गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी नामांकित करतील त्यांच्यावर देखील कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे बोर्डाने म्हटले आहे. तसेच, नियमित शाळेत न येणाऱ्या विद्यार्थ्यांना बोर्डाची परीक्षा देता येणार नाही. हा आदेश पुढील शैक्षणिक वर्षापासून लागू होणार आहे.



आज आपण पाहतो की, विद्यार्थ्याचा १० वी किंवा १२ वीत शहरातील एखाद्या शाळेत प्रवेश असतो व तो विद्यार्थी कोटा व इतर ठिकाणी खाजगी शिकवणी वर्गातून जेईई, नीट इत्यादी सोबतच बोर्डाच्या परीक्षेची देखील तयारी करतो. त्यासाठी शिकवणी वर्ग संचालकांचा शैक्षणिक संस्थाचालकांशी अलिखित करार झालेला असतो. वर्गात न बसता त्या विद्यार्थ्याची १०० टक्के उपस्थिती दाखविली जाते. प्रात्यक्षिक शाळेतच होत असल्याने त्यातही बऱ्यापैकी गुण शाळेतर्फे दिले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांना कमी परिश्रमात जास्त गुण मिळतात. आज निर्माण झालेली शैक्षणिक स्पर्धा हे या सर्वांमागचे कारण आहे. आपला पाल्य डॉक्टर किंवा इंजिनीयरच झाला पाहिजे, अशी जवळपास सर्वच पालकांची अपेक्षा असते. १२ वी नंतर चांगल्या महाविद्यालयात प्रवेश मिळावा म्हणून जास्तीत जास्त गुण आपल्या मुलाने मिळवावे, असे प्रत्येक पालकाला वाटते. मग, त्यातून सुरू होते ही चढाओढ. त्यासाठी चांगला शिकवणी वर्ग कोणता याचा शोध घेतला जातो. त्या शिकवणी वर्गाशी कोणत्या शाळा, महाविद्यालयाचा टायअप आहे याचा शोध घेतला जातो. त्यातून प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली जाते. असा प्रकार सध्या शैक्षणिक सत्रात सुरू आहे. याला आळा घालणे आवश्यक आहे. कारण, विद्यार्थी प्रत्यक्ष वर्गात हजर न राहता त्यांच्यासाठी असलेल्या शासकीय शैक्षणिक सुविधांचा लाभ संस्थाचालकांना मिळतो. यावर नियंत्रण मिळविणे आवश्यक आहे. पण, शाळेतील विद्यार्थ्यांची उपस्थिती तपासणे हे जिकरीचेच आहे. त्यासाठी फिरत्या पथकांची निर्मिती बोर्डाला करावी लागेल. अशा पथकांची स्थापना करून दर महिना, पंधरा दिवस किंवा आठवड्यातून किमान तीन दिवस शाळांमध्ये जाऊन तपासणी करून त्याचा अहवाल सीबीएसई बोर्डाने मागवावा लागेल. त्याची अंमलबजावणी देखील प्रभावीपणे झाली पाहिजे, याकडे बोर्डाला लक्ष द्यावे लागेल. तरच, हा निर्णय प्रभावी ठरेल, असे यानिमित्ताने सांगावेसे वाटते.

८८०६००६१४९

## सामाजिक

- मकरंद मुळे

# विरोधकांसह समर्थकांची चाचपणी

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आपला अजेंडा नियमितपणे राबवत असतात. फासे टाकत असतात. पंतप्रधान मोदी बुद्धीबळाच्या पटावरील आपली प्यादी, हत्ती, उंट, घोडा, वजीर चालवत असतात. काही वेळा संसदेत तर कधी थेट जनतेतून आपली भूमिका मांडत असतात. नेमकं वक्तव्य किंवा बोलकी कृती यातून नरेंद्र मोदी व्यक्त होत असतात. चर्चेत रहाणे, बातमी करणे किंवा राजकीय दिशा बदलणे यात पंतप्रधान नरेंद्र मोदी कुशल आहेत. राजकारण, प्रशासन प्रभावीपणे चालवण्यासाठी जे आवश्यक ते सगळं आत्मविश्वासाने, निर्धाराने करतात. आपला पक्ष, आपला विचार केंद्रस्थानी ठेवून त्यावेळी गुजराथचे मुख्यमंत्री आणि २०१४ पासून देशाचे पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी कार्यरत आहेत. भाजपाचे बहुमताचे सरकार आणि त्यातून सबका विकास-सबका विश्वास यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा भर आहे. मोदी समर्थक मोदी यांच्या कृतीचे मास्टरस्ट्रोक म्हणून कौतुक करतात. मोदी विरोधक केवळ राजकारण असे वर्णन करतात. या सगळ्याचा परिणाम म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपा हे चर्चेत रहातात.

पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भाजपा चर्चेचा विषय झालेला आहे. समर्थक आणि विरोधक साधारण एकाच सुरात बोलू लागले आहेत. समाज माध्यमातील मोदी समर्थक काहीशी नाराजी व्यक्त करत आहेत. त्यांचे ते तुष्टीकरण आणि तुमचे ते संतुष्टीकरण? असा प्रश्न विचारला जात आहे. Justice for all, appeasment of none याचे काय झाले ? याची कुजबुज सुरु झाली आहे. २००२ पासून हळूहळू आणि २०१४ नंतर वेगाने म्हणजे मोदी प्रभावाने हिंदुत्वाकडे आकर्षित झालेले आणि त्यातून भाजपाचे मतदार झालेले दबक्या आवाजात चर्चा करू लागले आहेत. विशेषतः कटेंगे तो बटेंगे आणि एक रहोंगे, तो सेफ रहोंगे या परिणामकार आणि यशस्वी ठरलेल्या घोषणेच्या पार्श्वभूमीवर चर्चा होणे स्वाभाविक आहे.

चर्चेचे निमित्त ठरले आहे सौगात-ए-मोदी. गुजरात येथे २०११ साली सदभावना उपवासाच्या दरम्यान जाळीदार टोपी नाकारणारे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नावे भाजपा सौगात-ए-मोदी उपक्रम रमझान ईदच्या निमित्त करत आहे. या उपक्रमाबाबत भाजपा अल्पसंख्यांक आघाडीने खुलासा केला आहे. सौगात-ए-मोदी मुस्लिमांसह शीख आणि ख्रिश्चन यांनाही देण्यात येणार आहे. ख्रिस्ती समूहाला देण्यासाठी गूड फ्रायडेचे निमित्त आहे. या तीन पंथीयांना देऊन भाजपाने संतुलन करण्याचा प्रयत्न केला आहे. अल्पसंख्यांक म्हणजे केवळ मुस्लिम नाही याकडे भाजपाने लक्ष वेधले आहे. लांगुलचालन नाहीतर, भाजपाकडून मैत्रीचा हात आणि संवादाचा पैगाम असे सांगितले जात आहे. रमजान ईदच्या आधी गुढीपाडवा म्हणजे हिंदू नववर्षारंभ, चैत्र नवरात्र आणि त्यानंतर श्रीरामनवमी त्यामुळे हिंदूंना काय? असा प्रश्न स्वाभाविक आहे. मात्र, हिंदू रोषाचा म्हणजे स्वकीयांच्या नाराजीचा धोका पत्करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सौगातचा निर्णय घेतल्याचे दिसत आहे. काही राजकीय आराखडे आणि सत्तेचे गणित यातून भाजपा अल्पसंख्यांक आघाडीच्या अभियानाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मान्यता दिल्याचे लक्षात येते.

लोकसभा निवडणूकीत भाजपाचा अंदाज चुकला होता. अपवाद




वगळता देशभर मुस्लिम मतांनी भाजपा विरोधात ठरवून एक गठ्ठा मतदान केले होते. त्यावेळी मुस्लिम मतदारांच्या तुलनेत हिंदू मतं संघटित झाली नव्हती. त्यामुळे चारशे पार गाठता आले नव्हते. त्यानंतर झालेल्या हरियाणा, महाराष्ट्र आणि दिल्ली निवडणूकीत भाजपाने बाउंस बॅक केले होते. तिन्ही ठिकाणचे स्थानिक मुद्दे वेगळे होते. परंतु, हिंदू मतांचे एकत्रिकरण आणि त्यातून तिन्ही राज्यात मोठा विजय भाजपाने मिळवला आहे. हिंदुत्व तीनही राज्यात समान धागा होता. त्याची मांडणी स्थानिक गरजेनुसार केली होती. या तीन राज्यातील निकालांनी विशेषतः महाराष्ट्र राज्यातील भाजपाच्या यशाने हिंदुत्व केंद्रस्थानी आले होते. हिंदुत्वाची देशव्यापी चर्चा झाली होती.

मकरसंक्रात ते महाशिवरात्र दरम्यान प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभाने देशव्यापी हिंदू जागर झाला आहे. त्याची जगभर चर्चा झाली आहे. छावा या हिंदवी स्वराज्य रक्षक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्य-कर्तृत्व आणि शौर्याचे दर्शन घडवणाऱ्या चित्रपटाला तुफानी प्रतिसाद मिळालेला आहे.

या पार्श्वभूमीवर दिली जाणारी सौगात-ए-मोदी हे एक योजनापूर्वक उचललेले पाऊल असावे. (तसे नसेल आणि तो केवळ अल्पसंख्यांक आघाडीचा ईव्हेन्ट असेल तर फायदा होणार नाही हे निश्चित आहे. मात्र ज्या अर्थी थेट मोदी यांचे नाव वापरेल आहे त्याअर्थी क्यालकुलेशनसह डॅमेज कंट्रोल प्लॅन तयार केला असणार.) आगामी बिहार आणि पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूका हे भाजपाचे लक्ष्य आहे. त्यासाठी पक्षाची यंत्रणा कामाला लागली आहे. संघटनात्मक स्तरावर काम सुरु झालेले आहे. या दोन्ही राज्यात मुस्लिम मतदार निकाल ठरवतात. सत्तेचे पारडे झुकवणारे मुस्लिम बहुल मतदार संघ दोन्ही राज्यात आहेत. तेथील मुस्लिमांनी एक गठ्ठा भाजपा विरोधात जाऊ नये यासाठी उपाय योजना होत आहे. यातून साध्य काय होईल ? मुसलमान भाजपाला मतं देतील कां ? यापेक्षा भाजपा मुस्लिमांना दूर करत नाही हा निरोप सौगात देताना दिला जाईल. या जोडीला वक्फ बोर्ड कायदा बदल हा सामान्य मुस्लिमांच्या हिताचा आहे हे पोहचवले जाईल. वक्फ बोर्ड कायदा बदलाला असलेल्या राजकीय विरोधाची धार कमी करण्यासाठी सौगात वापरली जाईल. ही सौगात देताना भाजपा कार्यकर्त्यांना मुस्लिम व्यक्तीच्या प्रतिक्रिया आणि प्रतिसादाचा अंदाज येईल. त्याचप्रमाणे राष्ट्रीय मुस्लिम मतदाता मंच याचे स्वागत कसे करणार ते दिसून येईलच. पंजाब राज्यात भाजपाला शीख समुदायाने पूर्णतः स्वीकारलेले नाही. भाजपा दीर्घकाळ अकाली दला सोबत होता. आता स्वबळ आजमावत आहे. शिखानी अकाली दल, काँग्रेस आणि आता आप यांना साथ दिलेली आहे. मात्र, भाजपावर पसंतीची मोहर उमटवलेली नाही. भाजपा हा हिंदू पक्ष आहे, तो आपला नाही हा भाव आहे. त्यापलीकडे जाऊन शीख समुदायाला पंजाब असलेला सीमेपलीकडचा धोका, विदेशी संकट, स्थानिक परिस्थिती याची जाणीव सौगातच्या निमित्त भाजपा करून देणार कां ? हा कळीचा मुद्दा आहे.

ख्रिश्चन समूह हा भाजपा समर्थक नाही. मुस्लिम उघडपणे रस्त्यावर उतरून भाजपा विरोध व्यक्त करतात तर, ख्रिश्चन न बोलता कृतीतून व्यक्त करतात. धर्मांतर विषयावर ख्रिश्चन धर्मातील कोणीही बोलत नाही. धर्मांतर करूनही जाती अंत होत नाही. विदेशी चर्च ऐवजी भारतीय चर्च या संकल्पनेवर फारशी चर्चा झाली नाही. या तीनही अल्पसंख्यांक समूहात जातीची उतरंड आहे. आर्थिक विषमता आहे. आपसात भेदभाव आहे. भाजपा ही सौगात या तीन पंथातील अतिसामान्य व्यक्तींकडे घेऊन जाण्याच्या प्रयत्नात आहे. मूलभूत गरजा पूर्ण करण्यात व्यस्त असलेल्या समूहात जाऊन भाजपाने त्यांना वास्तवाची जाणीव करून दिली तर फरक पडू शकतो. भाजपा अल्पसंख्यांक आघाडीला आव्हान आणि संधी आहे. अंमलबजावणी कशी होणार यावरून उपयुक्तता ठरणार आहे. हिंदू, हिंदुपण आणि हिंदुत्व याचे संधी मिळेल तिथे किंवा संधी शोधून प्रकटीकरण करणाऱ्या नरेंद्र मोदी यांनाच पणाला लावल्याने पक्षाला काळजी घ्यावी लागणार आहे. उलट-सुलट प्रतिक्रिया येणार आहेत. उपयोग झाला नाहीतर बुमरँग होणार नाही अशी सावधगिरी बाळगावी लागणार आहे. सौगातच्या निमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री अमित शहा आणि भाजपाची कोर टिम तसेच, पक्षाचे ज्येष्ठ सल्लागार चाचपणी करून घेतील. आपल्या पारंपरिक मतदारांचा अंदाज घेतील. नवमतदारांचा प्रतिसाद लक्षात घेतील. भाजपा ज्या रा. स्व. संघाच्या विचारांचा आहे, त्या विचारांच्या बत्तीसपेक्षा अधिक संघटना आणि समविचारी संस्था यांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या जातील. राजकीय पक्ष म्हणून आगामी काळातील अल्पसंख्यांक डिस्कोर्स काय असावा याची दिशा सौगातच्या निमित्त ठरू शकते. २०२७ ला उत्तर प्रदेशच्या निवडणूका आहेत. तिकडे सपाचे आव्हान मोठे आहे. सपाने मुस्लिम मुद्दा लावून धरलेला आहे. लोकसंख्या आधारे मतदार संघाची पुन:रचना याला विरोध करून भाषा केंद्रित राजकारण तामिळनाडूत मूळ धरत आहे. द्रविडस्तानसह दक्षिणायन अश्या वैचारिक मांडणीतून आणखी एक फाळणीचे संकट उभे केले जात आहे. भाषा आणि प्रांतिक अस्मिता यातून एकसंघपणाला विरोध केला जात आहे. २०२९ ची लोकसभा निवडणूका हे भाजपाचे लक्ष्य आहे. २०२५ ते २०२९ या चार वर्षात होणाऱ्या घडामोडीवर राजकारण ठरणार आहे. सौगात देऊन मित्र झाला नाहीतरी चालेल कट्टर विरोधक होऊन आमच्या विरोधकांना मदत करु नका हे भाजपाला सांगायचे असेल. भाजपाचे ऐकतील का ? हे सौगत-ए-मोदी कशी स्वीकारतात किंवा नाकारतात यावरून कळेल.

## वाचक पत्रे

### माणसाने आपले माणूसपण विसरू नये

माणूस कितीही मोठा झाला, यशस्वी झाला, तरी त्याने आपले माणूसपण विसरू नये. नम्रता, प्रेम, दयाळूपणा आणि इतरांच्या सुख-दु...खात सहभागी होणे हीच खरी माणुसकी. इतरांच्या सुखात आनंदी होणं आणि दु...खात त्यांना आधार देणं हीच खरी माणुसकीची ओळख आहे. शेवटी, आपले विचार, भावना आणि सहानुभूतीच आपल्याला खऱ्या अर्थाने माणूस बनवतात. सहानुभूती, आदर, प्रेम आणि इतरांच्या दु...खाची जाणीव ठेवणं हे खूप महत्त्वाचं आहे. आजच्या धकाधकीच्या जगात माणसं यशाच्या मागे धावताना कधी कधी आपल्या माणूसपणालाच मागे टाकतात. पण खरी श्रीमंती ही पैशात नाही, तर आपल्या वागण्यात आणि मनाच्या श्रीमंतीत असते.

**श्रीकांत संभाजी मगर/९६८९११७१६९**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### केगाव येथील हॉटेल जय मल्हारमध्ये पूर्व वैमनस्यातून तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि. २८ मार्च -**

सोलापूर-पुणे महामार्गावरील केगाव परिसरातील डेंटल कॉलेजजवळील हॉटेल जय मल्हार येथे पूर्व वैमन्यशातून तरुणाला म ारहाण करण्यात आली. हा प्रकार शुक्रवारी मध्यरात्री सव्वा बारा वाजता घडला. इस्माईल शरीफ कुरेशी ( वय १५, रा. मिन्नत मोहल्ला, मौलाली चौक, सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. शुक्रवारी मध्यरात्री सव्वा बाराच्या सुमारास इस्माईल हा केगाव येथील हॉटेल जय मल्हार येथे बसला होता. त्यावेळी त्यास पूर्व वैमनस्यातून राजू जाधव व इतर दोन यांनी लाथा बुक्क्यांनी तसेच लोखंडी खुर्चीने मारून जखमी केले. या मारहाणीत कुरेशी याच्या चेहऱ्यास जखमा होऊन तसेच त्याच्या सर्वांगास मुकामार लागल्याने रात्री एक वाजता त्याचा भाऊ मेहताब याने इस्माईल यास शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### ओम नमः शिवाय नगरात तरुणीची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर, दि. २८ मार्च-**

शहरातील हत्तुरे वस्ती परिसरातील ओम नमः शिवाय नगरातील राहत्या घरात तरुणीने शनिवारी सकाळी अकरा वाजता गळफास घेऊन आत्महत्या केली. पल्लवी रमेश वळूडंगी ( वय २३, रा. ओम नमः शिवाय नगर) असे आत्महत्या केलेले तरुणीचे नाव आहे. शनिवारी सकाळी अकराच्या सुमारास पल्लवी ही राहत्या घरात गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आली. तिला नातेवाईकांच्या साह्याने गळफासातून सोडवून विजापूर नाका पोलीस ठाण्यातील हवालदार मनूरे यांनी १२:४५ वाजता शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच ती मृत पावल्याची डॉक्टरांनी घोषित केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

### शेतात मुरूम टाकल्याच्या कारणातून मारहाण

**सोलापूर, दि. २८ मार्च-**

आमच्या शेतात मुरूम का टाकतो अशी विचारणा केल्याने एकास नऊ जणांनी लाकडाने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. हा प्रकार शुक्रवारी दुपारी बारा वाजता घडला. समाधान हनुमंत शिंदे ( वय ३४, रा. यल्लमवाडी या. मोहोळ) असे मारहाण करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव आहे. यातील जखमी समाधान याने भारत चांदवड यास आमच्या शेतात म्हणून का टाकतो असे म्हणून विचारले त्यावरून चिडलेल्या भारत याने त्याच्या इतर साथीदारांसह समाधान यास लाकडाने तसेच लाथा- बुक्क्यांनी मारहाण केली. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### मुलीच्या सासरी आईने प्राशन केले फिनेल

**सोलापूर, दि. २८ मार्च-**

आईने मुलीच्या सासरी फिनेल प्राशन केले हा प्रकार शुक्रवारी सकाळी अकरा वाजता आमराई येथे घडला. सुशिलाबाई नामदेव आगवणे ( वय ५०, रा. सेटलमेंट फ्री कॉलनी नंबर सहा) असे फिनेल प्राशन केलेल्या महिलेचे नाव आहे. सुशीलाबाई यांची मुलगी देगाव रोड परिसरातील आमराई या भागात राहण्यास आहे. शनिवारी सकाळी सुशीलाबाई तिच्या घरी गेल्या होत्या. त्यावेळी तेथे अज्ञात कारणातून सुशिलाबाई यांनी फिनेल प्राशन केले. यात त्रास होऊ लागल्याने त्यांना मुलगी नीलम जावीर यांनी अकरा पन्नास वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



## विद्यार्थ्यांनी रॅगिंगपासून दूर राहून भविष्य घडवावे : अॅड. अळ्ळी

### वसुंधरा कला महाविद्यालयात व्याख्यान व समुपदेशन

**सोलापूर, दि.२८ मार्च**

जुळे सोलापूर येथील वसुंधरा कला महाविद्यालयात अँटी रॅगिंग समिती अंतर्गत कार्यक्रमामध्ये अॅड. राजेंद्र अळ्ळी यांनी वरील उद्गार काढले. प्रमुख पाहुण्यांच्या स्वरूपामध्ये विद्यार्थ्यांना म ार्गदर्शन करीत असताना अॅड. अळ्ळी म्हणाले की, रॅगिंग हा एक गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे. रॅगिंग प्रतिबंधक कायद्यानुसार रॅगिंग करणारा विद्यार्थी किंवा समूह यांना कठोर शिक्षा होऊ शकते. रॅगिंगमुळे विद्यार्थ्यांचे करिअर व भविष्य अडचणीत येऊ शकते म्हणून विद्यार्थ्यांनी स्वतः रॅगिंग पासून दूर राहून इतर विद्यार्थ्यांनाही रॅगिंग पासून दूर ठेवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे मत व्यक्त केले.

अॅड. कपिल क्षीरसागर म्हणाले की, रॅगिंगमुळे विद्यार्थी ,पालक, समाज व राष्ट्र या सर्वांवर वाईट परिणाम होतो. महाविद्यालयातील तरुण विद्यार्थी-विद्यार्थिनींनी रॅगिंग सारख्या कृत्यांमध्ये अडकून न पडता समाज बांधणीसाठी योगदान देण्यासाठी प्रयत्न करावे.

प्र. प्राचार्य डॉ. टी. ए. देशमुख म्हणाले की, अत्यंत सहज करता येणारे रॅगिंग विद्यार्थ्यांच्या करिअरमध्ये मोठा अडथळा बनू शकतो. विद्यार्थ्यांनी रॅगिंगला नकार देऊन आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवून आणावा. अँटी रॅगिंग समितीच्या समन्वयक प्रा. डॉ. सुचिता गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. ए. बी. पाटील यांनी करून दिला. आभार प्रकाश शेंडगे याने मानले तर सूत्रसंचालन क्षितिज घोलप याने केले.

Classifieds

**विकणे आहे**

विजापूर रोड, अत्तार नगर येथील प्लॅट नं. १०१ अंबिका रेसिडेन्सी अपार्टमेंटमधील ३ BHK प्लॅट विकणे आहे.
- संपर्क -
प्रदीप चंद्रकांत ख्याडे
मो. ९८९०८६६४६४
८१७७९७८३८३

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

## मंद्रूपच्या बँक ऑफ इंडिया शाखेत ग्राहकांची गैरसोय

**मंद्रूप, दि. २८ मार्च-**

मंद्रूप येथील बँक ऑफ इंडिया शाखेत ग्राहकांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. गुरुवारी शाखेत गेलेल्या ग्राहकांना लंच ब्रेकच्या कारणाने कोणतेही कर्मचारी सेवेस उपलब्ध नव्हते. मंद्रूप शाखेत जेवणाच्या वेळेत ग्राहकांची सेवा पूर्णपणे बंद होती.

मंद्रूप बँक ऑफ इंडिया शाखेत परिसरातील अनेक गावांतील नागरिकांची कामे असतात. नागरिक आपली इतर कामे बाजूला ठेवून विशिष्ट कामासाठी बँकेत आलेले असतात. बहुतांश कामांसाठी बँक खात्याचे पासबुक एन्ट्री महत्त्वाचे असते, पण मंद्रूप शाखेत पासबुक एन्ट्री करण्याचा प्रिंटर अनेक दिवसांपासून बंद असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे ग्राहकांना कामासाठी पुन्हा पुन्हा बँकेत जावे लागत आहे.बँकेत खाते उघडण्यासाठी अनेक ग्राहकांना अनेक दिवस प्रतीक्षा करावी लागत असल्याच्या तक्रारी देखील समोर आल्या आहेत. यासंदर्भात व्यवस्थापकांशी संपर्क साधला असता, काही वेळा तांत्रिक कारणांमुळे कामकाजात विलंब होतो, असे त्यांनी सांगितले. मात्र, इतर कर्मचाऱ्यांना प्रिंटर बंद असल्याबाबत विचारले असता त्यांनी उत्तर देण्याचे टाळले.बहुतांश कर्मचाऱ्यांच्या गळ्यात ओळखपत्र नसल्याचे दिसून आले. विशेष म्हणजे, व्यवस्थापकाच्याही गळ्यात ओळखपत्र नव्हते. ओळखपत्रांशिवाय कर्मचाऱ्यांची ओळख पटविणे कठीण जाते आणि सुरक्षेच्या दृष्टीने हे गंभीर आहे.

## शेतकऱ्याप्रती साखरेची मोठी तळमळ : महेश इंगळे

**अक्कलकोट दि .२८ मार्च**

समाधान मेळाचे मार्गदर्शक दत्तकुमार साखरे यांची शेतकऱ्याप्रती त्याची मोठी तळमळ आहे. व्यसन मुक्तीसाठीही त्यांची जनजागृती गौरवस्पद असल्याचे प्रतिपादन वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यांनी केले .

स्विमिंग ग्रुपच्या वतीन संस्थापक अध्यक्ष महेश इंगळे यांच्या हस्ते दत्तकुमार साखरे यांचा सत्कार करण्यात आला याप्रसंगी वटवृक्ष देवस्थान चे अध्यक्ष महेश इंगळे बोलत होते .

यावेळी पत्रकार स्वामीराव गायकवाड राजेशकुमार जगताप रमेश भंडारी अरविंद पाटील सैदप्पा इंगळे : समाधान मेळाचे अध्यक्ष



बसवराज माशाळे प्रथमेश इंगळे डॉ सुनील बिराजदार डॉक्टर राजू मलंग प्रमोद लोकापुरे बाळासाहेब एकबोटे संतोष पराणे सुनील पवार शिवशरण अचल्लेर बाबा सुरवसे मल्लिनाथ माळी सोमनाथ सुतार सुरेश पाटील राजू एकबोटे दर्शन घाडगे वेंकटेश स्वामी अमर पाटील शैलेश राठौर तुषार मोरे स्विमिंग परिवाराचे कार्याध्यक्ष श्रीकांत झिपरे व समस्त स्विमिंग परिवार उपस्थित होते

## शहीद बलिदान दिनानिमित्त ४५ जणांचे रक्तदान

**अक्कलकोट, दि. २८ मार्च-**

शहीद अमर बलिदान दिनानिमित्त संवेदना-२ या वैद्यकीय निमा संघटना अक्कलकोट शाखाच्या वतीने श्री स्वामी समर्थ मल्टीस्पेशालीस्ट हॉस्पिटल येथे भव्य रक्तदान शिबिर आयोजित केला होता. शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून ४५ जणांनी रक्तदान केले. अक्कलकोट येथील पंचायत समिती समोरील श्री स्वामी समर्थ मल्टीस्पेशालीस्ट हॉस्पिटल येथे सदर रक्तदान शिबिर आयोजित केला होता. सोलापूर येथील अक्षय ब्लड बँकचे उदय पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. योगेश वेळापूकर.



डॉ. संदीप इंगळे, डॉ. बसवराज चिणकेकर, डॉ. अमृता कोटी हे प्रमुख उपस्थितीत होते.या प्रसंगी निमा चे डॉ. प्रदीप घिवारे, डॉ. राजेंद्र पाटील, डॉ. गिरीष साळुंखे, डॉ. लिंगराज बोकडे, डॉ. प्रमोद मजगे, डॉ. विक्रम पडवळकर डॉ. विपुल शहा, डॉ. बसवराज चिणकेकर, डॉ. प्रदीप बिराजदार, डॉ. स्नेहा वेळापूरकर, डॉ. आदित्य कोतवाल, डॉ. स्वामिनाथ बिराडे, मेडिको शिवानंद नंदर्गी, हॉस्पिटलचे जनसंपर्क अधिकारी श्रीशैल पावले, प्रशांत बंकापुरे या डॉक्टरांसह आदींनी रक्तदान केले. हॉस्पिटलचे सर्व संचालक आणि सोलापूर येथील अक्षय ब्लड बँकचे उदय पाटील त्यांच्या टिमचे सहकार्य लाभले. डॉ. प्रदीप घिवारे यांनी आभार मानले.

## यशवंतनगर जि.प. शाळेत स्नेहसंमेलन उत्साहात

**अकलूज, दि.२८ मार्च-**

मुलांच्या शैक्षणिक गुणवत्ते बरोबर त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी यशवंतनगर येथील जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक केंद्रशाळामध्ये महर्षी महोत्सव वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी या सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला.यात शाळेतील जवळ जवळ शंभर टक्के विध्यार्थ्यांनी सहभाग नोंदवाला. या कार्यक्रमासाठी उद्घाटक सत्यशील (भैय्या) मोहिते-पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले यावेळी सरपंच वर्षाताई सरतापे,उपसरपंच यशवंतनगर, ग्रामपंचायत सर्व सदस्य,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, आणि सदस्य,यशवंतनगर केंद्राच्या केंद्रप्रमुख महादेवी गुंड, सुमित्रानगर शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल नष्टे, केंद्र शाळेतील शिक्षक व तालुक्यातील विविध शाळांचे मुख्याध्यापक शिक्षक परिसरातील नागरिक व पालक उपस्थित होते.या कार्यक्रमात मुलांनी विविध प्रकारची लोकगीते, प्रादेशिक गीते, ऐतिहासिक, चित्रपट गीते, लावणी, भारूड,देशभक्तीपर मुकनाट्य, विडंबन गीते सादर करत प्रेक्षकांची मने जिंकली.पालकवर्ग आणि ग्राम स्थानी बक्षिसे देऊन विद्यार्थ्यांनाच्या कलागुणांना प्रोत्साहन दिले. अतिशय सुंदर, निसर्गरम्य शालेय परिसर तसेच या कार्यक्रमाचे मोठ्या पडद्यावर थेट प्रक्षेपण ठेवल्यामुळे हा कार्यक्रम अतिशय सुबक व आकर्षक झाला.








### पैशाच्या कारणातून हॉकी स्टिकने तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि. २८ मार्च-**

देगाव रोडवरील बसवेश्वर नगरात शुक्रवारी रात्री आठ वाजता पैशाच्या कारणातून तरुणाला हॉकी स्टिकने सात जणांच्या जमावाने मारहाण केली. नवनाथ मानसिंग चव्हाण (वय ३५, रा. बसवेश्वर नगर सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. शुक्रवारी रात्री नवनाथ हा राहते घरी होता. त्यावेळी पाच ते सात लोक हातात हॉकी स्टिक घेऊन तेथे आले. त्यांनी नवनाथ यास पैशाच्या कारणातून हॉकी स्टिकने मारहाण केल्याने त्याच्या चेहऱ्याला जखम झाली. तसेच लाथाबुक्याने मारहाण केल्याने सर्वांगास मुकामार लागला. रात्री दहा वाजता भाचा अनिल राठोड याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.



### भांडण मिटविण्यासाठी बोलावून तिघांना मारहाण

**सोलापूर, दि. २८ मार्च-**

पूर्वी झालेली भांडणे मिटवण्यासाठी म्हणून बोलावून घेऊन तिघांना मारहाण केली. हॉटेल अमन पाठीमागे हा प्रकार शनिवारी रात्री एक वाजता घडला. निजाम युसुफ शेख ( वय २५ रा. शिवगंगा नगर) रिहान फिरोज सालार ( वय १८, लोकमान्य नगर, सोलापूर) व रिहान आसिफ पल्ले ( वय १७, रा. नई जिंदगी सोलापूर) अशी मारहाण झालेल्या तरुणांची नावे आहेत. वरील तिघा जखमींची यापूर्वी कासिम सय्यद, अबूबकर सय्यद, उसामा सय्यद यांच्याबरोबर तक्रार झाली होती. ही तक्रार मिटवून घेऊ असे म्हणून सय्यद यांनी निजाम, रेहान व फिरोज यांना अमन हॉटेल पाठीमागे रात्री एक वाजता बोलावून घेतले. परंतु पूर्वी झालेली भांडणे न मिटवता त्यांनी या तिघांना लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. यामुळे सर्वांगास मुकामार लागल्याने रात्री १.५० वाजता मित्र एजाज बागवान यांनी शासकीय रुग्णालयात उपचारात दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.

## कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी.

Email-ID-am_barshi@msamb.com फोन-०२१८४-२२२९७६

जा.क्र. प्लॉ.गा.जा.प्र/८७५ दि.२८ मार्च २०२५

### जाहिर प्रसिध्दिकरण

यान्वये कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सर्व अनुज्ञप्ती धारकांना कळविणेत येते की, कृषि उत्पन्न बाजार समिती बार्शी व सबयार्ड वैराग येथील अडत गाळे/खुले प्लॉट, फळे व भाजीपाला विभागातील गाळे, शॉपींग सेंटर मधील गाळे जाहिर लिलावाने बोली डिपॉझीट लिलाव पध्दतीने द्यावयाचे आहेत तरी लिलाव मुख्य कार्यालय बार्शी मधील दि.०५/०४/२०२५ रोजी दुपारी ११.३० वा मुख्य कार्यालय येथे व उपबाजार वैराग मधील दि.०५/०४/२०२५ दुपारी ०३.०० वा उपबाजार कार्यालय वैराग येथे करण्यात येणार आहेत. तरी बाजार समितीचे अनुज्ञप्तीधारक आडत्ये, व्यापारी तसेच शॉपींग सेंटरसाठी व्यावसायिक यांनी ज्यांना लिलावात भाग घ्यावयाचा आहे त्यांनी बाजार समितीकडून रु.५००/- फॉर्म फी भरुन अटी व नियम असलेले फॉर्म खरेदी करुन घ्यावयाचे आहेत.

बाजार समितीकडे लिलावात भाग घेणेसाठी फार्म भरुन देताना रु.५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) बोली डिपॉझीट रक्कम अनामत म्हणून बाजार समितीच्या कार्यालयात दि.०५/०४/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत भरावयाची आहे. ज्यांनी रक्कम भरली आहे त्यांनाच लिलाव बोलीमध्ये भाग घेता येईल याची नोंद घ्यावी. मागणी अर्ज तसेच अडत गाळे, प्लॉट, फळे भाजीपाला मार्केट गाळे, शॉपींग सेंटर गाळे, नियम व अटी असलेला फॉर्म बाजार समितीचे कार्यालयात दि.०५/०४/२०२५ रोजी सकाळी ११.०० पर्यंत कार्यालयीन वेळेत मिळतील.

सही
सचिव मुख्यप्रशासक
कृषि उत्पन्न बाजार समिती बार्शी

## जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ४०/२०२५
निशाण नं.

**बार्शी येथील मे. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर साहेब यांचे न्यायालयात**

**१) भारत शामराव गवळी, वय-६० वर्षे,** धंदा-शेती, रा. धामणगाव (दु.), ता. बार्शी, जि. सोलापूर
**२) लता हनुमंत काकडे, वय-५१ वर्षे,** धंदा-घरकाम, रा.-यावली, ता. बार्शी, जि. सोलापूर
**३) वेनु लक्ष्मण बरबडे, वय-५३ वर्षे,** धंदा-घरकाम, रा.-सर्वे नं.६/२/१ बी, गुजर निंबाळकर वाडी, कात्रज, ता. हवेली, जि. पुणे
**४) रंजना चंद्रभान काळूके, वय-७५ वर्षे,** धंदा-घरकाम, रा. राळेरास, ता. बार्शी, जि. सोलापूर
**५) शोभा भरत धावणे, वय-६३ वर्षे,** धंदा-घरकाम, रा. वडगाव काठी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव (उस्मानाबाद) — **अर्जदार**

विरुध्द

**कोणीही नाही** - **सामनेवाला**

१) ज्याअर्थी, अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज यातील अर्जदार नं. १ ते ५ यांची आई सिताबाई शामराव गवळी व वडिल शामराव भिमराव गवळी हे मयत झाले असून अर्जदार नं. १ ते ५ हेच त्यांचे कायदेशिर वारस असल्याबाबत व तसे वारस प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणेकरिता या मे. कोर्टात दाखल केला आहे.

२) त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, वर नमुद अर्जदारांचे अर्जातील मागणी व विधाना संबधाने जर कोणाचेही आक्षेप असतील तर हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमलेली ता. २/०५/२०२५ रोजी पर्यंत मे. कोर्टात स्वतः अगर आपल्या विद्यीज्ञा मार्फत हजर होवून आपले तक्रारी, हरकती लेखी स्वरुपात सादर कराव्यात अन्यथा मुदती नंतर मे. कोर्टात पुढील हुकूम होतील.

हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्यानिशी प्रसिध्द केले असे.
ता. २७/३/२०२५

सही/-
कनिष्ठ लिपीक

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
(दिवाणी न्या. क. स्तर, बार्शी)

## जाहीर समन्स प्रसिध्दीकरण

क्रमांक आर.टी.एस/१५५/एस आर/०७/२०२५

**बार्शी येथील मे. तहसिलदार सो. यांचे न्यायालयात**

**श्री. सुनिल बन्सीलाल सानप** - **अर्जदार**

**विरूध्द**

**१) लिला अंबाजी घुगे**
**२) कमल पांडूरंग घुगे**
**दोघी रा. भालगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर** — **सामनेवाला**

**ज्याअर्थी,** सदरचा अर्ज यातील अर्जदाराने तुम्ही नं. १, २ यांचे विरुध्द मौजे भालगांव येथील जमीन गट नं. २७७, ३१६, ३१४, २८३ चे ७/१२ उताऱ्यावरील चुकीचा अंमल घेतलेबाबतचे दुरूस्ती करीता दाखल केलेला आहे. सदर अर्जाचे कामी तुम्ही हजर राहावे म्हणून तुम्हांला वर अर्जात नमूद केलेल्या अर्जदार यास माहित असलेल्या वरील पत्त्यावर मे. न्यायालयामार्फत यापूर्वी नोटीस पाठविले असता तुम्ही सदर अर्जामध्ये नमूद पत्त्यावर राहता किंवा केस याबाबत कोणताही खुलासा मिळत नाही व तुम्ही सध्या कोठे राहता याबाबत सखोल चौकशी केली असता तुमचा पत्ता मिळून येत नाही त्यामुळे तुमचे विरुध्दचे सदर अर्जाच्या नोटीसीची बजावणी होत नाही.

**त्याअर्थी,** तुम्ही नं. १, २ यांनी सदर अर्जाचे कामी सदर जाहीर समन्स प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर सदर प्रकरणाची पुढील नेमली ता.०६/०५/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता मे. कोर्टात या अर्जाचे कामी स्वतः अगर कुलमुखत्यार यांचे मार्फत विधिज्ञामार्फत हजर राहून व आपला पत्ता मेमो दाखल करुन तुमचे म्हणणे याकामी दाखल करावे. तुम्ही सदर अर्जाचे कामी नेमलेले तारखेस हजर न राहिल्यास अगर तुमचे म्हणणे दाखल न केल्यास तुमचे कांही म्हणणे नाही, असे समजून मे. कोर्टाचे तुमचे विरुध्द एकतर्फा आदेश होतील. मागाहून तक्रार चालणार नाही.

कळावे हे जाहीर समन्स प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सही शिक्क्यानिशी दिले,
ता.२८/०३/२०२५

सही/-
लिपिक

कोर्टाचा शिक्का

सही/-
तहसिलदार साहेब, बार्शी

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी जिल्हा परिषद (ल.पा.) सोलापूर**
**जाहिर नोटीससांतर्गत निविदा सुचना क्र. सन 2024-25**

अति. मुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हा जलसंधारण अधिकारी जि.प. (ल.पा) सोलापूर दुरध्वनी क्रमांक 0217 - 2727408 हे जिल्हा परिषद सोलापूर कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत मक्तेदाराकडून दोन लिफाफा पध्दतीने खालील कामाच्या जाहिर-नोटीसद्वारे निविदा मागवित आहेत. जाहीर-नोटीद्वारे निविदेचा कोरा नमुना जिल्हा जलसंधारण अधिकारी जिल्हा परिषद (ल.पा) सोलापूर यांचे कार्यालयामध्ये दि.01/04/2025 रोजी सकाळी 10.00 वाजले पासून दिनांक 16/04/2025 रोजी सायंकाळी 17.00 वाजेपर्यंत उपलब्ध राहील. परिपूर्णरित्या भरलेल्या जाहिर-निविदा दिनांक 16/04/2025 रोजी सांयकाळी 17.00 वाजेपर्यंत व त्यापुर्वी स्विकारण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु लाखात | बयाणा रक्कम रु. | कामपूर्ण करणेची मुदत | कोऱ्या निविदा संचाची किंमत रुपये | अधिकृत ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | मौजे गिरवी ता. माळशिरस येथील पाझर तलाव क्र. १ गिरवी (चौंढी नाला) (जलसंपदा विभागाकडील) या योजनेची विशेष दुरुस्ती करणे. | 9.42 | -- | 6 महिने | 2000/- | सु.बे.अ. |

उपरोक्त सर्व कामाबाबत निविदा अटी व शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमुद केलेला असून कोऱ्या निविदा संच जिल्हा जलसंधारण अधिकारी जि.प. (ल.पा) सोलापूर यांचे

१) कार्यालयामध्ये दिनांक 01/04/2025 रोजी सकाळी 10.00 वाजलेपासून दिनांक 16/04/2025 रोजी सायंकाळी 17.00 वाजेपर्यत कार्यालयातील नोटीस बोर्डावर पहावयास मिळतील.
२) उपरोक्त तक्यातील कामाचे नावासमोर रकाना क्र.4 व 6 मध्ये नमुद केलेल्या बयाणा व निविदा फी रक्कम रु. स्टेट बँक ऑफ इंडिया येथे चलनाने भरण्यात यावी. सदरची निविदा दिनांक 01/04/2025 रोजी सकाळी 10.00 वाजलेपासून दिनांक 16/04/2025 रोजी सायंकाळी 17.00 वाजेपर्यंत कोऱ्या निविदा संच खरेदी करता येतील व सादर करता येतील.
३) निविदेच्या अटी शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदापैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे.
४) लिफाफा क्रमांक 1 मधील सर्व कागदपत्रे जाहिर-निविदा मध्ये सादर करणे आवश्यक आहे तसेच सादर केलेल्या कागदपत्रावर मक्तेदारानी स्वतः च्या सहिने (स्वाक्षरीने) साक्षांकित करुनच सादर करावी अन्यथा सदरची निविदा अपात्र करणेत येईल. (निविदे व्दारे सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजूर सहकारी संस्थेस काम असलेस बयाणा रक्कम सुट आहे)
५) दिनांक १ जुलै २०१७ पासून जीएसटी (GST) या नव्या कररचनेची अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली असल्याने जीएसटी (GST) कराची तरतुद निविदा BOQ मध्ये करण्यात आलेली आहे याची नोंद घ्यावी.

शिक्का

सही/-
जिल्हा जलसंधारण अधिकारी
जिल्हा परिषद (ल.पा.) सोलापूर

## सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित, सोलापूर

श्री पंचमुखी हनुमान नागरी सही. पतसंस्था म. शेळगी, सोलापूर.

जा.क्र. झेड नोटीस/2024-25 दिनांक: 27/03/2025

**नमुना ''झेड'' (Z Notice)**

म.स.स. अधिनियम 1960 नियम 1961 मधील (नियम क्र. 107(11) (ड-1)
स्थावर मालमत्तेचा प्रतिकात्मक ताबा घेण्याबाबतचे नोटीस

मी खाली सही करणार विशेष वसुली व विक्री अधिकारी, सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित सोलापूर द्वारा श्री पंचमुखी हनुमान नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, शेळगी, सोलापूर. ज्या अर्थी मला प्राप्त महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 कलम 156 व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1961 चे नियम 107 अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारान्वये तसेच मा. सहा. उपनिबंधक सहकारी संस्था सोलापूर यांच्या कडून प्राप्त झालेल्या कलम 101 च्या दाखल्यानुसार खालील नमूद कर्जदार/जामीनदारास नियमानुसार मागणी व जप्ती नोटीस पाठवून त्यांच्या राहत्या घरी जाउन जंगम मालमत्तेचा निरंक पंचनामा केलेला आहे. त्यांनतर त्यांच्या मालकीच्या स्थावर मालमत्तेचा 107 (10) नुसार जप्ती आदेश दिलेला आहे. संस्थेकडे गहाणखत/जप्त असणारी जप्त केलेली स्थावर मालमत्ता नियम 107 चे नियम (11) ड -1 नुसार नमुना झेड नोटीस देउन सदरील मालमत्तेचा प्रतिकात्मक ताबा घेतलेला आहे. विशेष करून ऋणको व तमाम नागरीकांना या नोटीसीद्वारे सावध करण्यात येते की, या स्थावर मालमत्तेबाबत कोणीही खरेदी विक्री, गहाण, दान, टाच, बोजा किंवा इतर हक्कात व्यवहार करून नये याउपर कोणीही कोणत्या प्रकारचा व्यवहार केल्यास तो श्री पंचमुखी हनुमान नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, शेळगी, सोलापूर यांचे खाली दर्शविलेल्या येणे बोजाची रक्कम व त्यावरील होणारे व्याज व वसुली खर्चास कायदेशीर रित्या अधिन रहावे लागेल याची नोंद घ्यावी. त्यांची खालील नमूद स्थावर मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे -

स्थावर मिळकतीचे वर्णन :

| अ. नं. | थकबाकीदाराचे/जाबदाराचे नाव व गाव | वसुली दाखला क्र व दिनांक | स्थावर मालमत्तेचे वर्णन | मिळकत/मालमत्ता क्र. | येणेबाकी रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सौ. नंदा राजेंद्र जाधव | 101/207/2023 दिनांक : 21/02/2024 | देगांव (944167) सोलापूर ULPIN - 13626034327 | भूमापन क्र. 31/1/अ | रू. 1,13,371/- अधिक दिनांक 19/08/2023 पासून रू. 72,024/- यावर 16 टक्के प्रमाणे वसूली दाखल्याप्रमाणे खाते बेबाक होईपर्यंत व्याज |
| 2 | श्री. मधुकर मारुती भोसले | 101/210/2023 दिनांक : 21/02/2024 | देगांव, ता. उत्तर सोलापूर PUID - 87493421718 | नगर भूमापन क्र. 122 | रू. 1,13,592/- अधिक दिनांक 20/09/2023 पासून रू. 74,900/- यावर 16 टक्के प्रमाणे वसूली दाखल्याप्रमाणे खाते बेबाक होईपर्यंत व्याज |

ही उद्घोषणा प्रसिध्द झाल्यापासून 30 दिवसाच्या आंत आपली थकबाकी व त्यावरील पुढील होणारे व्याज व इतर खर्चासह थकबाकी रक्कम संस्थेकडे भरणा करून त्याची रितसर पावती घ्यावी तसेच कर्ज खाते बेबाक प्रमाणपत्र घ्यावे अन्यतः कायद्यातील तरतुदीप्रमाणे कारवाई केली जाईल, म्हणजेच आपल्या स्थावर मालमत्तेचा ताबा/कब्जा प्रत्यक्ष घेण्यासाठी मा. जिल्हा दंडाधिकारीसो तथा मा. जिल्हाधिकारीसो, सोलापूर यांचेकडे रितसर प्रकरण दाखल करून व पुढील योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

ही नोटीस प्रसिध्दीस दिली असे : 29/03/2025

शिक्का

हिप्परगे सुजाता मल्लिकार्जुन,
विशेष वसुली व विकी अधिकारी,
सोलापूर जिल्हा सह. पत. फेड. मर्या, सोलापूर.

www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### चेन्नई, मदुराई कनिष्ठ पुरुष हॉकी विश्वचषकाचे सह-यजमान

**नवी दिल्ली :** हॉकी इंडियाने शुक्रवारी तामिळनाडूतील चेन्नई व मदुराईला २८ नोव्हेंबर ते १० डिसेंबर



२०२५ दरम्यान होणाऱ्या आगामी कनिष्ठ पुरुष हॉकी विश्वचषकाचे यजमान शहर म्हणून घोषित केले. ही प्रतिष्ठित स्पर्धा दोन शहरांमध्ये खेळवण्याची ही पहिलीच वेळ असेल. १९७९ मध्ये सुरू झालेल्या दोन आठवड्यांच्या हॉकी स्पर्धेच्या इतिहासात पहिल्यांदाच २४ संघ प्रतिष्ठित जेतेपदासाठी सहभागी होतील.भारतात होणारा हा तिसरा कनिष्ठ पुरुष विश्वचषक असेल. या प्रतिष्ठित स्पर्धेच्या मागील आवृत्त्या २०२१ मध्ये भुवनेश्वर, ओडिशात आणि २०१६ मध्ये लखनौ, उत्तर प्रदेशात खेळवल्या गेल्या होत्या ज्या भारताने जिंकल्या होत्या. आगामी एफआयएच कनिष्ठ पुरुष हॉकी विश्वचषक स्पर्धेचे आयोजन करणे हॉकी इंडियासाठी खूप अभिमानाची गोष्ट आहे आणि या स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी अतुलनीय सहकार्य करणाऱ्या मुख्यमंत्री, तामिळनाडू सरकार, एमके स्टॅलिन आणि क्रीडा मंत्री उदयनिधी स्टॅलिन यांचे मी आभार मानतो, असे हॉकी इंडियाचे अध्यक्ष डॉ. दिलीप तिर्की म्हणाले.

### अल्वेस लैंगिक अत्याचाराच्या आरोपातून निर्दोष मुक्त

**कॅटालोनिया :** स्पेनच्या कॅटालोनिया प्रदेशातील सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी ब्राझीलचा फुटबॉलपटू दानी अल्वेस याला लैंगिक अत्याचाराच्या आरोपाखाली अपीलात दिलेली शिक्षा रद्द केली असल्याचे सांगितले. मूळ निर्णयात ''विसंगती आणि विरोधाभास'' आहे, असे न्यायालयाने म्हटले व दानी अल्वेसची निर्दोष मुक्तता केली. गत वर्षी फेब्रुवारीमध्ये अल्वेसला २०२२ मध्ये बार्सिलोनाच्या एका नाईटक्लबच्या शौचालयात एका महिलेवर बलात्कार केल्याबद्दल दोषी ठरवण्यात आले होते आणि त्याला साडेचार वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली होती. कातालान उच्च न्यायालयाने निकाल रद्द करताना म्हटले आहे की, व्हिडीओ रेकॉर्डिंगद्वारे वस्तुनिष्ठपणे पडताळता येणाऱ्या तथ्यांचा संदर्भ देताना कथित पीडितेच्या साक्षीत विश्वासार्हता नव्हती व ते वास्तवाशी जुळत नाही. अल्वेसला त्याच्या अपीलच्या निकालाची वाट पाहत असताना आधीच १ दशलक्ष युरो (१.०८ दशलक्ष) जामिनावर तुरुंगातून सोडण्यात आले होते. अपील न्यायालयाने सर्व प्रवास निर्बंध उठवल्यामुळे तो आता देश सोडून जाऊ शकतो.कथित पीडितेचे वकील एस्टर गार्सिया आणि अल्वेसचे वकील इनेस गार्डिओला यांनी टिप्पणीसाठी केलेल्या विनंतीला त्वरित प्रतिसाद दिला नाही.

### पॅरा ॲथ्लिट्सला सहानुभूती नको, संधी हवी : मंजुनाथ

**नवी दिल्ली :** सर्व स्टेडियम दिव्यांगांसाठी सुलभ असले पाहिजेत. रॅम्प, प्रसाधनगृहे, मैदानात प्रवेश, सर्व गोष्टींमध्ये सर्व स्टेडियममध्ये सुधारणा आवश्यक आहेत. आम्हाला सहानुभूती नको आहे, आम्हाला केवळ संधी हवी आहे. आम्हाला देशासाठी सर्वोत्तम कामगिरी करायची आहे व भरपूर पदके जिंकायची आहेत, असे पॅरा ॲथ्लिट मंजुनाथ एल. हिंदू म्हणाला. जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर झालेल्या खेलो इंडिया पॅरा गेम्स २०२५ मध्ये सहभागी झालेल्या पॅरा ॲथ्लिट मंजुनाथने राजधानीतील दिव्यांग खेळाडूंना उपलब्ध असलेल्या सुलभतेच्या पातळीबद्दल कौतुक केले.

# मुंबई, गुजरात विजयासाठी उत्सुक

## हार्दिक पांड्याच्या पुनरागमनाने मुंबई संघात चैतन्य ● गुजरात संघातही बदलाची शक्यता

◆ **अहमदाबाद, २८ मार्च**

शनिवारी आयपीएलच्या १८ व्या हंगामात दोन माजी विजेते - गुजरात टायटन्स आणि मुंबई इंडियन्स संघ आमने-सामने उभे ठाकणार आहे. दोन्ही संघांना चालू हंगामाची सुरुवात विजयाने करता आली नाही व आता दुसऱ्या सामन्यात आपले खाते उघडण्याचा प्रयत्न करतील. अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळल्या जाणाऱ्या या सामन्यात सर्वांचे लक्ष दोन्ही संघांच्या अंतिम एकादशवर असेल.



पहिल्या सामन्यातील पराभवानंतर संघ व्यवस्थापन अंतिम एकादशमध्ये बदल करू शकते. मागील सामन्यातील चुकांमधून शिकणे व आपल्या विजयाचे खाते उघडणे संघांसाठी महत्त्वाचे आहे. तथापि, एक संघ तरीही निराश होईल कारण केवळ एकच संघ जिंकेल. कोण जिंकेल हे ठरवण्यात अंतिम एकदश महत्त्वाची भूमिका बजावेल व म्हणूनच दोन्ही संघांचे कर्णधार आपले सर्वोत्तम संयोजन मैदानात उतरवण्याचा प्रयत्न करतील.

पहिल्या सामन्यात मुंबईला चेन्नई सुपर किंग्जविरुद्ध पराभव स्वीकारावा लागला. संघाचा नियमित कर्णधार हार्दिक पांड्या या सामन्यात खेळला नाही, कारण त्याच्यावर बंदी घालण्यात आली होती. गत हंगामात मुंबईच्या शेवटच्या सामन्यात संथ गतीने षटके टाकल्याबद्दल त्याच्यावर एका सामन्याची बंदी घालण्यात आली होती. या सामन्यात ही बंदी लागू करण्यात आली. तो गुजरातविरुद्ध पुनरागमन करेल. हा तोच संघ आहे ज्याला पांड्याने त्याच्या नेतृत्वाखाली पहिल्याच हंगामात विजेतेपद मिळवून दिले होते.

जर पांड्या आला तर रॉबिन मिंजला बाहेर जावे लागू शकते. संघात इतर कोणताही बदल दिसून येत नाही. पहिल्या सामन्यात संघाने ज्या खेळाडूंवर विश्वास व्यक्त केला होता, ते पुन्हा एकदा पाहता येतील. गेल्या सामन्यात खाते न उघडता बाद झालेल्या रोहित शर्माकडून संघाला मोठ्या अपेक्षा असतील. विल जॅक्स व रायन रिकेल्टन देखील तिथे असण्याची अपेक्षा आहे.

### दोन्ही संघांचे संभाव्य अंतिम एकादश

**मुंबई इंडियन्स :** हार्दिक पांड्या (कर्णधार), रायन रिकेल्टन, विल जॅक्स, सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा, नमन धीर, मिशेल सॅण्टनर, दीपक चहर, ट्रेंट बोल्ट, सत्यनारायण राजू.

**गुजरात टायटन्स :** शुभमन गिल (कर्णधार), साई सुदर्शन, जोस बटलर, ग्लेन फिलिप्स, राहुल तेवतिया, शाहरुख खान, साई किशोर, रशीद खान, कॅगिसो रबाडा, मोहम्मद सिराज.

**गुजरातचा अंतिम एकादश**

गुजरातला पंजाब किंग्जविरुद्ध पराभव स्वीकारावा लागला. या सामन्यात संघाची फलंदाजी मजबूत होती, पण गोलंदाजांनी निराशा केली. पंजाबच्या फलंदाजांनी भरपूर धावा केल्या. येथे गुजरातमध्ये बदल घडवून आणण्याची शक्यता आहे. मोहम्मद सिराज व कॅगिसो रबाडा खेळतील हे निश्चित आहे. अर्शद खानच्या जागी ईशांत शर्माला संधी मिळू शकते. साई सुदर्शन व जोस बटलरने शानदार खेळी करत अर्धशतके झळकावली. गिलनेही चांगली खेळी केली. शेर्फन रदरफोर्डने चांगली सुरुवात केली, पण नंतर त्याने पुन्हा लय गमावली. संघाने त्याचा वापर एक प्रभावशाली खेळाडू म्हणून केला. येथे संघ मुंबईविरुद्ध ग्लेन फिलिप्सला संधी देऊ शकतो. ◀(वृत्तसंस्था)

### आजचा सामना

गुजरात जायण्ट्स वि. मुंबई इंडियन्स
**स्थळ :** नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबाद
**वेळ :** सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

# गोलंदाजांना दिले जाते रोपटे




◆ **नवी दिल्ली, २८ मार्च**

आयपीएलमध्ये अनेक नवीन गोष्टी पाहायला मिळतात. या लीगमध्ये अनेक नियम आहेत जे प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासाठी आणि सामने रोमांचक बनवण्यासाठी आहेत. यावेळीही लीगमध्ये अनेक नियम लागू करण्यात आले आहे. तथापि, या हंगामात प्रेक्षकांचे लक्ष सादरीकरण समारंभातील एका विचित्र गोष्टीकडे जाते. सामन्यानंतर एका विशिष्ट खेळाडूला हा वनस्पती दिला जातो.

ही वनस्पती केवळ एका गोलंदाजाला देण्यात आली होती. आतापर्यंत सर्व सामन्यांमध्ये केवळ गोलंदाजालाच हे मिळाले आहे. कोणत्याही फलंदाजाला हा पुरस्कार मिळालेला नाही. यामागील कारण सामाजिक आहे.

सामन्यात सर्वाधिक डॉट बॉल टाकणाऱ्या गोलंदाजाला ही वनस्पती दिली जाते. म्हणजे ज्या चेंडूंवर एकही धाव झाली नाही. आयपीएलमध्ये येणाऱ्या ग्राफिक्समध्ये, डॉट बॉल दर्शवण्यासाठी हिरवा रंग देखील वापरला जातो. स्टेडियममधील टीव्ही स्क्रीनवर डॉट बॉलवरील झाडाचे ग्राफिक्स देखील दाखवले आहेत. हे बीसीसीआयच्या इंडियन ग्रीन इनिशिएटिव्हचा एक भाग आहे. बीसीसीआयने टाटा ग्रुपसोबत ही भागीदारी केली आहे, ज्याअंतर्गत प्रत्येक रिकाम्या चेंडूवर ५०० रोपे लावली जातील. याची सुरुवात आयपीएल-२०२३ च्या प्लेऑफमध्ये झाली. गत हंगामातही असेच घडले होते. सामन्यानंतर, सर्वाधिक डॉट बॉल टाकणाऱ्या गोलंदाजाची निवड केली जाते. बऱ्याच वेळा, बरोबरी होते, अशा परिस्थितीत विजेता इकॉनॉमी रेटच्या आधारे किंवा इतर अनेक वेगवेगळ्या पद्धतींनी ठरवला जातो. यानंतर, गोलंदाजाला १ लाख रुपये देखील दिले जातात. ◀(वृत्तसंस्था)

# शहरी विभागातून सिंधुदुर्ग संघ उपांत्य फेरीत

## मराठा प्रीमियर लीग २०२५ : ग्रामीण विभाग बी गटाचे साखळी सामने आज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

येथील विजापूर रोडवरील शासकीय मैदानावर दोन दिवसापासून सुरू असलेल्या मराठा प्रीमियर लीग २०२५ सीजन २ चे तिसऱ्या दिवशी शहरी विभागातील उर्वरित ४ संघाचे ६ साखळी सामने पार पडले व त्यातून सिंधुदुर्ग संघ उपांत्य फेरीत दाखल झाला असून त्याचा सामना ३० मार्चला शिवनेरी संघासोबत होईल.

साखळी फेरीच्या चौथ्या दिवशी ग्रामीण विभागातून कोणता संघ उपांत्य फेरीत जाईल हे चित्र आज स्पष्ट होणार असून त्याकरिता सांगोल्याचे महादेव गायकवाड यांचा प्रबळगड, पेनुर चे रणजीत चवरे यांचा अजिंक्यतारा, अकलूजचे श्रीराज माने पाटील यांचा लोहगड आणि पंढरपूरचे आनंद मेलगे यांचा विशालगड या संघात लढती होणार आहेत. संपूर्ण स्पर्धेकरिता सतीश सुरवसे यांनी चेंडू उपलब्ध करून दिले आहेत त्यांचे कडून आजच्या दिवसात तीन चेंडूत सलग




तीन षटकार लगावणाऱ्या खेळाडू सागर गव्हाणे यास चांदीची गणेशाची मूर्ती देऊन गौरविण्यात आले.

**संक्षिप्त धावफलक -**

**प्रतापगड :** ९६/२ (६) चेतक गोरे ३२, विनोद दांडगे ५० श्रेयस वाडकर १ बळी विजयी विरुद्ध **विजयदुर्ग :** ६५/३ (६) वैष्णव जावळे २६, विश्वजीत मुळीक १४ चेतक गोरे २ बळी, शहाजी भोसले १ बळी सामनावीर - चेतक गोरे

**सिंधुदुर्ग :** ७९/४ (६) आकाश चव्हाण ३८, विनोद गुंड १२ सागर गव्हाणे २ बळी, अक्षय हावळे जीवन निंबाळकर प्रत्येकी १ बळी विजयी विरुद्ध **राजगड :** ४९/६ (६) सागर गव्हाणे १२ तानाजी जाधव ४/३ बळी, गणेश जाधव आकाश चव्हाण कपिल जाधव प्रत्येकी १ बळी सामनावीर - आकाश चव्हाण

**सिंधुदुर्ग :** ६७/७ (६) विनोद गुंड अमर गवळी प्रत्येकी १३ आकाश चव्हाण ११, अवांतर १५ वैभव जाधव २ बळी, चेतक गोरे व सागर कापसे प्रत्येकी १ बळी विजयी विरुद्ध **प्रतापगड :** ६३/७ (६) सागर कापसे २८ विनोद दांडगे १० आकाश चव्हाण गणेश जाधव प्रत्येकी २ बळी, तानाजी जाधव कपिल जाधव प्रत्येकी १ बळी सामनावीर - आकाश चव्हाण

**विजयदुर्ग :** ७६/३ (६) अमर कारंडे ४२ श्रीकांत भोसले २४ राहुल जाटकर २१/३ बळी विजयी विरुद्ध **राजगड :** ७३/३ (६) सागर गव्हाणे ४२ अजय जगताप नाबाद १८ वैभव गवळी श्रेयस वाडकर अमर कारंडे प्रत्येकी १ बळी सामनावीर - अमर कारंडे

**प्रतापगड :** १०९/२ (६) चेतक गोरे ५७ सागर कापसे २६ वैभव जाधव १७ बाळकृष्ण काशीद व अमर कारंडे प्रत्येकी १ बळी विजयी विरुद्ध **विजयदुर्ग :** ५५/३ (६) आदित्य तिकटे १६ श्रेयस वाडकर नाबाद १० अमर कारंडे १५ वैभव जाधव २ बळी चेतक गोरे १ बळी सामनावीर - चेतक गोरे

**प्रतापगड :** ४७/९ (६) शहाजी भोसले १० आकाश चव्हाण १०/३ बळी, कपिल जाधव २ बळी, गणेश जाधव तानाजी जाधव प्रत्येकी १ बळी पराभूत विरुद्ध **सिंधुदुर्ग :** ४९/७ (५.५) संभाजी केत १९, विष्णु शिंदे १०, अमोल चौगुले नाबाद १३ चेतक गोरे १६/३ बळी, शहाजी भोसले १ बळी सामनावीर - आकाश चव्हाण

**आजचे सामने**

प्रबळगड विरुद्ध अजिंक्यतारा लोहगड विरुद्ध विशालगड

# सोलापूरच्या तिघांची महाराष्ट्र सॉफ्ट टेनिस संघात निवड

## विपश्यना सोनवणे, मृण्मयी गायकवाड, अजिंक्य वसपटे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

लुधियाना, पंजाब येथे २७ ते ३१ मार्च दरम्यान होत असलेल्या अठरावी सब -ज्युनिअर राष्ट्रीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेत येथील तिघांची निवड झाली आहे. विपश्यना सोनवणे, मृण्मयी गायकवाड, अजिंक्य वसपटे हे निवड झालेले खेळाडू आहे.



मुंबई येथे झालेल्या निवड चाचणी स्पर्धेतून त्यांची महाराष्ट्र सॉफ्ट टेनिस संघात निवड झाली. विपश्यना ही मागील तीन वर्षापासून महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत उत्कृष्ट कामगिरी करीत आहे. मृण्मयी हिने सोलापूर, पुणे व बारामती शालेय स्पर्धेत उत्कृष्ट खेळी करत सर्वांचे लक्ष वेधले. अजिंक्यने गोंदिया, सोलापूर, सातारा येथे झालेल्या राज्य स्पर्धेत रौप्य पदक प्राप्त केले आहे. बारामती येथे झालेल्या शालेय राज्यस्पर्धेत सहभाग नोंदविला होता. या कामगिरीच्या जोरावर त्यांची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. या खेळाडूंना सुधीर सालगुडे, महेश झांबरे, शिवाजी वसपटे, चंद्रकांत वाघमोडे, बालाजी केदार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे सोलापूर जिल्हा संघटनेचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, सचिव प्राध्यापक संतोष गवळी, जिल्हा लॉन टेनिस संघटनेचे मानद सचिव राजीव देसाई यांनी अभिनंदन केले.

# सोलापूर संघ पहिल्या डावाच्या आघाडीवर विजयी



अथर्व जगताप | सुमित अहीवळे | विरांश वर्मा | आदर्श राठोड

## १९ वर्षाखालील निमंत्रित क्रिकेट : अथर्व जगताप सामनावीर

## अहीवळे, शर्मा व राठाडे यांची शानदार अर्धशतके

**सोलापूर, दि. २८ मार्च-**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे वतीने छत्रपती संभाजीनगर येथे सुरू असलेल्या १९ वर्षाखालील मुलांच्या आंतरजिल्हा निमंत्रित क्रिकेट स्पर्धेत सोलापूर जिल्हा संघाने सलामीच्या सामन्यात झोराष्ट्रीयन क्लबचा पहिल्या डावाच्या आघाडीवर विजय मिळविला. पाच बळी टिपणारा अथर्व जगताप यास सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना झोराष्ट्रीयन क्लबने ५७ षटकात सर्वबाद १८० धावा केल्या. त्यांच्याकडून राहुल पाटील ३७, अर्हम जैन २९, प्रथमेश खोत २२ धावा तर प्रिविराज जाधव याने २१ धावा केल्या. सोलापूरकडून अथर्व जगताप याने ५ तर अभय लवांडने २ तर समर्थ दोरनाल व श्रीनिवास कुलकर्णी यांनी प्रत्येकी एक बळी टिपला. सोलापूरने पहिल्या डावात ७५ षटकात सर्वबाद २७१ धावा केल्या गेल्या. सुमित अहीवळे याने सर्वाधिक ७७ धावा केल्या. विरांश वर्मा ७४ आणि आदर्श राठोड याने ५६ धावा करीत त्याला साथ दिली. झोराष्ट्रीयन संघाकडून कर्णधार पार्थ पवार याने ४ बळी तर ओंकार कदम याने २ गडी बाद केले. झोराष्ट्रीयन संघाने दुसऱ्या डावात ३६ षटकात ५ गडी बाद १०४ धावा केल्या. यामधे पार्थ गनबावले २८ व अर्हम जैन याने २३ धावा केल्या. सोलापूरकडून समर्थ कोळेकर याने ३ गडी बाद केले.

# महिला गटात धाराशिव, किशोरी गटात सांगलीला विजेतेपद

## कै. भाई नेरुरकर चषक राज्य खो-खो स्पर्धा

## कोल्हापूरला दुहेरी मुकुट

**इचलकरंजी, दि. २८ मार्च-**

कोल्हापूरने पुरुष व किशोर गटात विजेतेपद पटकावित कै. भाई नेरूरकर चषक राज्य खो-खो स्पर्धेत दुहेरी मुकुट संपादिला. सांगलीने किशोरी गटातून तर धाराशिवने महिला गटातून विजेतेपदाचा मान मिळविला.

राज्य शासनाच्या क्रीडा व युवक सेवा खात्याच्या वतीने इचलकरंजी (जि. कोल्हापूर) येथील विठ्ठल राम जी शिंदे शाळा क्रमांक २१च्या मैदानावर ही स्पर्धा पार पडली. किशोर गटातील अंतिम सामन्यात मध्यंतराच्या ११-१० अश्या एका गुणाच्या निसटत्या आघाडीनंतर कोल्हापूरने बहारदार खेळी करीत सांगलीचा १६-१५ असा पराभव केला. कोल्हापूरकडून रुद्र यादव (१.३०, १.२० मिनिटे संरक्षण), राजवीर वेर्णेकर (५ गडी), आर्यन कुकडे (४ गडी), देवराज यड्रावे (१.३० मिनिटे व २ गडी) यांनी बहारदार खेळी केली. सांगलीकडून सार्थक हिरेकुर्ब (२.१० मिनिटे व ५ गडी), सोहम



पाडळे (१.०० व ३.०० मिनिटे), दक्ष जाधव (२.०० मिनिटे व १ गडी) यांनी कामगिरी केली.

किशोरी गटाच्या अंतिम सामन्यात सांगलीने पुण्यावर ११-८ असा एक डाव राखून ३ गुणांनी दणदणीत विजय मिळविला. मध्यंतरासच त्यांनी ११-२ अशी निर्णायक आघाडी घेतली होती. सांगलीच्या अनुष्का तामखडे हिने २.४० मिनिटे संरक्षण करीत आक्रमणात ३ गडी बाद करीत अष्टपैलू खेळी केली. श्रावणी तामखडे (२.३० मिनिटे), वेदिका तामखडे (१.५०,२.१० मिनिटे व १ गुण) यांनी संरक्षणाची बाजू सांभाळली. पुण्याकडून अपर्णा वर्धे (१.३० मिनिटे), रोहिणी सुलाखे (१.१० मिनिटे व २ गडी) व पूजा बिराजदार हिने (१.१० मिनिटे) यांचे प्रयत्न अपुरे पडले.

महिला गटातील अंतिम सामन्यात धाराशिवने पुण्यास १२-१० असे २ गुण व ४.३० मिनिटे राखून हरविले. मध्यंतरासच धाराशिवने ८-५ अशी ३ गुणाची निर्णायक आघाडी घेतली होती. संध्या सुरवसे (३.१०, २.१० मिनिटे व ३ गडी), अश्विनी शिंदे (१.००, २.०० व ३ गडी) व प्रीती काळे (१.२०, १.३० मिनिटे व १ गडी) हे धाराशिवच्या विजयाचे शिल्पकार ठरले. पुण्याकडून प्रियंका इंगळे (२.००, १.३० मिनिटे), कृतिका राठोड (३ गडी) व श्वेता वाघ (१.००, १.०० मिनिटे व १ गडी) यांची लढत एकाकी ठरली.

पुरुषांच्या अंतिम सामन्यात निर्धारित वेळेतील बरोबरीनंतर कोल्हापूरने मुंबई उपनगरवर जादा डावात १२-११ अशी एका गुणाने मात केली. मध्यंतरास मुंबई उपनगरकडे ११-९ अशी आघाडी होती. त्यानंतर कोल्हापूरने बहारदार खेळी करीत मुंबई उपनगरला १८-१८ असे बरोबरीत रोखले होते. कोल्हापूरकडून अर्णव पाटणकर, सौरभ आडावकर, मनोज पाटील, विराज गळतगे, रोहन कोरे व श्रीराम कांबळे यांनी तर मुंबई उपनगरकडून प्रतीक देवरे व ओंकार सोनवणे यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.

पारितोषिक वितरण उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी क्रीडामंत्री दत्ता भरणे, माजी मंत्री प्रकाश आवाडे, आमदार राहुल आवाडे, आमदार अशोकराव माने, आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे, इचलकरंजी महानगरपालिकेच्या आयुक्त पल्लवी पाटील, क्रीडा उपसंचालक माणिक पाटील आदी उपस्थित होते.

### या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू

* **किशोर :** अष्टपैलू - सार्थक संजय हिरेकुर्ब (सांगली), संरक्षक - रुद्र उत्तम यादव (कोल्हापूर), आक्रमक - ओजस उमेश बंडगर (कोल्हापूर).
* **किशोरी :** अष्टपैलू - अनुष्का आबासो तामखडे (सांगली), संरक्षक- श्रावणी रामहरी तामखडे (सांगली), आक्रमक -अपर्णा विशाल वर्धे (पुणे).
* **पुरुषः** अष्टपैलू - रोहन बापूसो कोरे (कोल्हापूर), संरक्षक - ओमकार श्रीकांत सोनवणे (मुंबई उपनगर), आक्रमण - सौरभ शिवाजी आडावकर (कोल्हापूर).
* **महिला :** अष्टपैलू - अश्विनी आप्पासाहेब शिंदे (धाराशिव), संरक्षक - संध्या सौदागर सुरवसे (धाराशिव), आक्रमक - प्रियांका हनुमंत इंगळे (पुणे).

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/

# भक्तनिवासात नोंदणीसाठी संगणक प्रणाली विकसित

## ● विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांची माहिती; भाविकांना करता येणार ऑनलाईन नोंदणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २८ मार्च-**

श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणा-या भाविकांना सुसज्ज निवास व्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने पंढरपूर शहरात श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवासाची उभारणी करण्यात आली आहे. या भक्तनिवासातील खोल्या नोंदणी करण्यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात आली असून, मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावर भाविकांना ऑनलाईन नोंदणी करता येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.



मंदिर समितीने कार्यालयीन कामकाज गतीमान करण्याच्या दृष्टीने व भाविकांना ऑनलाईन सोई सुविधांच्या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व संगणक प्रणाली सेवाभावी तत्वावर मोफत उपलब्ध करून देण्याची तयारी टिसीएस कंपनीने दर्शविली होती. त्याबाबत मंदिर समितीची दिनांक ३ मार्च रोजी सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीमध्ये टिसीएस कंपनीकडून संगणक प्रणाली विकसित करून घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास येथे ऑनलाईन पध्दतीने खोल्या नोंदणी करण्यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे. आता भाविकांना https://online.vitthalrukminimandir.org.in//login या मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून घरबसल्या खोली नोंदणी करता येणार आहे.

मंदिर समितीचे पंढरपूर शहरात सर्व्हे नं.५९ येथे सुसज्ज भक्तनिवास इमारत असून, यामध्ये गरम पाण्याची सोय, उद्वाहन, प्रशस्त पार्कींग, मिनरल वॉटर, वातानुकुलित यंत्रणा, तबक उद्यान, उपहारगृह, अग्निशमन यंत्रणा, सुरक्षा, स्वच्छता व्यवस्था व इतर अनुषंगीक सोई सुविधा उपलब्ध असून, या इमारतीस ग्रीन बिल्डींग प्रमाणपत्र प्राप्त आहे. ऑनलाइन नोंदणीसाठी काही अडचणी आल्यास भक्तनिवास येथून नोंदणी करून देण्यास मदत व आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात येईल. याबाबतची अधिक माहिती, अटी व शर्ती मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच अधिक माहितीसाठी मंदिर समितीच्या ०२१८६-२२८८८८ या क्रमांकावर भाविकांनी संपर्क साधावा. भाविकांनी मंदिर समितीच्या भक्त निवास येथे निवासासाठी वरील अधिकृत संकेतस्थळावरून किंवा ऑफलाईन पद्धतीने खोली काऊंटर बुकिंग करावे असे आवाहन यावेळी श्रोत्री यांनी केले.

---

## संक्षिप्त वृत्त



### विमानतळाला उमाजी राजे यांचे नाव द्या; जय मल्हार क्रांती संघटनेकडून मागणी

**टेंभुर्णी, दि.२८ मार्च-**

पुरंदर तालुक्यातील नियोजित पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळाला आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांचे नाव द्यावे या मागणीसाठी जय मल्हार क्रांती संघटनेचे अध्यक्ष दौलत शितोळे व अंकुश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलन करण्यात आले. सासवड (ता. पुरंदर) येथील शिवतीर्थ चौकातील महात्मा फुले, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून तहसील कार्यालयपर्यंत मोर्च्याचे आयोजन केले होते. मोर्चाने तहसील कचेरी येथे यासंदर्भातील निवेदन पुरंदरचे नायब तहसीलदार संदीप पाटील यांना दिले. विधान परिषदेचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी यासंदर्भात विधान परिषदेमध्ये मागणी मांडली असून त्यावर शासनाने विचार करून आद्य क्रांतिवीर राजीव उमाजी नाईक आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नाव द्यावे, असे न झाल्यास विमानतळ नाव देण्यासाठी राज्यभर तालुकास्तरावर मोर्चे आंदोलन काढली जातील असे दौलत शितोळे, अंकुश जाधव यांनी सांगितले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष अंकुश जाधव, सल्लागार समितीचे अध्यक्ष गणपत शितलकल, राज्याचे प्रवक्ते गंगाराम जाधव, सचिव उमेश मंडले, विष्णू भोसले, नाना ताथवडकर, सुनील जाधव, सागर जाधव, गणेश खाडे, साहेबराव जाधव, गणेश खाडे, अनिल विखे, सुहास काशीद, गंगुबाई नाईक, कैलास धिवार यांनी विचार व्यक्त केले. यावेळी संजय भाऊ चव्हाण, उमाजी बोडरे, अजित शिरतोडे, किरण जाधव, बापू चव्हाण, राहुल मदने, अविनाश चव्हाण, चांगदेव माने, भैय्या चव्हाण उपस्थित होते. यावेळी खंडू जाधव यशवंत बंडलकर निलेश जाधव, दादासाहेब किसन, अशोक चव्हाण, अमोल मदने यांनीही विचार व्यक्त केले.

### सुलेरजवळगेत बिरलिंगेश्वरची यात्रा आजपासून

**सोलापूर, दि.२८ मार्च-**

अक्कलकोट तालुक्यातील सुलेरजवळगे येथे श्री. बिरलिंगेश्वर देवस्थान सुलेरजवळगे हे जागृत देवस्थान असून सदरील मंदिर पुरातन आहे. बिरलिगेश्वर देवाची दरवर्षी गुढीपाडवा दरम्यान यात्रा साजरा करण्यात येतो. शनिवार दि.२९ मार्च रोजी (अमावस्या) सायं. ६ वाजता श्री विरलिंगेश्वर पालखी सुलेरजवळगे व श्री महालिंगराया पालखी राजूर (ता. द. सोलापूर) या देवांचे गुरु शिष्य पालखी भेट व रात्री १०.०० वा. श्री केंचराया मुत्या ढोळ्ळीन गायन संघ, सुलेरजवळगे मुख्य गायक श्री आनंद अर्जुन व श्री बिरलिंगेश्वर ढोळ्ळीन गायन संघ, कंदलगांव ता. द. सोलापूर मुख्य गायिका अंजली यांचे ढोलकीवरील गायन कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आलेली आहे. रविवार दि. ३० मार्च रोजी पहाटे ३ वाजता श्रीशैल घोडके (महाराया) मौजे हत्तरसंग (ता.द. सोलापूर) व सिध्दप्पा पुजारी (महाराया) मौजे टाकळी (ता. द. सोलापूर) यांच्या हस्ते कुमार बिरण्णा सरवदे (महाराया) यांचे पट्टाअभिषेक धार्मिक विधी कार्यक्रम व पहाटे ५ वाजता बिरलिगेश्वर व जेटिंगराया देवास महाअभिषेक विजयपूर येथून आणलेले फुल अर्पण व महाआरती होईल. सकाळी १० वाजता श्री बिरलिंगेश्वर ढोकळीन गायन संघ, शिराढोण (ता. चडचण, जि. विजयपूर) मुख्य गायक विजयकुमार, श्री. गिरमल मास्तर, शिरढोण व श्री. अमोगसिध्द ढोकळीन गायन संघ, लमाणहट्टी ता. चडचण, जि. विजयपूर मुख्य गायक श्री. तुकाराम महाराज, लमाणहट्टी यांचे ढोलकीवरील गायन कार्यक्रम तसेच सायं. ६.०० वा. भाकणूक व सायंकाळी ७ वाजता गावातून पालखी मिरवणूक होणार आहे.

### संघर्ष सेनेच्या प्रदेश सचिवपदी तम्मेवार



**सोलापूर, दि. २८ मार्च-**

संघर्ष सेनेच्या प्रदेश सचिवपदी मनोजकुमार तम्मेवार यांची निवड करण्यात आली. संघटनेचे संस्थापक शेखर बंगाळे यांच्या अध्यक्षतेखाली ही निवड करण्यात आली. यावेळी संघर्ष सेनेचे युवा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर पाटील, जिल्हाध्यक्ष निखिल घोडके, संदीप कांबळे, गौरव पवार, राहुल सावंत, रणजीत मळगे, लक्ष्मीकांत शिवणगी उपस्थित होते.

### गुढी पाडव्यानिमित्त महिलांची बाईक रॅली

**बार्शी, दि. २८ मार्च-**

हिंदू नववर्षानिमित्त व गुढी पाडव्या दिवशी श्री भगवंत मंदीर येथून दुपारी साडेचार वाजता महिलांच्या मोटारसायकल भव्य रॅलीला सुरुवात होणार असून सर्व महिलांनी पारंपरिक पोशाखात येऊ या रॅलीमध्ये सहभागी व्हावे, असे इनरव्हीलच्या अध्यक्ष व हिंदू महिलांनी केले आहे.

---

## निधन वृत्त

### मारुती मोहिते



**अकलूज, दि. २८ मार्च-**

उपळाई खुर्द (ता. माढा) येथील मारुती संभाजी मोहिते (वय ८५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पाश्चात पत्नी, मुलगी ,मुलगा, सून ,नातवंडे असा मोठा परीवार आहे. माळशिरस तालुक्याचे माजी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रामचंद्र मोहिते यांचे ते वडील होत.

### महादेवी वठारे



**सोलापूर, दि. २८ मार्च-**

मोहिते नगर येथील नवोदय टेरेस येथील रंगकर्मी नामदेव वठारे यांच्या पत्नी महादेवी नामदेव वठारे (वय ८०) यांचे पुण्यात अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंड असा परिवार आहे. गुरुनाथ वठारे यांच्या त्या मातोश्री होते.

### शहाजी मदने-पाटील



**पिलीव, दि. २८ मार्च -**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील शहाजी शंकर मदने-पाटील यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते ६० वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते माजी उपसरपंच रणजित पाटील यांचे ते वडील होत.

---

# डॉक्टरांनी सामाजिक बांधिलकी जपावी

## ● जेऊर येथे आ.सुरेश धस यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२८ मार्च-**

रुग्णाची आर्थिक स्थिती पाहून सामाजिक बांधिलकी जपत गोरगरीब गरजू रुग्णांच्या बाबतीत डॉक्टरांनी उपचार शुल्क कमी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी जेऊर (ता. करमाळा) येथे केले.

येथे डॉ. अश्विनी रोकडे यांनी सुरू केलेल्या आधुनिक उपचार असलेल्या दातांच्या रूग्णालयाच्या उद्घाटनप्रसंगी आमदार धस बोलत होते. यावेळी मकाई कारखान्याचे माजी अध्यक्ष दिग्विजय बागल, जेऊरचे सरपंच पृथ्वीराज पाटील, अशोक भोसले महाराज , साहेबराव रोकडे, दत्ताभाऊ जेवे-पाटील, युवराज रोकडे, रामेश्वर तळेकर, शहाजीराव देशमुख, पांडुरंग जाधव, सोमनाथ रोकडे, सुहास रोकडे, भाजपाचे तालुका अध्यक्ष सचिन पिसाळ, शुभम बंडगर, गणेश तळेकर, अतुल गोडगे, रणजीत शिंदे, अक्षय सरडे यांच्यासह जेऊर व वांगी परिसरातील लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जेऊर सारख्या ग्राम ीण भागात अत्याधुनिक सुविधा देणाऱ्या वैद्यकीय सेवा उपलब्ध होत आहेत ही चांगली गोष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. जेऊर ते आष्टी रेल्वे मार्गाच्या कामासाठी आपण मुख्यमंत्र्याकडे पाठपुरावा या मतदारसंघातील खासदार व आमच्या मतदारसंघातील खासदार निश्चित प्रयत्न करतील असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. विजय रोकडे यांनी केले. डॉ अश्विनी रोकडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.



**वाल्मिक कराडच्या सांगण्यावरून संतोष देशमुख यांचा खुन केल्याची कबुली आरोपींनी या प्रकरणात दिलेली असल्याने या खुनाचा मुख्य सुत्रधार आकाच असल्याचे सिद्ध झाले असल्याचे मत आमदार सुरेश धस यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले.**

---

# सकारात्मकता जपून कार्यप्रवण होण्याची गरज

## ● डॉ. राहुल पालके; भावनिक व मानसिक आरोग्यावर व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २८ मार्च-**

आधुनिक कालखंडात माणसाचे जीवन गुंतागुंतीचे व धकाधकीचे बनलेले आहे. अशा परिस्थितीत मानसिक संतुलन ठेवून जीवन जगता आले पाहिजे. छोट्या-छोट्या गोष्टींमधून आनंद मिळवता येतो. आयुष्य जगताना सकारात्मक विचार ठेवून कार्यप्रवण होण्याची गरज आहे. जीवनात यश मिळविण्यासाठी कित्येक वर्षे लागतात. मातीची निर्मिती होण्यासाठी कित्येक वर्षे लागतात पण जीवनाची माती होण्यासाठी क्षण पुरेसा असतो, असे प्रतिपादन श्री शिवाजी महाविद्यालय बार्शीचे प्रा. डॉ. राहुल पालके यांनी केले.

यिन सकाळ व बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मानसिक व भावनिक आरोग्य या मार्गदर्शनपर व्याख्यानात ते बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बी.पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज बार्शीचे प्राचार्य डॉ. एस.बी. करंडे उपस्थित होते. याप्रसंगी आक्यूएससीचे सम न्वयक डॉ. बाळासाहेब लांडे, प्रा. किरण चपटे हे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमापूजनाने झाली. डॉ. पालके यांनी मानसिक व भावनिक आरोग्य याबद्दल मार्गदर्शन करताना आजची परिस्थिती व विद्यार्थ्यांचे विश्व याबद्दल चिकित्सक मांडणी केली. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना हात घालताना त्यांनी आत्महत्या या विषयाची दाहकता प्रस्तुत करीत त्यावर विविध स्तरांमधून उपायोजना करण्याचे गरजेचे आहे, असे मत मांडले. याप्रसंगी डॉ. पालके यांनी महाविद्यालयाला अंगणातून नभांगणात व निशिगंध ही पुस्तके विद्यार्थ्यांना भेट दिली. प्रास्ताविक क्षितिजा गायकवाड यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय शिवानी पवार यांनी केला. सूत्रसंचालन यश रणसुभे यांनी केले तर आभार नम्रता चव्हाण यांनी मानले. निखिल रसाळ व सनी उबाळे यांनी तांत्रिक सहकार्य केले. याप्रसंगी पवार, ढगे, माळी, लिंगे उपस्थित होते.

---

# जिनियस अबॅकस परीक्षेत जेऊरच्या गुणवंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२८ मार्च-**

प्रो ऍक्टिव्ह अबॅकसद्वारे गणेश कला क्रीडा मंच स्वारगेट पुणे येथे झालेल्या नॅशनल अबॅकस स्पर्धेत जेऊर जिनियस अबॅकस क्लासेसच्या २५ विद्यार्थ्यांनी यश मिळवले.

रिजनल अबॅकस परीक्षेत तेजस्विनी भिलारे हिने सहा मि निटात शंभर गणिते अचूक सोडवून प्रथम तर श्रीजय मदने याने ९८ गणिते सोडवत द्वितीय क्रमांक मिळवला. तसेच वेदांत गोडगे, प्रांजली भिलारे यांनीही द्वितीय क्रमांक मिळवला. जान्हवी शहा तृतीय, श्रेया मारकड, श्रुतिका पोटे, श्रेया पोटे चतुर्थ व अंजली भिलारे हिचा पाचवा क्रमांक आला. जिनियस अबॅकस क्लासचे अथर्व



पोटे, स्नेहल पोटे, तेजस भिलारे, वैभव भिलारे, रीया चौगुले, श्रुती गुंडगिरे, अवनीश गुड, मोहम्मद साद शेख, पृथ्वीराज वाघमोडे, उत्कर्ष मंजरतकर, तनिष्का राखुंडे, आराध्या वेदपाठक, उमेरा फकीर या सर्वांनी गोल्ड मेडल मिळवून यश संपादन केले. या सर्वचा सत्कार यश कल्याणी सेवाभावी संस्थेत २२ मार्च रोजी संपन्न झाला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अतुल दाभाडे, डॉ. निलेश मोटे, प्रा. विष्णू शिंदे, प्रा जयेश पवार, पत्रकार सिद्धार्थ वाघमारे, डॉ. स्वाती बिले, सौ, राजकुंवर पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष कल्याणी सेवाभावी संस्थेचे प्रा.गणेश करे पाटील होते. कार्यक्रमात मुलांनी अबॅकस डेमोचे सादरीकरण केले. यामध्ये तेजस्विनी भिलारे, वैभव भिलारे, श्रीजय मदने, प्रांजली भिलारे, अथर्व पोटे, श्रेया पोटे, श्रेया मारकड, वेदांत गोडगे यांनी अतिशय सुंदर डेमो सादरीकरण केले. तसेच तसेच जान्हवी शहा, तेजस भिलारे, श्रुती गुंडगिरे, तेजस्विनी भिलारे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. पालकांमधून डॉ. स्नेहल शहा, रेश्मा गोडगे, निशा मदने यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

क्लासच्या संचालिका अंकिता वेदपाठक यांनी मुलांच्या यशाबद्दल क्लास तर्फे रायटिंग पॅड बक्षीस म्हणून दिले. सूत्रसंचालन व आभार अंकिता वेदपाठक यांनी मानले.

---

# गुढीपाडव्याच्या दिवशी वृत्तपत्र विक्री बंदचा इशारा

## ● बार्शी शहर वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या बैठकीत निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २८ मार्च-**

बार्शी शहर वृत्तपत्र विक्रेत्याच्या बैठकीत पश्चिम महाराष्ट्र संघटन सचिव शाम थोरात यांच्या अध्यक्षतेखाली व बार्शी शहर संघटनेचे अध्यक्ष सचिन बाबर यांच्या उपस्थितीत गुढीपाडव्याच्या दिवशी वृत्तपत्र विक्री बंद ठेवण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

अनेक वर्षांपासून ३० टक्के कमिशन द्या, याबाबत वृत्तपत्र कंपनीकडे मागणी केली आहे. परंतु याकडे अद्याप लक्ष दिले नाहीत व त्यामुळे व्यवसाय बंद करण्याच्या मनस्थितीत बरेच वृत्तपत्र विक्रेते आहेत. याबाबतची मागणी जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटनेने ही केली आहे व त्याची दखल न घेतल्यास येत्या ३० मार्च गुढीपाडव्या दिवशी बार्शी शहर वृत्तपत्र विक्री बंद करण्याचा इशारा सर्वानुमते बैठकीत घेण्यात आला. यावेळी जे पेपर ३० टक्के कमिशन देतील याचाच विचार करावा लागेल, असे संघटनेचे अध्यक्ष सचिन बाबर यांनी मत व्यक्त केले. यावेळी वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे ताहेर काझी, सोमनाथ गाढवे, सादिक शेख, बाबा जाधव, बंडू नागटिळक, सचिन शेटे, सचिन साबळे,शरद काकडे आदी उपस्थित होते.

---

# लाच प्रकरणामुळे अक्कलकोट भूमी अभिलेख कार्यालय चर्चेत

**▶▶ सहा महिन्यात दोघे अडकले**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २८ मार्च-**

गेल्या सहा महिन्यात तालुका भूमी अभिलेख कार्यलयात लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या धाडीत दोघे कर्मचारी अडकल्याने तालुक्यात याची चर्चा रंगली आहे.

येथील उपअधिक्षक हे गेल्या वर्षभरापासून बदलीच्या प्रयत्नात असल्याने त्यांचे कार्यालयाकडे लक्ष नाही. त्यामुळे येथे गेल्या सहा महिन्यात दोन कर्मचारी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयाकडून धाडीत अडकले. यामध्ये भुमापक, लिपिकाचा समावेश आहे. तालुक्यात राष्ट्रीय महामार्गाचे काम, शहरातील सत्ता प्रकार सी, १ व २ वर्ग जमीनी, मैंदर्गी शहरात नविन मालमत्ता उतारे या कामांसह शेती, प्लॉट म ोजणी, हद्द कायम करणे या कामी मालमत्ता धारक, शेतकऱ्यांची प्रचंड गर्दी तालुका भूमी अभिलेख कार्यालयात होत आहे. प्रत्येकास लवकर काम व्हावे वाटते. त्यामुळे तेथील कर्मचारी लवकर काम करण्यासाठी अव्वा च्या सव्वा रक्कमेची मागणी खुलेआम करतानाचे चित्र आहे. अनेकांना हे न पटणारे जरी असले तरी नाईलाज होतो. अनेकजण चिरीमि री देऊन तत्काळ काम करून घेतात. येथील कर्मचाऱ्यांची भूमिका मुजोर झाली आहे. अशा वागण्याला कांटाळलेले नागरिक लाचलुचपतकडे जातात. त्यातूनच लाचलुचपत प्रतिबंधक कार्यलयाच्या धाडीच्या माध्यम ातून उद्रेक होताना दिसत आहे, उपअधिक्षक हे कार्यलयात दररोज केवळ काही तास उपस्थित असतात. बदलीने त्रस्त उपअधिक्षक यांच्या स्व कार्यप्रणालीमुळे भुमी अभिलेख कार्यालयातील अनेक 'अर्थपुर्ण ' किस्से नागरिकातुन चर्चीले जात आहेत.

---

# रोटरी क्लब जिल्हा मंडळावर डॉ. प्रशांत मोरे, रघुनाथ जाधव

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. २८ मार्च -**

करकंब रोटरी क्लबचे संस्थापक अध्यक्ष डॉ.प्रशांतकुमार मोरे यांची डिस्ट्रिक्ट डायरेक्ट चेअरमनपदी निवड करण्यात आली असून सन २०२५ -२६ या वर्षाकरिता डायबिटीस केअर या विषयाचा कार्यभार सोपविण्यात आला आहे. रघुनाथ जाधव यांची डिस्ट्रिक्ट चेअरमनपदी निवड करण्यात आली.

ट्राफिक नियम जागरूकता या विषयाचा कार्यभार सोपविला. रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ मधून या निवडी करण्यात आल्या.




या निवडीबद्दल करकंब रोटरीचे अध्यक्ष रोटरीयन डॉ.अक्षय मोरे, रो.सचिव शार्दुल शहा, रो.धनंजय इदाते, डॉ. विनोद शिंगटे, सुनील दुधाणे, सुनिता देशपांडे, शाम म हामुनी, लक्ष्मण जाधव, बीरुदेव पारेकर, राहुल पुरवत आदींनी अभिनंदन केले.

रोटरी इंटरनॅशनलची ७ लक्ष केंद्रित क्षेत्रे.१ शिक्षण आणि साक्षरता.२ स्वास्थ्य आणि शारिरीक कल्याण ३आर्थिक आणि समुदाय विकास.४ पाणी आणि स्वच्छता.५ आंतरराष्ट्रीय शांतता आणि संघर्ष निवारण.६ लिंग समानता ७ सामाजिक अशक्त वर्गासाठी मदत.या सर्व क्षेत्रांमध्ये रोटरी क्लबकडून विविध प्रकल्प राबवले जातात त्यामुळे सामाजिक बदल घडवले जातात.यामध्ये प्रत्येक विभागात काम करण्यासाठी डिस्ट्रिक्ट टीम बनवली जाते जी क्लबना प्रोजेक्ट करण्यामध्ये मदत तसेच मार्गदर्शन करते.

---

# स्व. संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांना फाशी होईपर्यंत लढा चालू राहील

## धनंजय देशमुख यांची भूमिका

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २८ मार्च-**

मस्साजोगचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख हे काल भगवंताचे दर्शन घेण्यासाठी बार्शीला आले होते. श्री भगवंताचे दर्शन घेताना ते अत्यंत भावूक झाल्याचे पहायला मि ळाले. माझा भाऊ माझे सर्वस्व होता. क्रूरकर्मी लोकांनी त्यांची हत्या करुन माझे सर्वस्व हिरावले. आमच्या सुखी कुटूंबाला कोणाची तरी नजर लागली अन सारे उध्वस्त झाले. आज पहिली



वेळ असेल मी भगवंताला मन भरुन, डोळे भरुन बघितले नाही. पाणावलेल्या डोळ्यांनी त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. एकादशीचे औचित्य साधून धनंजय देशमुख यांनी आज भगवंताचे दर्शन घेतले. यावेळी माध्यम प्रतिनिधींनी त्यांच्याशी संवाद साधला. देशमुख म्हणाले, भगवंताचे दर्शन घ्यायला मी नेहमीच येत होतो. आयुष्यात कधी संकट वाटले तर मी भगवंताच्या चरणी नतमस्तक व्हायचो. सर्व कुटूंबाला सुखात ठेव अशी भगवंत चरणी प्रार्थना करायचो. परंतु, आज पहिली वेळ असेल की आज काही मागता आले नाही. स्व. संतोष यांची हत्या करणाऱ्या क्रूरकर्मी लोकांनी माझ्याजवळ काहीच ठेवले नाही.

देशमुख म्हणाले, आरोपी कृष्णा आंधळे फरार असताना वाल्मिक कराडला विष्णू चाटेला कॉल झालेले आहेत. ते सराईत गुन्हेगार आहेत. ते सराईत गुन्हेगार होण्यामागचे कारण म्हणजे पोलीस यंत्रणेतील काहींनी त्यांना कधी कायदयाचा धाक दाखवलाच नाही. त्याला संबंधित पोलिसांचे अभय होते. आरोपी कृष्णा आंधळे आतापर्यंत फरार आहे. तो कधी जेरबंद होणार हा प्रश्न यंत्रणेलाच विचारायला हवा. आज कोर्टात युक्तीवाद झाला. ४२ मिनीटे ॲड. उज्वल निकम बोलले. त्यांचे बोलणे मुद्देसूद होते. पुढच्या १० तारखेपासून सुनावणीला सुरुवात होईल. आरोपींना कोणाचे पाठबळ होते. हे लवकरच स्पष्ट होईल. त्यांना नक्कीच शिक्षा होईल, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी माधव देशमुख, नितीन देशमुख, ॲड. गणेश हांडे, महेश देशमुख आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त वृत्त

### सना, इनाया, अयान, समीर जमादार व अली मुजावर यांचा पहिला रोजा







**सोलापूर, दि. २८ मार्च-** सिध्देश्वर नगर-२ येथील रहिवाशी सना कदिरबाशा जमादार (वय ८), इनाया जावेदबाशा जमादार (वय ६), अयान कदिरबाशा जमादार (वय ५), समीर जावेदबाशा जमादार (वय ४), अली मोहसिन मुजावर (वय ६) यांनी पवित्र रमजान महिन्यातील व आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला. त्यांच्या या रोजाबद्दल त्यांना आजोबा, आजी, आई, वडील, काका, काकी, मामा, मामी, आत्या यांच्यासह नातेवाईकांनी त्यांचे कौतुक करुन दुवा दिले. तसेच परिसरातील नागरिकांनीही त्यांचे कौतुक केले.




### बासुतकर ठरला एस.पी. वक्तृत्व चषकाचा मानकरी

**सोलापूर, दि. २८ मार्च-** राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या नेतृत्वाखाली संतोष पवार यांच्या नावाने एसपी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन जुनी मिल कंपाऊंड येथील राष्ट्रवादी भवन कार्यालयात करण्यात आले होते. सोलापूर शहरातील विविध १४ शाळेतील २५ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. यामध्ये सोलापूर शहरातील नामांकित शाळांनी सहभाग नोंदविले होते. या सर्व नामांकित शाळांमधून हिंगुलांबिका प्राथमिक शाळेतील इयत्ता ४ थी मधील विद्यार्थी प्रतिक शाम बासुतकर यांनी प्रथम क्रमांक पटकविला. यंदाचा संतोष पवार वक्तृत्व चषकचा मानकरी हा हिंगुलांबिका शाळेतील विद्यार्थी प्रतिक बासुतकर हा ठरला. शाळेला फिरता चषक व प्रतिकला रोख रक्कम, ट्रॉफी, मेडल, प्रशस्तीपत्र मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरवण्यात आले. बाहुसार शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बापू ढगे यांनी प्रतिक बासुतकर या विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांचे कौतुक केले. त्याचबरोबर त्याला मार्गदर्शन करणारे शिक्षक अश्विन संगवे यांचेही अभिनंदन केले. याप्रसंगी मुख्याध्यापक श्री प्रमोद हंचाटे, मुख्याध्यापक गोपी नवले, पर्यवेक्षक शंकरगिरी गिरी, सतीश हंचाटे, नितीन मुसळे, बीना बुगले उपस्थित होते.

### विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांचा उद्या सोलापूर जिल्हा दौरा

**सोलापूर २८ मार्च-** राज्याचे विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे हे ३० व ३१ मार्च रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून, त्यांचा दौरा पुढील प्रमाणे. रविवार ३० मार्च रोजी रात्री ११ वाजता शासकीय विश्रामगृह पंढरपूर येथे आगमन व मुक्काम. सोमवार दि.३१ मार्च रोजी सकाळी ७ वाजता शासकीय विश्रामगृह येथून विठ्ठल रूक्मीणी मंदिराकडे प्रयाण व सकाळी ७.१० वा. विठ्ठल मंदिर येथे आगमन व दर्शन. त्यानंतर सकाळी ८.०० वा. पंढरपूर येथून शासकीय वाहनाने बायपास रोड बेलाटी, ता. उत्तर सोलापूरकडे प्रयाण व ९.३० वा. बेलाटी येथे संत श्री बाळूमामा मंदिरास भेट व दर्शन. सकाळी १०.३० वा. बेलाटी येथून शासकीय वाहनाने हेरिटेज गार्डन गांधीनगर सोलापूरकडे प्रयाण व ११.०० वा. हेरिटेज गार्डन येथे आयोजित सत्कार समारंभास उपस्थिती. दुपारी १ वा. शासकीय वाहनाने सोलापूर विद्यापीठ कडे प्रयाण. दुपारी १.३० वा. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ येथे आगमन व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याची पाहणी व राखीव. दुपारी २.३० वा. सोलापूर विद्यापीठ येथून शासकीय वाहनाने पंढरपूरकडे प्रयाण व सायं.५.०० वा. हनुमान मैदान ग्रा.पं.कार्यालयासमोर ईश्वर वठार, ता. पंढरपूर येथे आगमन व प्रा. वामनराव माने यांच्या अमृत महोत्सव सोहळा कार्यक्रमास उपस्थिती. व त्यानंतर सायं.७ शासकीय वाहनाने निरनिमगाव ता. इंदापूरकडे प्रयाण करतील.



# पनाश टॉवर प्रकरणाची महापालिका उपायुक्तांमार्फत होणार चौकशी

### महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांची माहिती

### आवश्यक ती कागदपत्रे गोळा करण्याची प्रक्रिया केली सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च -** सोलापूर : विजापूर रस्त्यावरील बहुचर्चित पनाश टॉवर प्रकरणाची माहिती घेऊन पुढील कार्यवाहीसाठी महापालिका प्रशासनाकडून चौकशी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्याकडून अहवाल प्राप्त होणार आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.





विजापूर राष्ट्रीय महामार्गावरील तब्बल १७ मजली पनाश टॉवर बांधकाम प्रकरणात मोठ्या प्रमाणात अनियमितता व अनेक बाबींमध्ये नियम मोडण्यात आल्याचे आणि बांधकाम हे बेकायदेशीर असल्याची तक्रार महापालिका प्रशासनाकडे करण्यात आली होती. मात्र या प्रकरणात उच्च न्यायालयाने यामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता नसल्याचा निर्वाळा दिल्याचे विकासाचे म्हणणे आहेत. अशा वेळी देखील नियमितता एका प्रकरणात नसून अनेक बाबींमध्ये असल्याची तक्रार भाजपाचे माजी नगरसेवक प्रभाकर जामगुंडे यांनी प्रशासनाकडे लावून धरली आहे. यावरून नूतन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी या प्रकरणाची फाईल पुन्हा ओपन केली आहे.

या प्रकरणाची संपूर्ण माहिती आणि प्रकार जाणून घेण्यासाठी याची चौकशी करण्यासाठी महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांची नियुक्ती केली आहे. त्यांच्याकडून या प्रकरणाची पुढील दोन आठवड्यात चौकशी आणि संपूर्ण माहितीचा अहवाल ते आयुक्तांकडे सादर करणार आहेत. याबरोबरच विजापूर राष्ट्रीय महामार्गावरील विजापूर नाका ते सैफुल दरम्यान रस्त्याच्या कडेला सर्विस रोडवर होत असलेल्या अतिक्रमणा संदर्भात देखील सखोल चौकशी करण्यात येणार असून यासाठी १० सदस्य समिती महापालिका प्रशासनाने गठीत केली आहे. या समितीकडून या सर्विस रोडवरील संपूर्ण अनाधिकृत बांधकामे, शेड, खोकी आणि त्या ठिकाणची जागा व्यापून तेथे वाळू आणि खडी चे डेपो लावून विक्री करण्याच्या प्रकारावरील माहिती घेण्यात येणार आहे. याठिकाणी डी मार्किंग करण्यात येऊन परिसर निश्चित करण्यात येणार आहे. त्यानंतर त्या परिसरात अतिक्रमण केलेल्यांना नोटिसा बजावण्यात येणार आहेत.

#### सर्विस रोड अतिक्रमणासंदर्भात समिती गठीत

विजापूर महामार्गावरील सर्विस रोड अतिक्रमणासंदर्भात सखोल चौकशीसाठी दहा जणांची समिती गठीत केली आहे. यामध्ये अध्यक्ष - महापालिका अतिक्रमण विभाग नियंत्रण अधिकारी तथा उपायुक्त तैमूर मुलानी, सदस्य - महापालिका उप संचालक नगर रचना मनीष भिष्णूरकर , सोमपा सहायक आयुक्त शशिकांत भोसले, कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अतिक्रमण विभाग पोलीस निरीक्षक , विभागीय अधिकारी क्र.५ , विभागीय अधिकारी क्र.६, सोमपा भूमी व मालमत्ता अधिक्षक तर सदस्य सचिवमहापालिका अतिक्रमण प्रतिबंधक अधिकारी हेमंतकुमार डोंगरे यांचा या समितीत समावेश आहे.

#### ५ वर्षात परवाना घेतलेल्या बांधकामांची यादी तयार

शहरातील अनधिकृत बांधकामे आणि परवाना दिलेल्या गेल्या ५ वर्षातील बांधकामांची यादी विभागाने तयार करून महापालिका आयुक्तांकडे सादर केली आहे. या यादीनुसार आता प्रत्येक बांधकामाची पाहणी करण्यात येणार आहे दिलेल्या बांधकाम परवान्यानुसार जागेवर बांधकाम आहे का?, साईड मार्जिन सोडलेली आहे का?, पार्किंगसाठी जागा सोडली आहे का? एफएसआयचा उल्लंघन तर झाले नाही? या सगळ्या बाबी तपासण्यात येणार असून यामधून कोणत्याही प्रकारचा उल्लंघन झाल्यास संबंधित बांधकाम धारकावर कारवाई करण्यात येणार असल्याचे महापालिका आयुक्तांनी स्पष्ट केले.

#### विविध बीओटी प्रकल्पांची मागितली माहिती

दरम्यान सोलापूर शहरातील विविध बीओटी प्रकल्पांची महापालिका आयुक्त यांनी माहिती मागितली आहे. या संदर्भात उपायुक्त आशिष लोकरे यांच्याकडून सविस्तर माहिती घेतली. सर्व बीओटी प्रकल्पांचा अहवाल द्यावा असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. बाळीवेस येथील राजू भाई प्रसूतीगृहाच्या जागेवरील प्रकल्पासंदर्भातही आयुक्तांनी अधिक माहिती घेतली आहे. या संदर्भात कार्यवाही करावी, असे त्यांनी सूचित केले.



## सार्वजनिक न्यासामार्फत सुलभपणे सेवा मिळण्यासाठी कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-** सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय व धर्मादाय वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वस्तांची कार्यशाळा डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात पार पडली. या कार्यशाळेचा उद्देश धर्मादाय आयुक्त मुंबई आणि धर्मादाय सह आयुक्त पुणे यांच्या निर्देशानुसार नागरिकांना सेवा सुलभ करण्याचा होता.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी धर्मादाय उप आयुक्त प्रविण कुंभोजकर, सहायक धर्मादाय आयुक्त संजय पाईकराव, मानसशास्त्र तज्ञ डॉ. नितिन भोगे, जिल्हा अध्यक्ष खतिब वकील आणि अन्य विधि तज्ञ उपस्थित होते. उप आयुक्त कुंभोजकर यांनी कार्यशाळेचा हेतू स्पष्ट करताना सांगितले की, मुख्यमंत्र्याच्या १०० दिवसांच्या कृती आराखड्यानुसार नागरीकांना मिळणाऱ्या सेवा सुलभ करण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन केले आहे. त्यांनी कायदेविषक अडचणींवर मार्गदर्शन केले. डॉ. नितिन भोगे, अंबादास रायनी, ॲड. खोले यांनी संबंधित कायद्यांवर मार्गदर्शन केले. सहायक धर्मादाय आयुक्त संजय पाईकराव यांनी दस्तऐवज अद्ययावत ठेवण्याबाबत सूचना दिल्या. कार्यशाळेच्या शेवटी प्रश्नोत्तर सत्र आयोजित करण्यात आले, ज्यामध्ये विश्वस्तांच्या शंका समाधान करण्यात आल्या.

# उजनीच्या पाण्याचे योग्य नियोजन करा अन्यथा जनावरांना घेऊन कार्यालयासमोर आंदोलन करणार

### सामाजिक कार्यकर्ते पै.माऊली हेगडे यांचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-** उन्हाळा सुरू झाल्याने जिल्ह्यातील उजनी धरणातील पाण्याचे योग्य नियोजन करा अन्यथा अधीक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण कार्यालयासमोर शेतकरी आणि जनावरांसह आंदोलन करण्याचा इशारा पै. माऊली हेगडे यांनी दिला आहे.

उन्हाळ्याची सुरुवात होताच जिल्ह्यातील शेतकरी तसेच गावा गावातील नागरिकांना पाणीटंचाईच्या झळा सोसाव्या लागतात. मागील वर्षी उजनी धरण १०० टक्के प्लस भरून देखील योग्य नियोजन न केल्याने सध्या धरणात ४७ टक्के पाणी साठा शिल्लक आहे. त्यामुळे पावसाळा सुरू होईपर्यंत उन्हाळ्यात जिल्हा वासियांसाठी पाण्याचे योग्य नियोजन व्हावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते पै.माऊली हेगडे यांनी केली आहे.



> पावसाचे आगमन लांबले तर सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील नागरिकांची फरफट होऊ नये, त्यामुळे उजणी धरणातील पाण्याचे काटेकोर नियोजन करण्यात यावे आणि मागील दहा वर्षांपासूनचा जिल्हा वासियांना उजणीच्या पाण्याचा हिशोब द्यावा.
> **- पै. माऊली हेगडे, सामाजिक कार्यकर्ते**

जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी या उजनी धरणासाठी अधिग्रहण केल्या गेल्या आहेत. उजनी धरणासाठी सोलापूर जिल्ह्याचे खूप मोठे योगदान आहे. मात्र धरणाच्या पाण्यावर बाहेरचे अनेक जिल्हे हक्क गाजवत आहेत. धरणासाठी विस्थापित झालेले अनेक संसाराची आज देखील घडी बसली नाही. त्यामुळे पाणी वाटप धोरणात प्रामुख्याने सोलापूर जिल्हाचा प्रथम विचार व्हावा. जिल्हा वासियांना पाणी वाटप झाल्यानंतरच उर्वरित पाणी इतर जिल्ह्यांना देण्याचा विचार व्हावा. मात्र तसं न होता अनेक बाहेर जिल्ह्यातील शहरांना उजनीतून पाणी पुरवले जात आहे. त्यामुळे धरण उशाला आणि कोरड घशाला अशी अवस्था प्रत्येकवर्षी जिल्हा वासियांची होते.

सोलापूर जिल्ह्याला पाणीपुरवठा होणाऱ्या डाव्या आणि उजव्या कालव्यातून तसेच भीमा आणि सीना नदीच्या माध्यमातून जिल्हा वासियांना चार आवर्तन पूर्ण क्षमतेने देण्यात यावीत.सध्या उन्हाळा सुरू असून काल गुरुवार ६ मार्चपासून एक आवर्तन उजनी धरणातून सोडले असून सुरवातीला ५०० क्युसेस न सोडलेले पाणी आज १२०० शे क्युसेस ने सुरू आहे. हे आवर्तन देखील पूर्ण क्षमतेने सोडण्यात यावे.तसेच पुढील दोन आवर्तनासाठी पाण्याचे योग्य नियोजन करण्यात यावे. अन्यथा अधीक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरणकार्यालयासमोर शेतकरी आणि जनावरांसह आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते पै.माऊली हेगडे यांनी दिला आहे.

# शेवटच्या दिवशी २७० अर्ज दाखल

### बाजार समिती निवडणूक; ४७९ जणांनी भरले अर्ज

### निवडणूक कार्यालयाला पोलीस छावणीचे स्वरूप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-** सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीसाठी शुक्रवारी दि.२८ अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस होता. त्यामुळे २७० उमेदवारांनी जिल्हा उपनिबंधक कार्यालयात अर्ज दाखल केले. यावेळी कोणताही गैरप्रकार घडू नये,



यासाठी पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता. बाजार समितीच्या निवडणुकीसाठी पाच दिवसात एकूण ८३५ अर्जाची विक्री झाली आहे. त्यातील ४७९ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. यामध्ये ५० उमेदवारांनी डबल अर्ज दाखल केले आहेत. बाजार समिती निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याची शुक्रवारी शेवट असल्याने एकाच दिवशी तब्बल २७० जणांनी अर्ज दाखल केले आहेत. दरम्यान स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका रखडल्याने बाजार समितीच्या निवडणुकीसाठी सर्व पक्षाचे नेते, पदाधिकार्यांसह कार्यकर्त्यांनी अर्ज दाखल केल्याने साडेचारशेपेक्षा जास्त अर्ज दाखल झाले आहेत. त्यातील किती उमेदवार अर्ज मागे घेतील हे १६ एप्रिल रोजी स्पष्ट होणार आहे.

**अर्ज विक्री - ८३५**
**अर्ज दाखल - ४७९**
**डबल अर्ज दाखल - ५०**
**सिंगल उमेदवार अर्ज - ४२९**

#### दाखल झालेले अर्ज

सहकारी संस्था सर्वधारण - १५१, सहकारी संस्था महिला राखीव - ३१, सहकारी संस्था इतर मागासवर्ग -२६, सहकारी संस्था विमुक्त जाती भटक्या जमाती - ३७, ग्रामपंचायत सर्वसाधारण - १०८, ग्रामपंचायत अनुसूचित जाती, जमाती - ३३, ग्रामपंचायत आर्थिक दुर्बल घटक -२०, व्यापारी प्रतिनिधी - ५६, हमाल तोलार प्रतिनिधी - १७ असे एकूण ४७९ अर्ज दाखल झाले आहेत.

#### एक एप्रिलला होणार छाननी

बाजार समितीच्या निवडणुकीसाठी २५ ते २८ मार्च दरम्यान अर्ज विक्री आणि दाखल करण्यात आले आहे. ४२९ उमेदवारांनी ४७९ अर्ज दाखल केले आहेत. त्या अर्जाची छाननी एक एप्रिलला होणार आहे. त्यानंतर दोन ते १६ एप्रिल दरम्यान उमेदवारांना अर्ज माघारी घेता येणार आहे. त्यानंतर १७ एप्रिलला पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध होणार आहे.




# जिल्हा मध्यवर्ती बँकेचा ५ हजार कोटी ठेवींचा टप्पा पार



### माजी आ. संजयमामांनी केले प्रशासकीय टीमचे अभिनंदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-** गुरूवार, दि. २७ मार्च रोजी सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेने इतिहासात प्रथमच ५ हजार कोटी ठेवीचा टप्पा पार केल्याबदल बँकेचे सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांचे माजी तथा कर्मचारी संघटना अध्यक्ष संजय शिंदे यांनी अभिनंदन केले आणि भविष्यकाळ उज्वल राहण्यासाठी शुभेच्छाही दिल्या.

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेची १०७ वर्षाच्या इतिहासामध्ये पाच हजार कोटी ठेवीचा टप्पा पार केला असून, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेने सध्या पाच हजार कोटी ठेवी प्राप्त केलेल्या आहेत. त्यामध्ये ७० टक्के ठेवी या वैयक्तिक स्वरूपाच्या असून त्यामध्ये शेतकरी बांधवांनी बँकेवर दाखवलेल्या विश्वासाचे प्रतीक आहे. आत्तापर्यंत सर्व शेतकरी, बँका, पतसंस्था, सोसायटया व वैयक्तिक ठेवीदार यांनी सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला सहकार्य केलेलेच आहे, करत आहेत आणि यापुढेही करणार आहेत. जिल्ह्यातील सर्व स्तरातील नागरिकांच्या सहकार्याने बँक उर्जित अवस्थेमध्ये आलेली असून, यापुढेही बँक जास्तीत जास्त आर्थिक प्रगतीच्या मार्गावर असणार आहे.

चालू वर्षी बँकेने पाच हजार तीनशे कोटी ठेवीचे उद्दिष्ट पार करण्याचे नियोजन केलेले आहे. यामुळे सर्व शेतकरी बांधवांनी व ठेवीदारांनी आपल्याकडील ठेवी जिल्हा बँकेमध्ये ठेवून जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला चालना द्यावी, असेही आवाहन प्रशासकांनी केले आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या ठेवीचे व्याजदर हे इतर बँकेपेक्षा जास्त आहेत. यामुळे माजी आ. संजय शिंदे यांनी प्रशासक भोळे, मुख्य कार्यकारी अधिकारी, तसेच सर्वस्तरीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. भविष्यातही आपले या बँकेला कायम सहकार्य राहील, अशी ग्वाहीही दिली आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## डॉ. आंबेडकर जयंती उत्सव मध्यवर्ती महामंडळाची उद्या बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मध्यवर्ती महामंडळाची बैठक रविवार दि. मार्च २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता डॉ. आंबेडकर पुतळ्याच्या शेजारील जागेत नार्थकोट मैदान शेजारी आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती उत्सव अध्यक्ष सागर उबाळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने ही बैठक आयोजित केली आहे. या बैठकीत नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात येणार आहे. आतापर्यंत सुमारे ८० मंडळांना बैठकीचे सर्क्युलर देण्यात आले आहे. २८० मंडळांना निमंत्रित करण्यात येत आहे. यावेळी उत्सव समितीचे पदाधिकारी, समाजातील विविध क्षेत्रातील पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला, विद्यार्थी आदींनी उपस्थित राहावे, असे आवाहन कार्यकारणी सदस्य आशुतोष नाटकर यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस रवी म्यातरल्लू, मिलिंद प्रक्षाळे, विलास सरवदे, चंद्रकांत सोनवणे, दीपक गवळी, लखन भंडारे आदी उपस्थित होते.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### ३ दिवस सुट्टीतही 'रजिस्ट्रार' कार्यालये सुरू राहणार

**सोलापूर, दि. २८ मार्च-**

मार्च एन्डमुळे शनिवारपासून सलग तीन दिवस जिल्ह्यातील रजिस्ट्रार कार्यालये सुरू राहणार आहेत. सोमवारी ३१ मार्च रोजी रमजान ईद आहे. या दिवशी राष्ट्रीय सुटी असूनही या दिवशी रजिस्ट्रार कार्यालये सुरू राहणार असल्याची माहिती मुद्रांक जिल्हाधिकारी पी. जी. खोमणे यांनी दिली. शनिवार व रविवारी शासकीय कार्यालयांना नियमित साप्ताहिक सुटी असते. या दोन्ही दिवशी कार्यालये सुरू राहणार आहेत. मार्चमुळे वाढणारी दस्तसंख्या, सर्व्हर डाऊनची तांत्रिक अडचण लक्षात घेऊन मुद्रांक विभागाने दस्त नोंदणीसाठी कार्यालयांची वेळ दोन तासांनी वाढविली आहे. ३१ मार्चपर्यंत वेळेत सवलत देण्यात आली असून, रोज सकाळी पावणे दहा ते रात्री सव्वाआठ वाजेपर्यंत कार्यालयांची वेळ राहणार आहे. तरी नागरिकांनी सायंकाळी ६ वाजेपर्यंत दस्त सादर करणे आवश्यक राहणार आहे.या तांत्रिक अडचणींमुळे दस्त नोंदणी थांबू नये. ३१ मार्चपूर्वी सर्व नोंदणी पूर्ण व्हावी, यासाठी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक कार्यालयाने १ ते ३१ मार्च या कालावधीत राज्यातील सर्व मुद्रांक कार्यालयांची वेळ दोन तासांनी वाढविली आहे.

### समता पंधरवडा; जातवैधता प्रमाणपत्राकरीता विशेष मोहीम

**सोलापूर, दि.२८ मार्च-**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीतर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या वतीने 'समता पंधरवडा'चे आयोजन करण्यात आले आहे.या निमित्ताने दि १ ते १४ एप्रिल या कालावधीत 'समता पंधरवडा' असून, समता पंधरवड्यात ११ वी आणि १२ वी विज्ञान शाखेतील तसेच व्यावसायिक अभ्यासक्रम २०२५-२६ मधील सर्व प्रवेशित मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधताप्रमाणपत्र मिळण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेदरम्यान विज्ञान शाखेतील प्रवेशित सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांची जात पडताळणी प्रकरणे तालुका व महाविद्यालय निहाय संख्यात्मक माहिती समान संधी केंद्राच्या माध्यमातून महाविद्यालय तसेच जिल्हास्तरावर संकलित करण्यात येणार आहेत. समता पंधरवडयात सीईटी देणारे विद्यार्थी डिप्लोमा तृतीय वर्षातील प्रवेशित विद्यार्थ्यांचे ऑनलाइन अर्ज देखील भरण्यात येणार आहेत. तसेच अर्ज भरताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी संबंधित महाविद्यालयातील समान संधी केंद्रामार्फत वेबिनारचे आयोजन देखील करण्यात येणार आहे. जिल्हयातील विज्ञान शाखेतील प्रवेशित विद्यार्थी, सीईटी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपापल्या महाविद्यालयात परिपूर्ण अर्ज सादर करून या मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपायुक्त तथा जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती सदस्य रविंद्र कदमपाटील यांनी केले आहे.

### सैनिक कल्याण कार्यालयात लिपिक टंकलेखक भरती

**सोलापूर, दि. २८ मार्च-**

सोलापूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात लिपिक-टंकलेखकाचे अशासकीय एक पद मेस्को मार्फत भरावयाचे आहेत. जिल्हयातील पात्र माजी सैनिकांनी सैनिक सेवेची व इतर शैक्षणिक कागदपत्रासह ३ एप्रिल पुर्वी जिल्हा सैनिक कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे. प्राप्त अर्जामधील उमेदवारांची ३ एप्रिल रोजी मुलाखती घेण्यात येईल. जिल्ह्यातील माजी सैनिक तसेच जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर यांच्या रोजगार पटावर नोंद असलेल्या युध्द विधवा युध्दजन्य कारणाव्यतिरिक्त दिवंगत झालेल्या सैनिकांच्या विधवा पत्नी यांना प्राधान्य देण्यात येईल. सदर प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्या माजी सैनिकांच्या विधवा पत्नी या पदासाठी पात्र ठरतील. या पदाकरीता मराठी टंकलेखनाचा वेग दर मिनिटास किमान ३० शब्द असल्याचे वाणिज्य प्रमाणपत्र तसेच महाराष्ट्र शासनाचे एमएससीआयटी प्रमाणपत्र धारण केलेले किंवा मराठी टंकलेखन येणे अनिवार्य राहील. जिल्ह्यातील माजी सैनिक, युध्द विधवा, माजी सैनिकांच्या पत्नी यांनी लाभ घ्यावा. असे आवाहनही जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

# 'कुलगुरु हमे पडने दो, देश को आगे बढने दो,'

# या घोषणेने 'अभाविप'चा सोलापूर विद्यापीठावर 'छात्र उद्रेक मोर्चा'

### परीक्षेचा निकाल वेळवर लावा, विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकासह २२ मागण्याचे कुलगुरूंना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ प्रशासनाच्या गलथान कारभारावर टीका करत त्यांना आरसा दाखवित अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने विद्यापीठावर शुक्रवारी ''छात्र उद्रेक मोर्चा'' काढला. अभाविपचे जिल्हा संयोजक सौरभ कुलकर्णी, प्रदेशमंत्री अथर्व कुलकर्णी, महानगर मंत्री यश उडानशिव, सहमंत्री आदित्य मुस्के यांच्या नेतृत्वाखाली ''कुलगुरू हमे पडने दो, देश को आगे बढने दो,'' या घोषणेसह मागण्यांचे अनेक घोषणा फलक लक्षवेधक होते.

भर उन्हात काढण्यात आलेला हा मोर्चा विद्यापीठाच्या गेटवरच अडविण्यात आला. विद्यार्थ्यांनी गेटवर एक तास आंदोलन केले. विद्यापीठाचे कुलगुरू आमचे निवेदन घेण्यासाठी येत नाहीत तोपर्यंत विद्यार्थीनी भर उन्हात हे आंदोलन सुरू ठेवले होते. कुलुगरू विद्यापीठात नसल्यामुळे भर उन्हाची तीव्रता लक्षात घेता पोलिसांनी त्यांना विद्यापीठाच्या आवारात प्रवेश देऊन सावलीत आंदोलन करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार विद्यापीठाच्या सभागृहासमोरील सावलीत त्यांनी परत अर्धा तास घोषणा देत आंदोलन केले. अखेर कुलगुरू विद्यापीठात आल्यानंतर त्यांनी मोर्चाला सामोरे जात त्यांचे निवेदन स्वीकारीत मागण्याची पूर्तता करण्याचे, आश्वासन त्यांनी दिले. नंतर त्यांच्या शिष्ठमंडळाशी त्यांनी मागण्यावर चर्चा केली. परीक्षेचे निकाल वेळेवर लावा, मुलींना १०० टक्के शुल्क सवलत या मागण्यासंह २२ मागण्यांचे निवदेन त्यांनी कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांना दिले. यावेळी प्र.कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगीनी घारे, परीक्षा व मुल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे आदी उपस्थित होते.




### दोन दिवसात सर्व निकाल जाहीर होतील

विद्यापीठात यापूर्वी पाच सॉफ्टवेअर काम चालत होते. त्यांचा डाटा मिळविण्यात अडचणी होत्या. आता सर्व डाटा नवीन आययुएमएस (इंटिग्रेटेड युनिव्हर्सिटी मॅनेजमेंट सिस्टीम) या सॉफ्टवेअरमध्ये समाविष्ट केला आहे. त्यामुळे निकालास विलंब होत होता. आता पुढील परीक्षेपासून याची अडचण होणार नाही. अभियांत्रिकी महाविद्यालयातील अभ्यासक्रम वगळता राहिलेल्या सर्व अभ्यासक्रमाचे निकाल दोन दिवसात जाहीर होतील.

**- डॉ. श्रीकांत अंधारे, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ.**

### 'या' आहेत विद्यार्थ्यांच्या मागण्या

१) सर्व स्वायत्त व अस्वायत्त महाविद्यालयांमध्ये व्यावसायिक व बिगर व्यवसायिक अभ्यासक्रम शिकणाऱ्या मुलींना शंभर टक्के मोफत शिक्षण देण्याच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करा.
२) विद्यापीठ कायद्यानुसार खुल्या विद्यार्थी परिषद निवडणूका आगामी शैक्षणिक वर्षापासून सुरू करा.
३) छायांकित प्रतसाठी १०० रुपये इतकेच शुल्क आकारण्यात यावे आणि सात दिवसाच्या आत छायांकित प्रत उपलब्ध करून देण्यात यावी.
४) बॅकलॉग परीक्षा शुल्क हे प्रति विषय रु.२००/- पेक्षा जास्त नसावे.
५) सत्र परीक्षांचे निकाल ४५ दिवसांच्या आत लावा. अन्यथा संबंधितांवर कडक कारवाई करा.
६) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ सुरुवातीलाच विद्यापीठाने शैक्षणिक वेळापत्रक जाहीर करा. त्याची अंमलबजावणी करा.
७) स्पर्धा परीक्षा, सी.ए. व सी.एस. या परीक्षांचा विचार करूनच विद्यापीठ प्रशासनाने सत्र परीक्षेचे वेळापत्रक निश्चित करावे.
८) प्रत्येक वेळेस सॉफ्टवेअरमुळे होणाऱ्या गोंधळ लक्षात घेता वर्तमान सॉफ्टवेअर कार्यप्रणालीवर विचार करून विद्यापीठाची स्वतंत्र सॉफ्टवेअर कार्यप्रणाली विकसीत करा.
९) विषम आणि सम सत्र परीक्षांमध्ये ९० दिवसांचा कालावधी असावा व परीक्षा अर्ज प्रक्रिया आणि परीक्षा यांमध्ये कमीत कमी १२ दिवसांचे अंतर असावे.
१०) जे विद्यार्थी पुनर्मुल्यांकन प्रक्रियामध्ये उत्तीर्ण झाले, अश्या विद्यार्थ्यांना पुनर्मुल्यांकनासाठी आकारलेले शुल्क त्यांच्या खात्यावर परत करावे.
११) पीएचडी अभ्यासक्रमांचे शुल्क हे विद्यापीठ आणि सर्व संशोधन केंद्रांमध्ये समान असावे.
१२) कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना सर्व महाविद्यालयांमध्ये प्रभावीपणे राबवा. कामाचे तास वाढवण्यात यावे व मानधन प्रतितास ७० रुपयांपर्यत करण्यात यावे.
१३) प्रवेश प्रक्रिया दरम्यान महाविद्यालकडून प्रॉस्पेक्ट शुल्कामध्ये एकसमानता असावी. रु.२०/- पेक्षा जास्त शुल्क नसावे.
१४) ज्या महाविद्यालयात दररोज राष्ट्रगीत होत नाही अशा महाविदयालयांवर कडक कारवाई करा.
१५) विदयापीठ संलग्नीत सर्वच महाविद्यालयात पार्किंगची सुविधा मोफत करण्याचे निर्देश सर्व महाविद्यालयांना द्यावे.
१६) स्वायत्त महाविद्यालयांचे शुल्क नियंत्रणासाठी विद्यापीठाने नियम घोषित करावे.
१७) विद्यार्थ्यांकडून पदवी प्रमाणपत्र शुल्क पदवीचे शिक्षण झाल्यानंतरच आकारण्यात यावे.
१८) विद्यापीठ परिसरातील विद्यार्थी सुविधा केंद्र अद्ययावत करण्यात यावे. त्याच सर्व प्रकारचे शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून द्या.
१९) विद्यापीठ परिसरातील विद्यार्थी-विद्यार्थिनी यांचे जिमखाना अद्ययावत करावे.
२०) विद्यापीठ परिसरातील कँटीनमध्ये स्वच्छता असावी. पिण्याचे पाणी फिल्टर झालेले असावे.
२१) कॅरी ऑन मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना निकाल न लागल्यामुळे शिष्यवृत्ती अर्ज भरण्याची अंतिम तारीख संपल्यास विद्यापीठ प्रशासनाने विद्यार्थ्यांचे उर्वरित शुल्क भरावे.
२२) इतर विद्यापीठाच्या तुलनेत सोलापूर विद्यापीठाचे परीक्षा शुल्क जास्तीचे शुल्क कमी करावे.

## डिजिटल अटक करणारे आरोपी अटकेत

**• सोलापूर सायबर पोलिसांची कारवाई**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि २७ मार्च-**

सायबर पोलिसांनी डिजिटल अॅरेस्ट प्रकरणातील पाच आरोपींचा शोध घेतला. गुजरातच्या शाह या दोघांना अटक केली आहे. त्याच्याकडून मोबाईल व फसवणुकीचा रक्कम असा तीन लाखाचा ऐवज जप्त केला आहे. आरोपी अटकेत असून त्यांना ३० मार्च पर्यंत पोलिस कोठडी देण्यात आली आहे.

धवलभाई विपुलभाई शाह (वय ३९), हार्दिक रोहितभाई शाह (वय ४३ दोघे रा. अहमदाबार,राज्य गुजरात) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. सायबर एक्स्पर्ट टिमने तांत्रिक विश्लेषण व इतर पुरावे याव्दारे ही कारवाई केली आहे. उर्वरीत तीन आरोपीचा शोध घेत आहोत. सेवानिवृत्त मेडिकल रिप्रेजेंटेटिव(एमआर) व्यक्तीस नोव्हेंबर २०२४ रोजी डिजिटल आरेस्ट करून त्याच्याकडून २७ लाख १० हजार रक्कम विविध खात्यावर वर्ग करून घेतली होती. त्याचा गुन्हा सायबर पोलिसांत डिसेंबर महिन्यात दाखल झाला होता. सायबर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पाच आरोपींचा शोध घेतला मात्र त्यातील दोघांना अटक करण्यात यश आले आहे. उर्वरीत तीन आरोपी दुबईला पळून गेले आहेत. अशी माहिती सायबर विभागाचे पोलिस निरीक्षक श्रीशैल गजा यांनी दिली.

## महिला व बालकल्याण विभागासाठी ३ कोटी २९ लाखांची तरतूद

**• बालसंजीवनी व कुपोषित मुक्तीसाठी बक्षीस नाविन्यपूर्ण योजना सुरु**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी ग्रामीण भागातील कुपोषित बालकांना सकस आहार पुरविणे, अंगणवाडी सेविका व ग्रामपंचायतीना पुरस्कार देण्यासाठी नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत निधीची तरतूद केली आहे. तसेच गरोदर व स्तनदा मातांसाठी बाल संजीवनी योजना सुरू केली आहे.

जिल्हा परिषदेतील महिला व बालकल्याण विभागाकडून प्रामुख्याने कुपोषित बालके व अंगणवाडी सेविकांच्या समस्यांना प्राधान्य देण्यात येते. म्हणून सीईओ कुलदीप जंगम यांनी कुपोषित बालकमुक्त असणाऱ्या ग्रामपंचायतीना पुरस्कार जाहीर केला आहे. यामुळे अंगणवाडी सेविका व ग्रामपंचायतीना प्रोत्साहन मिळणार असून कुपोषित बालकमुक्त गाव होण्यासाठी प्रयत्न होणार आहे. २०२५-२०२६ मध्ये महिला व बालकल्याण विभागासाठी ३ कोटी २९ लाख निधीची तरतूद केली आहे. या निधीमधून ग्रामीण भागातील कुपोषित मुलांसाठी व किशोरवयीन मुलींसाठी गरोदर, स्तनदामाता यांना अतिरिक्त आहार पुरविणे यासाठी बाल संजीवनी योजना सुरु करून २५ लाखाची तरतूद केली आहे. अतितीव्र कुपोषित बालक मुक्त ग्रामपंचायतीना तसेच अंगणवाडी सेविकांना बक्षीस देण्यासाठी १० लाख निधीची तरतूद केली आहे. तर अंगणवाडयांना साहित्य व शैक्षणिक साहित्य पुरविण्यासाठी १ कोटी निधीची तरतूद केली आहे. ग्रामीण भागातील महिलांना विविध साहित्य पुरविण्यासाठी ५० लाखाची तरतूद करण्यात आली आहे. महिला व बालविकास विभागाकडून कुपोषित बालके, अंगणवाडी सेविका, स्तनदा व गरोदर माता यांच्या विकासासाठी प्राधान्याने निधीची तरतूद करण्यात आली आहे.

### निधी खर्च आढावा

- अंगणवाडी शैक्षणिक साहित्य - १ कोटी
- महिलांना साहित्य पुरविणे - ५० लाख
- बालसंजीवनी योजना - २५ लाख
- ग्रामपंचायत व अंगणवाडी सेविकांना बक्षीस - १० लाख

### कुपोषित बालकमुक्तीसाठी विशेष तरतूद

ग्रामीण भागात बालकांमध्ये कुपोषणाची समस्या जाणवते. म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी अतितीव्र कुपोषित बालकमुक्त ग्रामपंचायत व अंगणवाडी सेविकांना प्रोत्साहन म्हणून १० लाखाची विशेष तरतूद केली आहे. याशिवाय अतिरिक्त आहार पुरविण्यासाठी बाल संजीवनी नाविन्यपूर्ण योजना सुरू केली आहे. यामुळे कुपोषणामुळे होणारे ग्रामीण भागातील बालके, महिला व किशोरवयीन मुलींच्या शारिरीक समस्या कमी होण्यास मदत होणार आहे.

**- प्रसाद मिरकले, जिल्हा कार्यक्रम अधिकारी,**
महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद सोलापूर

## पुणे विभागात वाढल लाचखोरे ..!

**तभा वृत्तसेवा । अमोल व्यवहारे**
**सोलापूर, दि. २८ मार्च -**

सन २०२५ मध्ये १ जानेवारी ते २६ मार्च अखेर लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने १९१ सापळा कारवाया करत तब्बल २८० लाचखोरांना रंगेहात पकडण्यात यश मिळविले आहे. गतवर्षी याच कालावधीत १७४ कारवायांमध्ये २५४ लाचखोरांना पकडण्यात आले होते. तर चालू वर्षी पुणे विभागात ३५ कारवायांमध्ये ५४ लाचखोरांना पकडण्यात यश आले आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड, पुणे ग्रामीण, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर या जिल्ह्यांचा यात समावेश आहे.

एकीकडे सरकार लाचखोरी दूर करत पारदर्शक काम करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करत सर्वसामान्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करत असताना वर्षागणिक ''प्रशासनात'' लाचखोरांची संख्या वाढतच चालल्याचे दिसत आहे. पुणे विभागात गेल्यावर्षीपेक्षा यंदा लाचखोरांची संख्या वाढली असल्याचे स्पष्ट झाले आहे. यंदा म्हणजे, २०२५ मध्ये लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने १८९ सापळा कारवाया करत तब्बल २७७ लाचखोरांना रंगेहात पकडण्यात यश मिळविले आहे. पुणे विभागात ३४ सापळा कारवाईत ५३ लाचखोरांना अटक करण्यात आली आहे. पुणे लाच लुचपत प्रतिबंधक विभागात (एसीबी) अधिपत्याखाली पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर असे पाच जिल्हे येतात. प्रत्येक वर्षी एसीबीकडून लाचखोरांवर कारवाई केल्यानंतर महसूल व पोलीस विभाग आघाडीवर असल्याचे दिसून येते. या दोन विभागात लाच मागताना अटक केलेल्यांचे प्रमाण सर्वाधिक असते. लाचखोरांची



संख्या वर्षागणीक वाढत आहे. सरकार पारदर्शक प्रशासन देण्यासाठी प्रयत्न करत आहे. पण, दुसरीकडे शासकीय नोकरदार टेबलाखालून नोट मिळाल्यानंतरच काम करत असल्याचे यावरून दिसत आहे. त्यातही या सापळा कारवाया आहेत. त्यामुळे एसीबीकडे न आलेल्या तक्रारी आणि पैसे देऊन कामे करणाऱ्यांची संख्या किती असेल याचा विचारच न केलेलाच बरा. त्यामुळे लाचखोरी थांबविण्यासाठी कठोर पावले तर उचलावी लागतीलच पण, लाच घेताना पकडल्यानंतर देखील तितकीच कडक कारवाई होणे गरजेचे आहे. अनेकांना लाच घेताना पकडल्यानंतर काही दिवसांत अंतर्गत चौकशी करून पुन्हा नोकरीवर रुजू करून घेतले जाते. तर, अनेक विभागात त्यांच्यावर निलंबनाची देखील कारवाई होत नाही.

यंदा देखील सर्वाधिक कारवाया या महसूल विभागात झाल्या आहेत. त्याखालोखाल पोलीस विभाग असल्याचे दिसत आहे. तर, तिसऱ्या क्रमांकावर पंचायत समिती विभाग आहे. या तीन विभागात सर्वाधिक लाचखोरी असल्याचे स्पष्ट होत आहे. तसेच, निमशासकीय असणाऱ्या महावितरण विभागात देखील यंदा लाचेच्या कारवाया वाढल्या असून, त्याखाली महापालिका व पालिका असल्याचे दिसत आहे. दरम्यान, लाचखोरीमध्ये खालच्या स्तरातील कर्मचारीच जास्त आहेत असे नाही तर क्लास वन अधिकारीदेखील यंदा पकडले आहे.

चालू वर्षी शासनाकडे मालमत्ता गोठविण्याची ११ प्रकरणे प्रलंबित असून यामध्ये सर्वाधिक प्रकरणे ही नगर विकास विभागाची आहेत. शासनाच्या सक्षम अधिकाऱ्याकडे अभियोगपूर्व मंजुरीसाठी ३८९ प्रकरणे प्रलंबित असून यातील ११० प्रकरणे शासनाकडे तर २७९ प्रकरणे ही सक्षम अधिकाऱ्यांकडे प्रलंबित आहेत. यामध्ये ७५ प्रकरणे पोलिस विभागाची आहेत तर ३४ प्रकरणे महसुल विभागाची आहेत. सापळा प्रकरणांत ज्या आरोपीविरुध्द कारवाई केली आहे, त्यापैकी अद्यापपर्यंत १७४ जणांना निलंबित करण्यात आलेले नाही. शिक्षा झालेल्या सापळा प्रकरणांत अद्यापपर्यंत २२ जणांना बडतर्फ करण्यात आलेले नाही.

**१ जानेवारी ते २६ मार्च २०२५ पर्यंत परिक्षेत्रनिहाय नोंद गुन्हे**

| परिक्षेत्र | गुन्हे | आरोपी |
|---|---|---|
| मुंबई | १३ | २५ |
| ठाणे | १७ | २६ |
| पुणे | ३५ | ५४ |
| नाशिक | ३९ | ५६ |
| नागपूर | २३ | ३३ |
| अमरावती | १८ | २२ |
| छत्रपती संभाजीनगर | ३० | ४० |
| नांदेड | १६ | २४ |



## शालेय विद्यार्थ्यांवर दुष्कर्म करणाऱ्या कर्मचाऱ्यास निलंबित करा

**संभाजी बिग्रेडची जिल्हा प्रशासनाकडे मागणी**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ मार्च -**

शहरातील एका नामांकित शाळेतील शिशु वर्गातील चिमुरड्या मुलीवर गेल्या सहा महिन्यापासून अत्याचार करणाऱ्या त्या शाळेतील कर्मचाऱ्यास निलंबित करावे व संबंधित शालेय प्रशासनावरही कठोर कारवाई करण्यात यावी या मागणीचे निवेदन संभाजी ब्रिगेड महिला आघाडीचे जिल्हाध्यक्षा मीनल दास यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी व पोलीस आयुक्त यांना दिले आहे.

बदलापूर येथील अत्याचाराची घटना ताजी असताना शहरांमध्ये हा प्रकार घडलामुळे शालेय विद्यार्थी व पालक अतिशय भयभीत झाले असून त्यांच्यामध्ये असुरक्षितची भावना निर्माण झाली आहे. शासनाच्या निर्देशानुसार प्रत्येक शाळेत सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे बंधनकारक असतानाही अनेक शाळेमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित नाही तसेच अनेक शाळेमध्ये विशाखा समिती व तक्रारपेटी फक्त कागदोपत्री दाखवण्यात आलेली आहे याकडे शिक्षण विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष आहे. विशाखा समितीची बैठक महिन्यातून एकदा होत नाही. शाळेमध्ये प्रसाधनगृहाजवळ महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर करावे अश्या मागण्या या निवेदनात आहेत.

यावेळी संभाजी ब्रिगेडच्या महिला दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्ष सुनीता घंटे, शहर कार्याध्यक्ष जयश्री जाधव, मोनाली धुमाळ, मनिषा कोळी आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०७०

**मुक्तजीव सदा होति पै नामपाठें ।**
**तेंचि रुप ईटे देखिलें आम्हीं ।।**

अनेक संतांनी श्रीक्षेत्र पंढरपूरला 'भूवैकुंठ' असे म्हटले आहे. कलयुगामध्ये बौद्ध अवतारी समचरणी उभा असलेला पांडुरंग समतेचा संदेश देत आहे. समता ही चांगल्या समाजाचा आधारस्तंभ असते. समाजातील अनेक प्रश्नांचे मूळ कारण ही विषमता असते. विषमतेचे विष सामाजिक आरोग्य बिघडवते. प्रत्येक जीवाला इतर जीवाप्रमाणे आनंदाने जगण्याचा अधिकार आहे. ईश्वराला सर्व जीव समान असतात. असा संदेश देणारा हा पांडुरंग भक्त पुंडलिकाने भिरकावलेल्या वीटेवर समचरणी उभा आहे. त्याच्या समचरणाची प्रेरणा त्याचे सर्व भक्त घेत असतात.



म्हणूनच वारक-यांत कोणीही लहान मोठा नसतो. सर्व एकमेकांना लोटांगणी जातात. पांडुरंगाच्या अलंकाराप्रमाणे बुका, तुळशीमाळ परिधान करण्यात आणि त्याच्या नामाचे गुणगान करण्यात आनंद मानतात. वारकरी लोक आर्थिक दारिद्र्याला जुमानत नाहीत. लाखोंच्या संख्येने अनेक दिवस उन, वारा, पावसात यात्रा करतांनाही दु:खी, कष्टी होत नाहीत. पांडुरंगाच्या नामाचे वलय त्यांच्या भक्तांचे आत्मबल वाढवत असते. त्याच्या नामात दु:खावर मात करण्याची, सांसारिकाला सांसारिक दु:खाची जाणीव न होऊ देण्याची, अडचणीला तोंड देण्याची शक्ती असते. अशा संतानुभवाला मुक्ताईंनी दुजोरा दिला आहे. त्या म्हणतात,

**मुक्तजीव सदा होति पै नामपाठें ।**
**तेंचि रुप ईटे देखिलें आम्हीं ।।**

नावात काय पडलंय, असं जरी कुणी म्हणत असेल, तरीही प्रत्येकाच्या नावाला काही वलय असतं. पंढरीच्या नावाला तर वलय आहे म्हणजे आहेच. खरं म्हणजे हा अनुभूतीचा आणि विश्वासाचा विषय आहे. पांडुरंगाच्या नामपाठाने, त्याच्या चिंतनाने सांसारिक जीवाला जीवन जगण्याची दिशा मिळते. अकारण कोणाला त्रास देऊ नये, कोणाचे लुबाडू नये, कोणाला फसवू नये, कष्टाशिवाय काही मिळत नाही, इथले सर्व इथेच टाकून जावे लागणार आहे. एवढा विचार जरी पांडुरंगाच्या चिंतनातून मिळाला तरीही सांसारिक जीव सुखाने मुक्त होऊ शकतो. त्याच्या नावाच्या भोवती अशा विचारांचे वलय आहे, हे अनेक संतांच्या वचनांवरून दिसून येते. संत वचनांप्रमाणे सकारात्मकतेचे, प्रेमाचे, नि:स्वार्थ भावाचे, समतेचे वलय असलेले पांडुरंगाचे विटेवरचे रूप आम्ही पाहिले आणि आत्मानंदी झालो, असे मुक्ताई म्हणतात. देहू- आळंदी ते पंढरपूर पायी वारीत येणारे अनेक नवोदित लोक सहजपणे मीच्या जाळ्यातून बाहेर पडत असलेले आम्ही दिंडीत पाहत असतो. न झुकणारे, मी-मी म्हणणारे आपोआप वाकू, झुकू लागतात. आनंदाची अनुभूती घेऊ लागतात. मुक्ताईच्या या वचनाची ज्याला अनुभूती घ्यायची असेल त्यांनी आवश्यक एकदा तरी पायी वारीत यावे. त्यांना अनुभूती येणार म्हणजे येणारच.

**जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**


# ऑक्टेव २५ अंतर्गत आज गडगर्जना महानाट्य

## हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर होणार कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

ऑक्टेव २५ या तीन दिवसाच्या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमानंतर दि. २९ मार्च रोजी याच रंगमंचावर 'गडगर्जना' हे महानाट्य होणार आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांमधून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गड किल्ल्याविषयी माहिती देणारे महानाट्य सादर होणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक विभागाचे सहाय्यक संचालक संदीप शेंडे यांनी अनौपचारिक गप्पामध्ये माध्यमाशी संवाद साधताना दिली.

सांस्कृतिक कार्य मंत्री यांच्या संकल्पनेतून पूर्व भारतातील कलाकार यांनी सादर केलेल्या संस्कृती सोबतच महाराष्ट्राच्या संस्कृतिचे व इतिहासाचे दर्शन घडविणारे गडगर्जना या महानाट्याचे सादरीकरण दि.२९ मार्च रोजी होणार आहे. सांस्कृतिक विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली गडगर्जना या कार्यक्रमाचे आयोजन होणार असून महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य विभागाचे सर्व अधिकारी स्वतः सर्व नियोजनवर लक्ष ठेऊन असून छत्रपती शिवाजी महाराज यांचा सोनेरी इतिहास व वारसा जपण्यासाठी सांस्कृतिक विभाग सदैव पुढाकार घेत असून सर्वांनी या महोत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन केले. दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र नागपूर, आणि महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य विभाग मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने कालपासून पुढील तीन दिवस ऑक्टेव-२५ व सोबतच गडगर्जना हा कार्यक्रम चालणार आहे. पूर्वेत्तर राज्यांच्या नृत्य, कला, खाद्य संस्कृतीची ओळख करून देणारा तब्बल ३०० कलाकारांचा कार्यक्रम हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर आयोजित केला आहे.




'ऑक्टेव' च्या रंगमंचावरच गडगर्जना हे छत्रपती शिवरायांच्या गडकिल्ल्यांविषयी माहिती देणारे महानाट्य व शाहिरी कार्यक्रम होणार आहे.२०० पेक्षा जास्त कलाकारांचा समावेश असलेला हे महानाट्य सायंकाळी ६ ते ९ या वेळेत होणार आहे. शिवकालीन गड - किल्ले, राजांच्या मोहिमा, शिवराज्याभिषेक आदी शाहिरी आणि नाट्यमय माध्यमातून प्रेक्षकांच्या समोर सादर होणार आहे. छत्रपतींच्या शौर्यावर व पराक्रमावर आधारित या कार्यक्रमास जास्तीत जास्त तरुणांनी उपस्थिती दर्शवून महाराजांना अभिवादन करावे, असे आवाहन विभीषण चवरे यांनी केली.



# राजमाता जिजाऊ पुरस्काराने राजश्री जाधव सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

आविष्कार सोशल फाउंडेशन कोल्हापूर, यांच्या वतीने राजमाता जिजाऊ पुरस्कारचे नियोजन दि २३ रोजी सोलापूर येथील निर्मलकुमार फडकुले सभागृहामध्ये आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अनिल देशमाने, प्रमुख पाहुणे दिपक आरवे, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय पवार अशा अनेक थोर मान्यवरांच्या हस्ते सन्मानपूर्वक गौरविण्यात आले. राजश्री संजय जाधव (कवयित्री, साहित्यिका, सामाजिक कार्यकर्त्या) या गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक साहित्यिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करत आहेत. अनेक गरजु लोकांना नेहमी मदत करत असतात. ३०० हून अधिक कविता, चारोळ्या त्यांनी लिहिलेले आहेत.

# छत्रपती संभाजी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त आज मूकपदयात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त पाळल्या जाणाऱ्या धर्मवीर बलिदान मासाच्या समारोपदिनी शनिवारी (दि. २९) श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान सोलापूर विभागातर्फे मूकपदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

नवी पेठेतील शिवस्मारक येथील मैदानातून शनिवारी (दि.२९) सायंकाळी ५.३० वाजता या मूकपदयात्रेस प्रारंभ होणार आहे. धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांनी हिंदू धर्मासाठी दिलेल्या दिव्य बलिदानाची आठवण हिंदू समाजाच्या चित्तात कायम तेवत रहावी याकरिता फाल्गुन प्रतिपदा ते फाल्गुन अमावस्या असा संपूर्ण महिनाभर धर्मवीर बलिदान मास पाळला जातो. या संपूर्ण महिनाभरात धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांना दररोज चौका चौकांमध्ये एकत्र येऊन श्रद्धांजली वाहणे, गोड पदार्थांचा तसेच पादत्राणांचा त्याग करणे, मुंडण करणे, कोणत्याही आनंदोत्सवाच्या कार्यक्रमात सहभागी न होणे असे



व्रत शेकडो युवक पाळत आहेत. श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे संस्थापक गुरुवर्य श्री संभाजीराव भिडे गुरुजी यांनी ४२ वर्षांपूर्वी हिंदू समाजाला दिलेले हे व्रत अखंडपणे पाळले जात आहे. यंदाच्यावर्षीही सोलापूर शहरात ७६ ठिकाणी धर्मवीर बलिदान मासानिमित्त महिनाभर दररोज श्रद्धांजली वाहण्यात येत आहे. धर्मवीर बलिदान मासाचा समारोप शनिवारी (दि. २९) रोजी सायंकाळी ५.३० वाजता निघणाऱ्या मुकपदयात्रेने होणार आहे. या मूकपदेयात्रेत हिंदू बांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहन श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान सोलापूर विभागातर्फे करण्यात आले आहे.

# दिवंगत स्वातंत्र्यसैनिक, समाजसेवक यांच्या नामफलकाचा विषय बासनात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

महापालिकेच्या फेब्रुवारी २०२२ या महिन्यातील पुरवणी सर्वसाधारण सभेत सभासद प्रस्ताव क्रमांक ४९६ नुसार स्वातंत्र्यसेनानी चंद्रशेखर म्हमाणे आणि सभासद प्रस्ताव क्रमांक ५०९ नुसार समाजसेवक आनंद सारंगी या दिवंगतांचे नामपलक अनुक्रमे शुक्रवार पेठ आणि साखर पेठ परिसरातील रस्त्यावर लावण्याचा विषय आला होता. परंतु आजतागायत हे दोन्हो विषय बासनात गुंडाळून ठेवल्याचे दिसून येत आहे.

स्वातंत्र्यसेनानी तथा स्वातंत्र्यसैनिक उच्चाधिकार समितीचे माजी अध्यक्ष कै. चंद्रशेखर म्हमाणे हे काँग्रेस पक्षाचे कट्टर पाईक तर समाजसेवक कै. आनंद सारंगी हे भारतीय जनता पार्टीचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून गणले जायचे. विशेष म्हणजे, भाजपाच्या नगरसेवकांनी कै. म्हमाणे तर काँग्रेसच्या नगरसेवकांनी कै. सारंगी यांच्या नामपलक विषयबाबतचा प्रस्ताव मांडला होता. तत्कालिन महापौर श्रीकांचना यन्नम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या एका पुरवणी सर्वसाधारण सभेत अमर पुदाले व नागेश भोगडे या भाजपाच्या नगरसेवकांनी शुक्रवार पेठेतील गदगे घर ते किणीकर घरापर्यंत कै. चंद्रशेखर म्हमाणे तर विनोद भोसले व वैष्णवी करगुळे या काँग्रेसच्या नगरसेवकांनी साखर पेठेतील उदयोग बँक ते संयुक्त चौक या मार्गाला कै. आनंद सारंगी यांच्या नामपलकाबाबतचा प्रस्ताव सादर केला होता. स्वातंत्र्यसेनानी कै. म्हमाणे आणि समाजसेवक कै. सारंगी यांनी सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत, ठसा उमटविला होता. त्यांच्या कार्याची नवीन पिढीला ओळख व्हावी आणि त्यांचे स्मरण कायम राहावे; यासाठी शुक्रवार पेठ परिसरातील रस्त्याला कै. म्हमाणे तर साखर पेठ परिसरातील रस्त्याला कै. सारंगी यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी करण्यात येत आहे.

# आज सुन्द्री सम्राट संगीत महोत्सव

**सोलापूर, दि. २८ मार्च-**

सुन्द्री सम्राट कै. सिद्राम जाधव सांस्कृतिक कला मंडळ सांस्कृतिक मंत्रालय, सांस्कृतीक कार्य सचलनालय महाराष्ट्र शासन गितांजली पेन्ट यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २९ मार्च रोजी सुन्द्री सम्राट संगीत महोत्सव आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थेचे सचिव पंडित भिमण्णा जाधव यांनी अशी माहिती दिली. शनिवार दि. २९ मार्च रोजी सायं ५.३० वाजता हिराचंद नेमचंद वाचनालय लोकमान्य टिळक सभागृह अंप्पी थिएटर पार्क चौक उस्ताद रईस बाले खान यांच्या हस्ते सुन्द्री सम्राट संगीत महोत्सवाचे उद्घाटन होईल. यावेळी महोत्सवाची सुरूवात पाचव्या पिढीचे बाल कलाकार मास्टर व्यंकटेशकुमार जाधव, मास्टर सिद्राम जाधव, शकुंतला जाधव, मयुरेश जाधव सरस्वती जाधव कलाश्री जाधव यांच सामूहिक सुन्द्री वादन यांना नितीन दिवाकर हे सहकलावंत म्हणून तबल्याची साथ करतील. तसेच यावेळी प्रसिद्ध पखवाज वादक ज्ञानेश्वर दुधाने यांचा ऐकलं पखवाज वादन होईल यांना सवादिनी वर वैभव केंगार हे साथ करतील रसिका कुलकर्णी सानिका कुलकर्णी यांचा शास्त्रीय गायनाचे कार्यक्रम सादर करतील सहकारी कलाकार म्हणून तबला दादा मुळे सवादिनी विपुल कुलकर्णी साथ करतील. आंतराष्ट्रीय किर्तीचे उस्ताद रईस बाले खान याचा सतार वादन होईल त्यांना ऋषिकेश बदामीकर तबला साथ करतील या संपूर्ण सगीत महोत्सव निवेदन साकव फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. जगदीश पाटील करणार आहेत. हा कार्यक्रम हिराचंद नेमचंद वाचनालय, किर्लोस्कर सभागृहामध्ये होत असून, ते सर्वांसाठी खुले आणि मोफतमध्ये आहे. तरी कला रसिकांनी याचा लाभ घ्यावा, असे अवाहन पंडित जाधव यांनी केले आहेत.




# बालनाट्य प्रशिक्षण शिबिराचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

सांस्कृतिक कार्य विभाग महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्यालय यांच्यावतीने व सांस्कृतिक मंत्री ॲड. अशीष शेलार यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव माननीय विकास खारगे यांच्या प्रेरणेने व माननीय संचालक विभीषण सवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर येथे फडकुले सभागृहात दि.१७ ते २६ मार्च या कालावधीत बालकांसाठी दहा दिवसीय बालनाट्य प्रशिक्षण शिबिर संपन्न झाले.

२६ मार्च रोजी प्रशिक्षणार्थी बालकांच्या सादरीकरणाने शिबिराचा समारोप झाला. याप्रसंगी शिबिरार्थी बालकलावंतांनी रामायणातील प्रसंग तुकारामाच्या जीवनातील प्रसंग देवी आख्यान याशिवाय शिबिर नाटिका असे विविध कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून मसपसे पद्माकर कुलकर्णी उपस्थित होते. नरेंद्र गंभीरे नरेंद्र काटेकर व रंगकर्मी सुनंदा शेंडगे यांची उपस्थिती होती. शिबिरार्थी बालकांना नरेंद्र गंभीरे, पद्माकर कुलकर्णी यांच्या हस्ते सहभाग प्रमाणपत्रे वाटण्यात आली. सोलापुरातील विविध शाळेतील ७२ मुलांनी आपल्या सहभाग नोंदवला होता. शिबिर समन्वयक म्हणून डॉ. मीरा शेंडगे यांनी जबाबदारी पाडली. त्यांना अंजली मित्र गोत्रे मीनल परांजपे, वैशाली गुंड व योगशिक्षिका प्रांजली लागू यांचे सहकार्य लाभले. दहा दिवसीय या बालनाट्य प्रशिक्षण शिबिरात सोलापुरातील श्रीपाद येरमाळकर, प्रा.गणेश मुडेगावकर, सुनील गुरव, संदीप जाधव, डॉ. गणेश शिंदे, धनंजय सरदेशपांडे, नृत्य दिग्दर्शक श्री व सौ काठवे यांनी दहा दिवस मार्गदर्शन केले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी अमोल धाबळे, अंजली मित्रगोत्रे, मीनल परांजपे यांचे सहकार्य लाभले.

# जैन कासार संस्थेच्या वतीने काव्यवाचन स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

प्रतिवर्षाप्रमाणे दिगंबर जैन कासार समाज संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय काव्य वाचन स्पर्धा संपन्न झाली. यावेळी संस्थापक अध्यक्ष पोपटलाल डोर्ले, वर्तमान अध्यक्ष विजय अण्णा कासार, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. धन्यकुमार बिराजदार, संघटक प्रा. सुभाष दगडे, कार्याध्यक्ष महावीर दुरुगकर यांची उपस्थिती होते. यावेळी पोपटलाल डोर्ले यांनी समाजातील अनिष्ठ, कालबाह्य विचार दूर करून समाजात शांती प्रस्थापित करण्याचे करण्याचे काम कविता करते. कवितेमुळे यश प्राप्त होते. कविता केवळ कला म्हणून नाही, तर ती मानवी भावना व्यक्त करण्याचे, संस्कृती जपण्याचे आणि विचारांना नवी दिशा देण्याचे साधन आहे, असे मत व्यक्त केले. विजय कासार यांनी संस्थेच्या विकासाचा आढावा घेत स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी मुंबई, पुणे, नागपूर, धाराधिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर जिह्यातील कवींनी सहभाग घेत सामाजिक विषयांवर प्रकाश टाकला. भारतीय समाजातील नारीचे स्थान, वृद्धांच्या व शेतकऱ्यांच्या समस्या, निसर्गप्रेमावर आधारित कविता सादर करीत सर्वांना मंत्रमुग्ध केले. परीक्षक म्हणून कवयित्री वंदना कुलकर्णी व प्रा. माधव कुलकर्णी यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी केले तर ॲड. प्रभा मांगले यांनी आभार मानले.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. २९ मार्च २०२५ | छत्रपती संभाजी महाराज |
| विक्रम संवत् २०८०-८१ | पु.ति., दर्श अमावास्या |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - फाल्गुन | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| अमावास्या चैत्र (१६.२८) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - उ. भाद्रपदा (१९.२७) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - ब्रह्मा (२२.०३) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - किंस्तुघ्न (२६.३९) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** मनात अशांती असल्या कारणाने आपल्याला संकटाचा सामना करावा लागेल. नौकरी रोजगारात जबाबदारीनुसार काम करा. आर्थिक अडचणीमुळे मन त्रस्त राहील.

**वृषभ :** आत्मविश्वास कमी झाल्यामुळे मन लागणार नाही. व्यापार व्यवसाय मध्यम राहील. झालेल्या कामात आलेल्या अडचणीवर मात कराल. मुलांची काळजी राहील.

**मिथुन :** कार्य क्षमतेमध्ये वाढ होईल. धार्मिकतेकडे मन झुकेल. अपूर्ण राहिलेले काम वेळेत पूर्ण होण्याचे योग आहेत. स्पर्धेमध्ये यश मिळेल.

**कर्क :** उतावीळपणामुळे नुकसान होण्याची शक्यता. कामात झालेल्या बदलामुळे कष्ट होण्याची शक्यता. व्यापार मध्यम राहील.

**सिंह :** आपल्या कामाचे प्रतिफळ ताबडतोब मिळेल. कार्याचा विस्तार वाढून अनकूल परिस्थिती निर्माण होईल. काही महत्वपूर्ण निर्णय घ्याल.

**कन्या :** आपले प्रयत्न यशस्वी होतील. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. विचार पूर्वक निर्णय घेतल्याने फायदा होईल.

**तुळ :** प्रत्येक क्षेत्रात आपल्याला मान सन्मान मिळेल. शांत व विवेक बुद्धीने काम केल्यास यश मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील. व्यापार व्यवसाय चांगला चालेल.

**वृश्चिक :** आपल्या पराक्रमीवृत्तीमुळे आपल्याकडे येणाऱ्या लोकांचा ओढा जास्त राहील. कोणाचाही तिरस्कार करू नका.

**धनु :** न्यायालयीन कामात यश मिळेल. व्यापारात नुकसान होण्याचे योग आहेत. घरातील वृध्द व्यक्तिंच्या आरोग्याची काळजी घ्या.

**मकर:** अनिश्चितता राहील. सर्व कामे मनासारखी होतील. वैयक्तीक जीवनात सावध रहा. विशेष सहकार्य व मार्गदर्शन मिळेल. विलासी प्रवृत्ती वाढेल.

**कुंभ :** प्रभावशाली व्यक्तित्वामुळे आपल्या गोष्टी लोकांपर्यंत पोहचविण्यात यशस्वी व्हाल. आर्थिक लाभ झाल्याने आनंदी रहाल.

**मीन :** आपल्या बुद्धीच्या जोरावर आखलेल्या योजना यशस्वी होतील. आपल्या कामकाजात बदल होण्याची शक्यता आहे. वाहन चालवतांना सावधानी बाळगा.




# पर्यावरण संरक्षण ही आपली सामुहिक जबाबदारी : डॉ. वडगबाळकर

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. २८ मार्च-**

पर्यावरण संवर्धन, जतन आणि संरक्षण ही आपली सामुहिक जबाबदारी असून ते आपण कर्तव्य भावनेने केले पाहिजे, असे मत ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ आणि राम नदीचे अभ्यासक डॉ. श्रीनिवास वडगबाळकर यांनी व्यक्त केले.

राम नदीशी नाते निर्माण व्हावे, तिच्या जैवविविधतेचा अभ्यास व्हावा, तिची स्वच्छता राखण्यासाठी तरुण पिढी प्रेरीत व्हावी सुरू करण्यात आलेल्या 'राम नदी पुनरूज्जीवन अभिमान' ला नुकतीच पाच वर्षे पूर्ण झाली असून यानिमित्त किर्लोस्कर वसुंधरातर्फे आयोजित पाचव्या ऑनलाईन 'किर्लोस्कर वसुंधरा राम नदी महोत्सवा'च्या समारोपाप्रसंगी आजडॉ. श्रीनिवास वडगबाळकर यांना ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ, लेखक आणि अभ्यासू विचारवंत डॉ. माधव गाडगीळ यांच्या हस्ते पहिला राम नदी सेवक सन्मान प्रदान करण्यात आला, त्यावेळी पुरस्काराला उत्तर देताना डॉ. श्रीनिवास वडगबाळकर बोलत होते. पत्रकार भवन येथे झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी व्यासपीठावर फॅसलिटेटर आनंद चितळे, किर्लोस्कर वसुंधराचे क्युरेटर डॉ. गुरुदास नूलकर आणि 'किर्लोस्कर वसुंधरा' चे संयोजक वीरेंद्र चित्राव उपस्थित होते. प्रास्ताविक संयोजक वीरेंद्र चित्राव यांनी केले. सूत्रसंचालन अनिल गायकवाड यांनी केले.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती, मो.
९९६००५३५२१

### अलक:-९२ विश्व हिंदू परिषद

दिनांक २४ नोव्हेंबर १९६३ ला श्री गुरुजींचा कार्यक्रम बेळगाव (कर्नाटक) ला होता. त्यांना खास करून भेटायला त्रिनिदादचे एक संसद सदस्य श्री शंभुनाथ कपिल देव आले होते त्रिनिदाद मध्ये हिंदूंना हिंदू संस्कार देण्याची कोणतीच व्यवस्था नव्हती. अगदी नामकरणापासून ते विवाहापर्यंत सारे संस्कार इसाई धर्मगुरू गिरिजा घरात करायचे. हे संस्कार हिंदू पद्धतीने करण्याकरता इथले पंडित-पुरोहित तिथे यावेत अशी त्यांनी गुरुजीं जवळ इच्छा व्यक्त केली. त्याआधी भारत सरकारने त्यांना त्यांची ही इच्छा आम्ही पूर्ण करू शकत नाही, कारण आम्ही सेक्युलर आहोत असे रोखठोक सांगितले होते. परंतु गुरुजी आणि देव या दोघांच्या वार्तालापाची उपलब्धता म्हणजे जगभरातील हिंदूंना प्रेरणा/ मार्गदर्शन / सहायता देण्यासाठी एक विश्वव्यापी संस्था स्थापित करण्याचा निर्णय झाला. आणि श्री गुरुजींनी त्याची जबाबदारी संघाचे जेष्ठ प्रचारक श्री शिवराम शंकर उपाख्य दादासाहेब आपटे यांच्यावर सोपवली. त्यानंतर दादासाहेब देशभरातील गणमान्य महानुभावांना भेटले. आणि मग २९-८-१९६४ ला श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर स्वामी चिन्मयानंदजींच्या आश्रमात म्हणजे सांदिपनी साधनालय मुंबई येथे विश्व हिंदू परिषदेची स्थापना झाली. या बैठकीत स्वामी चिन्मयानंदजी, स्वामी शंकरानंद सरस्वतीजी, शीख पंथाचे नेता मास्टर तारासिंह, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, स्वतः श्री गुरुजी, नैरोबीचे श्री सूद एवं श्री पोद्दार, आणि त्रिनिदादचे श्रीराम कृपलानी, तसेच चारही पिठाचे शंकराचार्य, बौद्ध, जैन, शीख धर्मगुरु, अशा सर्व पंथ संप्रदायाचे आचार्य स्थापनेच्या बैठकीत होते आणि मग १९६६ च्या कुंभमेळ्यातील पावन पर्वत पहिले वैश्विक हिंदू संमेलन उत्तर प्रदेशातील प्रयाग येथे झाले त्यावेळी २२ देशातील २५००० प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता. या संमेलनात खूप महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. पहिला म्हणजे सकल हिंदू बंधू बंधू आहेत. हिंदु पतित होत नाही. हिंदवाः सहोदराः सर्वे, न हिंदुः पतितो भवेत् ।। त्याचप्रमाणे अस्पृश्यतेला व जातीभेदांना हिंदू धर्माची मान्यता नाही. अशी स्पष्ट घोषणा परिषदेने केली. हिंदू म्हणजे प्रतिगामी-अंधश्रद्ध- जातीयवादी अशी रूढ कल्पना खोडून टाकली. आणि गर्वसे कहो हम हिंदू है हा विश्वासाचा भाव समाजात जागृत केला.

**क्रमशः**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### तालुकास्तरीय परसबाग स्पर्धेमध्ये पडस्थळ शाळेचा तृतीय क्रमांक

**करकंब, दि. २८ मार्च-**

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानाअंतर्गत द्वितीय पुरस्कारप्राप्त जि. प. प्राथमिक शाळा पडस्थळ (ता.पंढरपूर) या शाळेने तालुकास्तरीय परसबाग स्पर्धेमध्ये तृतीय पुरस्कार मिळवला. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष कल्याण गव्हाणे, दत्तात्रय चौगुले व सदस्य शाळेचे विद्यार्थी यांनी यासाठी परिश्रम घेतले. गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे, केंद्रप्रमुख मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. मुख्याध्यापक शेखर रसाळ, सुप्रिया आमले यांनी परसबागेचे उत्तम नियोजन केले. दत्तात्रय होनमाने, संभाजी गोळे, सुरेश नायकुडे, बंडू गोळे, गणेश गव्हाणे, गणेश गलांडे, त्रिंबक सावंत, बंडू होनमाने, प्रताप झिटे, अप्पाराव गायकवाड, प्रदीप गायकवाड, धनाजी अडसूळ, चंद्रकांत पाखरे, शिवाजी होनमाने, दत्तात्रय रोकडे, सचिन बोंगाणे, तंटामुक्त अध्यक्ष प्रकाश बोंगाणे यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.



### आझाद युवा फाउंडेशनच्यावतीने आवश्यक वस्तूंचे किट वाटप

**टेंभुर्णी, दि. २८ मार्च-**

रमजानच्या पवित्र महिना चालू असून रमजान ईद चार पाच दिवसावर असतानाच सालाबादप्रमाणे याही वर्षी मुस्लिम समाजातील गोरगरीबांना रमजान सणाला आवश्यक लागणाऱ्या वस्तूंचे किट वाटप करण्यात आले. आझाद युवा फाउंडेशनच्यावतीने सामाजिक कार्य म्हणून दिवाळी व रमजान सणा निमित्ताने गोरगरीब हिंदू व मुस्लीम बांधवांना लागणाऱ्या वस्तूंचे वाटप करत सलोख्याचे संबंध राखण्यासाठी प्रयत्न असतात. यावेळी अध्यक्ष अजीज शेख म्हणाले, ईदला लागणारे सर्व वस्तूंचे किट दिले. उद्योजक अय्युब पटेल व जावेद शेख यांचेही सहकार्य लाभले. उपाध्यक्ष समीर जहागिरदार, सचिव इम्तियाज सय्यद, खजिनदार आसिफ शेख, डॉ शहाजहान काझी, उद्योजक अय्युब पटेल, जावेद शेख, अमिर काझी, रब्बेसलाम शेख, अस्लम शेख, फारुख देशमुख, इम्रान बागवान उपस्थित होते.



### कुसमोड ग्रा. पं.च्या सरपंचपदी शहाजी लेंगरे यांची बिनविरोध निवड

**पिलीव, दि. २८ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड ग्रामपंचायतीच्या रिक्त असणाऱ्या सरपंच पदाच्या निवडीसाठी आज निवडणूक निर्णयधिकारी तथा मंडलाधिकारी संदीप चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली सर्व ग्राम पंचायत सदस्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी सरपंच पदासाठी शहाजी दत्तू लेंगरे यांचा एकमेव अर्ज आल्यामुळे सरपंचपदी त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी ग्राम पंचायत सदस्य तुषार लवटे, स्वाती मदने, बाळासो धायगुडे, राणी पवार, शारदा धायगुडे, उमा कचरे, रेखा पालखे उपस्थित होते. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणुन मंडलाधिकारी संदीप चव्हाण यांनी काम पाहीले तर सहाय्यक म्हणून ग्रामसेवक नवले यांनी काम पाहीले. यावेळी हनुमंत धायगुडे, लक्ष्मण पवार, संजय पाटील, शहाजी लेंगरे, गणेश लेंगरे, अंकुश लेंगरे, महेश जाधव,चंद्रकांत सरगर, शंकर लेंगरे, शाम धायगुडे, वसंत लेंगरे, अशोक लेंगरे, नितीन लेंगरे, अनिल लेंगरे, शिवाजी धायगुडे, कांता लेंगरे, गोपाळ माळी, विशाल इरकर, महेश लेंगरे, वसंत लेंगरे, धनाजी लेंगरे, उमाजी बोडरे, विशाल बोडरे, देवा चव्हाण उपस्थित होते. निवडीनंतर नूतन सरपंच शहाजी लेंगरे यांचा माजी सरपंच तुषार लवटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.




### भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्यावतीने शहिदांना अभिवादन

**बार्शी, दि. २८ मार्च-**

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्यावतीने कॉम्रेड शहीद भगतसिंग, सुखदेव, राजगुरु यांना अभिवादन करणारी सभा घेण्यात आली. यावेळी शहीद यांच्या प्रतिमेला कामगारांच्या मुलांच्या हस्ते पुष्पहार करुन सभेची सुरुवात झाली. सभेचे अध्यक्ष कॉम्रेड प्रा. तानाजी ठोंबरे हे होते. यावेळी कॉम्रेड प्रविण मस्तुद म्हणाले, शाहिद भगतसिंगाच्या घरामध्ये असणारे क्रांतिकारी वातावरण व राष्ट्रीय चळवळीचा प्रभाव भगतसिंगांवर होता. पुढे रशियन कामगार क्रांती, जगभरातील क्रांत्या, जगातील क्रांतिकारकांचे विचार, मार्क्सवाद लेनिनवादाचा अभ्यास यामुळे ते वर्ग संघर्षाचे समर्थक बनले, देशात क्रांती घडवून आणून श्रमिक वर्गाने सत्ता हस्तगत करावी व भांडवली व्यवस्था उध्वस्त करुन टाकावी, यासाठी ते नौजवाणन सभा, किर्ती किसानसभा, हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशन या संघटनेच्या माध्यमातून काम करत राहिले, त्यांनी कम्युनिस्ट पक्ष संस्थापक मुजफ्फर अहमद यांच्याशी जेलमधून बाहेर आल्यानंतर संपर्क साधला होता,

# मोहोळ स्थानकावर सर्व रेल्वे गाड्यांना थांबा मिळावा

### रेल्वमंत्री आश्विनी वैष्णव यांना दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.२८ मार्च-**

सध्या मोहोळ रेल्वे स्थानकावर सोलापूर-पुणे पॅसेंजर वगळता कोणतीच रेल्वे थांबत नाहीत. त्यामुळे मोहोळ शहरासह तालुक्यातून पुणे, मुंबईकडे जाणाऱ्या प्रवाशांची गैरसोय होत आहे. तरी पूर्वीप्रमाणेच आणि काही नव्या रेल्वे गाड्यांना थांबा मिळावा अशी मागणी खासदार धनंजय महाडिक यांनी रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



स्वातंत्र्यपूर्व काळापासून मोहोळ रेल्वे स्थानकावर थांबत असलेल्या रेल्वे गाड्या कोरोना काळापासून थांबणे बंद झाल्या आहेत. त्याबाबत मोहोळ तालुका भाजपा, व्यापारी संघटना, बार असोसिएशन यांच्यावतीने खासदार महाडिक यांना यासंदर्भात निवेदन देऊन पाठपुरावा करण्याची मागणी केली होती. त्यामध्ये प्रदेश भाजपाचे उपाध्यक्ष शंकरराव वाघमारे, भाजपचे तालुका अध्यक्ष सुनील चव्हाण, सरचिटणीस महेश सोवनी, प्रज्ञावंत आघाडीचे जिल्हा सहसंयोजक अविनाश पांढरे, जिल्हा उपाध्यक्ष सुशील क्षीरसागर आणि सतीश काळे, पिंटू राउत आदी पदाधिकारी, व्यापारी संघटना, बार कौन्सिल तसेच तालुक्यातील अनेक नागरिकांचा समावेश होता. त्या अनुषंगाने खासदार महाडिक यांनी रेल्वेमंत्री वैष्णव यांची भेट घेतली. या निवेदनात पुढे म्हटले आहे की, मोहोळ येथे पूर्वी सिद्धेश्वर एक्सप्रेस आणि मेल या सुपरफास्ट गाड्यांना थांबा होता. त्याचबरोबर कलबुर्गी-कोल्हापूर एक्सप्रेस आणि हुतात्मा एक्सप्रेस मोहोळ येथे थांबावी अशी सातत्याने मागणी होत आहे. या गाड्यांना थांबा झाल्यास नागरिकांना व व्यापाऱ्यांना त्याचा लाभ होईल. तसेच ५० किलोमीटर सोलापूर आणि कुर्डूवाडीला मोहोळ तालुक्यातील लोकांना जाण्याकरिता अंतर जास्त पडते. त्यामुळे येथे रेल्वे पूर्ववत थांबाव्यात. मोहोळ येथील व्यापारी वर्गाला त्याचा फायदा होणार आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी याबाबत तातडीने सकारात्मकरित्या विचार करू आणि नागरिकांची व व्यापारांची गैरसोय होणार नाही, असे आश्वासित केले असल्याचे खासदार महाडिक यांनी सांगितले.

> **रेल्वे थांब्या संदर्भात आणखी पाठपुरावा करणार**
>
> मोहोळ रेल्वेस्थानकावर रेल्वे थांबविण्यासंदर्भात निवेदन मिळाले आहे. त्या अनुषंगाने केंद्रीय मंत्र्यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली आहे. त्यांनी यासंदर्भात सकारात्मकता दर्शवलेली आहे. तरीही मे महिन्यात रेल्वे सल्लागार समितीची बैठक आहे. या समितीचा मी सदस्य आहे. त्यावेळी देखील हा प्रश्न मांडून मोहोळ येथे रेल्वे थांबविण्यासाठी पाठपुरावा करेन.
>
> **-धनंजय महाडिक , खासदार**

## लहुजी शक्ती सेनेच्या जिल्हा संपर्क प्रमुखपदी वसंत देडे



**अक्कलकोट, दि. २८ मार्च-**

लहुजी शक्ती सेना जिल्हा संपर्क प्रमुखपदी वसंत देडे यांची निवड झाल्याबद्दल अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद अक्कलकोट तालुका शाखा व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ यांच्या वतीने आरपीआय एकतावादी रोजगार आघाडी प्रदेशाध्यक्ष विकीबाबा चौधरी यांच्या हस्ते पुष्पगुच्छ पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विकीबाबा चौधरी, नंदकुमार जगदाळे, स्वामीराव गायकवाड, राजेशकुमार जगताप, निरंजन माने, सोहम माने, छबू सोनार उपस्थित होते.

## संजवाडचा नितीन बिराजदार ठरला गावातील पहिला अधिकारी

### एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण

### पोलीस उपनिरीक्षकपदी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील सीना नदीकाठच्या संजवाड या छोट्याशा गावातील नितीन बिराजदार हा तरुण एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाला. त्याची पोलीस उपनिरीक्षकपदी निवड झाली आहे. गावचा शेतकऱ्याचा मुलगा प्रशासनातील अधिकारी झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी सोसायटीचे माजी चेअरमन पारप्पा बिराजदार, माजी सरपंच पंडित बुळगुंडे, भाजपा तालुका सरचिटणीस रामचंद्र बिराजदार, भाजपा महिला आघाडीच्या तालुकाध्यक्षा अंबिका पाटील, माजी सरपंच बाजीराव बुळगुंडे, पोलीस हवालदार महादेव शिवशरण, नितीनचे वडील तुकाराम बिराजदार, आई लक्ष्मीबाई बिराजदार, विठ्ठल बिराजदार, भीमाशंकर बिराजदार, भाऊ भोजराज बिराजदार, मलकारी बुळगुंडे, नाना पाटील,गुरप्पा बुळगुंडे, दावल मुल्ला, श्रीशैल बिराजदार, धर्मराज गुंडे, सोमशेखर जमादार,बसवंत बिराजदार, संजय व्हनमाने उपस्थित होते. यावेळी नितीन बिराजदार यांनी बोलताना म्हणाले की आई-वडिलांचे कष्ट, मोठ्या भावाची साथ यामुळे हे यश मला मिळाले. अधिकारी व्हायचं या ध्येयाने मी अभ्यास केला. थोडा वेळ लागला पण यश मिळाले याचे समाधान आहे. यापुढेही आणखी अभ्यास करून उच्च पदावर जाण्याचे माझे प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले .





## अंगणवाडी सेविका मदतनीसांना मिळाले नियुक्ती पत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. २८ मार्च-**

नवीन निवड झालेल्या अंगणवाडी सेविका मदतनीसांना नियुक्तीचे पत्र एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प माळशिरस (ग्रामीण)च्या बाल विकास प्रकल्प अधिकारी आसमॉ आतार व प्रकल्प अकलूज (ग्रामीण) चे बालाजी अल्लाडवाड यांनी दिले असून १ एप्रिलपासून सेविका व मदतणीस सेवेत होणार आहेत.

माळशिरस तालुक्यातील माळशिरस (ग्रामीण) व अकलूज (ग्रामीण) एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प मधील ४ सेविका व २८ मदतणीस भरती प्रक्रिया राबविण्यात आली. यामध्ये निवड झालेल्या अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस यांच्या मूळ कागदपत्राची तपासणी आज करण्यात आली त्यानंतर त्यांना नियुक्तीचे पत्र देण्यात आले.

## जि.प. देवबासूळ वस्ती शाळेच्या प्रांजल झगडेची नवोदयसाठी निवड

**नातेपुते, दि. २८ मार्च-**



जवाहर नवोदय विद्यालय परीक्षेमध्ये मोरूची तालुका माळशिरस येथील जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा देवबासूळ वस्ती शाळेची विद्यार्थिनी प्रांजल झगडेची पुणे येथील नवोदयसाठी निवड झालीफ तिच्या या यशामध्ये सहाय्यक शिक्षिका हसीना मुजावर, ज्ञानदा ॲकॅडमी मांडवेचे संचालक आदित्य साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या या यशाबद्दल शाळेच्या वतीने व संपूर्ण मोरोची गावाच्या वतीने प्रांजल तसेच तिचे आई-वडील राजेंद्र झगडे व माधुरी झगडे यांचे अभिनंदन करण्यात आले.

## झिंजेवस्ती येथील मदने यांची पोलीस उपनिरीक्षकपदी निवड

**पिलीव, दि. २८ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील झिंजेवस्ती येथील संतोष बापुराव मदने यांची नुकतीच पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नतीने निवड झाली. ते २००३ मध्ये ठाणे पोलीस दलात पोलीस कॉन्स्टेबल या पदावर निवड झाली. त्यानंतर मणीकपुर, वसई,मिरा रोड पोलीस स्टेशन ठाणे येथे अटि करप्शन बुरो ठाणे याठिकाणी काम केले. नंतर मिरा भाईंदर, वसई विरार याठिकाणी क्राईम ब्रँचमध्ये काम केले. ही नोकरी करीत असताना एलएलबीचे शिक्षण पूर्ण केले. संतोष मदने यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद जावळेवस्ति याठिकाणी पाचवी ते दहावी कर्मवीर भाऊराव पाटील विदयालय पिलीव, अकरावी, बारावी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय अकलूज, एम .ए कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर याठिकाणी झाले.



## रांझणी भिमानगर ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी प्रितम पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २८ मार्च-**

रांझणी भिमानगर (ता. माढा) या ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी प्रितम अक्षय पाटील यांचा एकमेव अर्ज आल्याने प्रितम पाटील यांची निवड बिनविरोध करण्यात आली.



सरपंच संगिता पाटोळे यांनी राजीनामा दिल्याने हि जागा रिक्त झाली होती. माढा तालुक्याचे मा.आमदार बबनराव शिंदे यांचे कट्टर समर्थक मा. कृषी व पशुसंवर्धन सभापती संजय पाटील भिमानगरकर यांच्या नेतृत्वाखाली गेली तीस वर्षे निर्विवाद वर्चस्व असलेल्या ग्रामपंचायतीत लाखांची कामे आजपर्यंत झाली असून अनेक रस्ते व सार्वजनिक कामांना मा. आमदार बबनराव शिंदे यांनी आजपर्यंत भरभरून निधी दिला आहे व येणाऱ्या काळात देखील असाच ग्रामपंचायतीचा विकासासाठी अहोरात्र मेहनत घेण्याची तयारी आहे असे मत मा कृषी व पशुसंवर्धन सभापती संजय पाटील भिमानगरकर यांनी व्यक्त केले.यावेळी पांडुरंग पाटील, वसंत पाटील, विनोद चव्हाण, मोहन पाटील, राहुल चौगुले, प्रमोद कदम, विजय सरवदे, दादाराम गुटाळ, रोहित गायकवाड, दिलीप चव्हाण, खंडू कदम, अर्जुन चव्हाण, ज्ञानदेव भिसे, शिवाजी भिसे, तुकाराम चौगुले, विजय पतुल, दिलीप पाटील, पंडित पाटील,सतिश पाटील,राजेंद्र पाटील, गणेश पाटील, उत्रेश्वर पाटील, बाळासाहेब पाटील, दत्तात्रय पाटील,अक्षय पाटील, प्रशांत पाटील, प्रदीप पाटील, प्रदीप बाबर, रामभाऊ मेटे, पृथ्वीराज पाटील,संदिप पाटील, राजवर्धन जगताप, भरत मस्के, नितीन मस्के, अशोक मोहिते, वसंत चव्हाण, मा.सरपंच सुनिता संजय पाटील, संगिता पाटोळे, सोनाली पांडुरंग माने, मंदाकिनी दत्तात्रय पाटील, चंचला विजय पाटील, दिपाली तानाजी गायकवाड, धनश्री सचिन नलवडे, नेताजी चमरे, तानाजी गायकवाड, मल्हारी गवळी, श्रीकांत ढगे, सचिन नलवडे, सचिन चव्हाण, अर्जुन पाटील, नेवरे भाऊसाहेब, सुदाम देशमुख, पिंटू सल्ले, मुकुंद बागल, धनंजय ढवळे, साहेबराव जाधव, वरूण पाटोळे उपस्थित होते. पुढच्या काळात ग्रामपंचायतीच्या विकासासाठी संजयदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मी कटीबद्ध राहिल, असे मत नूतन सरपंच प्रितम पाटील यांनी केले.

## परप्रांतीय कामगाराच्या मुलाचे नवोदय परिक्षेत यश

**करमाळा दि.२७ मार्च**

मध्यप्रदेश येथील झबूआ जिल्ह्यातील सुरीनाला येथील परप्रांतीय कामगाराच्या मुलाने नवोदय प्रवेश परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.



आकाश जोगडीया डामोर असे या विद्यार्थ्याचे नाव असून तो वाशिंबे (ता. करमाळा) येथील मराठी माध्यम असलेल्या शरदचंद्र पवार विद्यालयाचा विद्यार्थी आहे. नवोदय प्रवेश परीक्षेत यश संपादन केल्यामुळे त्याला ६ वी ते १२ वी पर्यंतचे शिक्षण केंद्रीय बोर्ड(सीबीएससी)नुसार मोफत मिळणार आहे. नवोदय परिक्षेत यश संपादन करणारा तो वाशिंबे येथील पहीलाच विद्यार्थी ठरला आहे. आकाशचे कुटुंब मुळचे मध्यप्रदेश मधील सुरीनाला या छोट्या गावातील असून मागील १२ वर्षापासून त्याचे कुटुंब उजनी लाभक्षेत्रातील वाशिंबे येथे मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. लहान वयातच आकाशला आपल्या परस्थितीची जाणिव आहे. त्यामुळे त्याने जिद्दीने अभ्यास करून हे यश संपादन केले. त्याचे शिक्षक उमेश पवार व इतर शिक्षकांनी त्याची जिद्द पाहून त्याला वेळोवेळी मार्गदर्शन केले. त्याच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष विजय साळुंखे, मुख्याध्यापक रमेश यादव, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# सांगोल्यात सिंचनची क्षेत्रीय, विभागीय कार्यालये व्हावीत

### चेतनसिंह केदार-सावंत यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२८ मार्च-**

सांगोल्यात सर्व सिंचन प्रकल्पाची क्षेत्रीय व विभागीय कार्यालये व्हावीत, अशी मागणी भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



वीर धरणाअंतर्गत नीरा उजव्या कालव्याचे सांगोला शाखा कालवा क्रमांक ४ व ५ द्वारे तालुक्यातील सुमारे १० हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आहे. परंतु सदर प्रकल्पाचे विभागीय कार्यालय नीरा उजवा कालवा विभाग फलटण (ता.फलटण, जि.सातारा) येथे आहे. म्हैशाळ उपसा सिंचन योजने अंतर्गत तालुक्यातील सुमारे ४ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आहे व ०.८ टीएमसी इतके पाणी उपलब्ध आहे. सदर योजनेचे विभागीय कार्यालय म्हैशाळ पंपगृह विभाग क्रमांक २ सांगली ता.सांगली, जि.सांगली येथे आहे. टेंभू उपसा सिंचन योजने अंतर्गत तालुक्यातील सुमारे २० हजार हेक्टर सिंचनाखाली आहे व ३ हजार हेक्टर क्षेत्रावर नव्याने सिंचन करण्याचे प्रस्तावित आहे. या योजने अंतर्गत तालुक्यात ४.५ टीएमसी पाणी उपलब्ध असून सदरच्या योजनेचे विभागीय कार्यालय टेंभू उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग ओगलेवाडी (ता.कराड, जि.सातारा) येथे आहे. स्व. बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजना या अंतर्गत तालुक्यातील १३ हजार हेक्टर क्षेत्र सिंचन करण्याचे प्रस्तावित आहे. सदर योजनेचे विभागीय कार्यालय उजनी कालवा विभाग क्रमांक ९, मंगळवेढा, जि.सोलापूर येथे आहे. याशिवाय तालुक्यात माण नदीवरील १४ को.प.बंधारे, कोरडा नदीवरील २ को.प.बंधारे असून १४ लघु व एक मध्यम पाटबंधारे प्रकल्प आहेत. सदर प्रकल्पावरील सिंचन क्षेत्र सुमारे १० हजार हेक्टर इतके आहे. परंतु सदर प्रकल्पाचे क्षेत्रीय व प्रशासकीय कार्यालय भीमा पाटबंधारे विभाग, पंढरपूर, जि.सोलापूर येथे आहे.

> सर्व सिंचन प्रकल्पा अंतर्गत तालुक्यातही सुमारे ४४ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली असून सुमारे १६०० हेक्टर वरील सिंचन प्रकल्प प्रस्तावित असून, सदर प्रस्तावित प्रकल्पाची भूमिपूजन होऊन, प्रकल्प कार्यन्वित करण्यात आलेले आहेत. या सर्व बाबीचा विचार करता प्रशासकीय तसेच क्षेत्रीय कामाकरिता तसेच अन्य बाबी करीत इतक्या मोठ्या क्षेत्रातील लाभधारकांना संबंधित कामा करीता सुमारे १०० किमी प्रवास करून हेलपाटे मारावे लागतात. त्या करीता उपरोक्तच्या सिंचन प्रकल्पाची क्षेत्रीय व विभागीय कार्यालये सांगोला व्हावीत अशी मागणी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली आहे.
>
> **-चेतनसिंह केदार सावंत, जिल्हाध्यक्ष, भाजपा**

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## सांगोल्याच्या कवयित्रींचा पुण्यात सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २८ मार्च-**

श्री साई प्रतिष्ठान वडगावशिरी, पुणे यांनी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने रंग जीवनाचे या शिर्षकाखाली राष्ट्रीय स्तरावर साहित्य संमेलन आयोजित केले होते. या संमेलनात सांगोला शहरातील सहभागी दोन कवयित्रींना काव्यगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हर्षदा दयानंद गुळमिरे, मनिषा राजेंद्र ठोंबरे यांना काव्यगौरव सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्र व पुस्तक मान्यवरांच्या हस्ते तसेच प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष संजयभाऊ चौधरी यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आले. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### माढा नगरपंचायतकडून मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुलीची मोहीम

**माढा, दि. २८ मार्च-**

३१ मार्चच्या अनुषंगाने माढा नगरपंचायतीच्या वतीने मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुली ची मोहिम मुख्याधिकारी नेहा कंठे यांनी सुरु केली आहे. ज्या नागरिकांची मालमत्ता कर पाणीपट्टीची रक्कम थकीत असेल त्यांचे नळ कनेक्शन कट करण्यात आले आहेत. सदरील कारवाई माढा शहरातील कसवा पेठ, कानडे गल्ली, मारकड वाडा, साठे गल्ली, झेंडे गल्ली येथे करण्यात आली आहे. तसेच जे नागरिक ३१ मार्च २०२५ पूर्वी थकीत मालमत्ता कर व पाणीपट्टीची रक्कम भरणार नाहीत अशा नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल अशी माहिती मुख्याधिकारी कंठे यांनी दिली आहे. या वसुली मोहिमेत मुख्याधिकारी नेहा कंठे कार्यालयीन अधिक्षक प्रदिप शिंदे, नगरअभियंता ओंकार सोनवणे, पाणीपुरवठा अभियंता पंडित भोरे, लेखापाल समीर नदाफ, अंतर्गत लेखापरिक्षक गजानन हंगे स्वच्छता निरिक्षक दत्तात्रय गायकवाड व वसुली लिपीक, पाणीपुरवठा कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला. मुख्याधिकारी कंठे यांच्याकडून शहरातील नागरिकांना मालमत्ता कर व पाणीपट्टी वेळेत भरून नगरपंचायत प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.



### कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी कुरेशी यांचा अर्ज दाखल

**वळसंग, दि. २८ मार्च-**

कृषी उत्पन्न बाजार समितीचे राजकारण रणधुमाळ घालत असताना अक्कलकोटचे माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या पाठबळ घेऊन वळसंग मध्ये अर्ज भरण्यात आले आहे. काँग्रेस पक्षाचे उमेदवारी मिळवण्याची प्रयत्न करत वळसंग तालुका दक्षिण सोलापूर येथील ग्रामपंचायत प्रतिनिधी कोटातून माजी उपसरपंच विद्यमान ग्रामपंचायत सदस्य आरिफ कुरेशी यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे अर्ज दाखल केले. अर्ज दाखल करताना गावातील प्रतिष्ठित नागरिक व सोसायटीचे अनेक सभासद उपस्थित होते.

### करमाळ्याच्या विवेक कांबळे यांचे संशोधन आंतरराष्ट्रीय परिषदेत सादर

**करमाळा, दि. २८ मार्च-**

करमाळा शहरातील सिद्धार्थ नगर येथील रहिवासी विवेक उर्फ मंगेश कांबळे यांनी बुधवार दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजी पुणे येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषदेत डॉ. बी. आर. आंबेडकर आणि त्यांचे आधुनिक भारतासाठी योगदान या विषयावर संशोधनपर पत्र सादर केले. ब्रिक्स वर्ल्ड ऑफ ट्रॅडिशन, मॉस्को (रशिया), कर्जतचे दादा पाटील महाविद्यालय, औंधचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पिंपरीचे महात्मा फुले महाविद्यालय आणि पुणेची स्नेहवर्धन संशोधन संस्था यांच्या संयुक्तपणे २९ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद चिंचवड येथे झाली. त्यामध्ये 'आधुनिक भारताच्या निर्मितीत देश-विदेशातील व्यक्तिमत्त्वांचे योगदान' या विषयावर संशोधन पर निबंध सादर करण्यात आले. त्यावेळी विवेक कांबळे यांनीही संशोधनपर पत्र सादर केले. श्री. कांबळे हे ग्लोबल सायन्स इन्स्टिट्यूटमध्ये पाच वर्ष कार्यरत होते. सध्या ते लातूर येथील एका शिक्षण संस्थेत शिक्षक आहेत. कांबळे यांना ब्रिक्स, वर्ल्ड ऑफ ट्रॅडिशन, मॉस्काचे अध्यक्ष ल्युडमिला सेकाचेवा, प्राचार्य डॉ. संजय नगरकर, स्नेहवर्धन संशोधन संस्थेचे संचालक डॉ. स्नेहल तावरे यांच्या वतीने सहभागिता प्रमाणपत्र देण्यात आले.



### लाभार्थ्यांनी आधार कार्डला मोबाईल लिंक करून घ्यावे : तहसीलदार मुळीक

**मोहोळ, दि. २८ मार्च-**

संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ राज्य सेवानिवृत्ती वेतन योजनेच्या सर्व लाभार्थ्यांना शासन स्तरावरून डीबीटी पोर्टलद्वारे अर्थसाह्य खात्यावर जमा करण्याचे कामकाज चालू आहे किंवा ग्राम महसूल अधिकारी तलाठी यांचेकडे हयातीचे दाखले सादर केलेल्या लाभार्थ्यांना शासन स्तरावरून डीबीटीद्वारे अर्थसाह्य वाटप केले आहे. लाभार्थ्यांनी ज्या बँकेत आधार लिंक केलेले आहे त्या खातेवर अर्थसाह्य जमा झालेले आहे. ज्या लाभार्थ्यांचे अर्थसहाय्य जमा झालेले नाही त्यांनी बँक खात्याला व आधार कार्डला मोबाईल नंबर संलग्न / लिंक करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने मोहोळ तालुक्यातील संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ राज्य सेवानिवृत्ती राज्य वेतन योजनेच्या सर्व लाभार्थ्यांनी महा-ई-सेवा केंद्र मध्ये जावून आधार अपडेट करुन आधार कार्डला मोबाईल क्रमांक लिंक करून घेण्यात यावे व आधारला लिंक केलेला मोबाईल घेऊन तहसील कार्यालय मोहोळ संजय गांधी शाखा मोहोळ येथे संपर्क साधावा असे आवाहन मोहोळ तहसीलदार सचिन मुळीक यांनी केले आहे.

# अधिकाऱ्यांनो, आठ दिवसात अहवाल द्या; अन्यथा कारवाई करणार

● आ. सुभाष देशमुख, आ. कल्याणशेट्टी यांची आमसभेत तंबी

- चार तास चालली दक्षिणची आमसभा
- माईकचा ताबा घेण्यासाठी झाली तू-तू.. मै-मै
- समस्या सांगताना माईकचा ताबा घेण्यासाठी कार्यकर्त्यांमध्ये वाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, २८ मार्च-**

वारंवार हेलपाटे मारूनही काम होत नसल्याने नागरीकांच्या वेदना तक्रारीद्वारे व्यक्त होतात. त्या तक्रारींचे निराकरण करून आठ दिवसात अहवाल द्या; अन्यथा अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा इशारा दक्षिणचे आ. सुभाष देशमुख व अक्कलकोटचे आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी दिला.

दक्षिण सोलापूरची आमसभा शिवछत्रपती रंगभवनमध्ये पार पडली, यावेळी आमदार देशमुख, आमदार कल्याणशेटी, तहसीलदार किरण जमदाडे, गटविकास अधिकारी शंकर कवितके, माजी उपसभापती रामप्पा चिवडशेटी, भाजपाचे ज्येष्ठ नेते हणमंत कुलकर्णी, माजी सभापती अशोक देवकते यांच्यासह सरपंच व सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते. ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्या सुटत नसल्याने आमसभेत अधिकाऱ्यांविरोधात असंतोष होता. यावेळी अनेकांनी चार तास समस्या सांगत अधिकाऱ्यांविरूध्द तक्रारी सांगितल्या. दोन वर्षे आमसभा न झाल्याने नागरीकांमधून आमसभेची उत्सुकता होती. मात्र अधिकाऱ्यांच्या अनास्थेमुळे ग्रामसभेत साधकबाधक चर्चा होऊन आमसभा पार पडली. यावेळी नागरीक व सरपंच यांनी दक्षिणमधील दस्त नोंदणी, शेतकरी कर्जमाफी, वडापूर धरण, एनटीपीसी, ओव्हरलोड गाडयांवर कारवाई, पोलीसांची कारवाई, डान्सबार महिन्यात बंद करावे, दारूबंदीसह अवैद्य धंदे बंद करावे, अधिकृत आर्केस्ट्रा बार बंद करा, मटक्यावर कारवाई, उत्पादन शूल्क कारवाई वाढवा, औज कुरघोट कत्तलखान्यावर कारवाई करा, वीज डीपीबाबत तक्रारी, वीज तक्रारीकडे वेळेवर लक्ष देत नाही, एमएसईबीचे दुर्लक्ष, शाळांच्या निकृष्ट खोल्या, आरटीई प्रवेश अडचणी, पाणीपुरवठा टंचाईसह विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी उपस्थित आमदारांनी अधिकाऱ्यांना सूचना देऊन नागरीकांच्या समस्या सोडविण्याच्या सूचना दिल्या.



> **विकासावर चर्चा**
> अधिकार्यांनी नागरीकांच्या कामांना प्राधान्य दिल्यास तक्रारी वाढणार नाहीत. आमसभेत विषय चर्चेला येणार नाहीत. त्यामुळे अधिकार्यांनी नागरीकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावे. तक्रार केलेल्या नागरीकांबरोबर गैरसमजूतीतून वर्तन ठेवू नका. अन्यथा कारवाईस मागेपुढे पाहणार नाही. अधिकार्यांनी नागरीकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करावे. घरकुल बांधकाम पूर्ण करून बिल देताना लेनदेन व्यवहार बंद करण्यात यावे. भाजपा आमदारांकडून विकासकामा साठी निधी देताना हयगय करण्यात येत नाही.
> **- सचिन कल्याणशेटी,** आमदार, अक्कलकोट

**गोवंश हत्या रोखावे**

वळसंग पोलीस ठाणेसह इतर पोलीस ठाणेच्या हद्दीत गोवंश हत्या होत असेल तर पोलीसांनी गोवंश हत्या रोखण्यासाठी प्रयत्न करावे. अन्यथा त्यांच्यावर सक्त कारवाई करण्यात येणार असल्याचे आमदारांनी सांगितले.

**अवैद्य धंदे बंद करा**

दक्षिणमधिल पोलीस ठाणेच्या हद्दीत गावठी दारू, डान्सबार, मटका, जुगार व इतर अवैद्य धंदे सुरू आहेत. त्यामुळे पोलीसांनी हद्दीतील सर्व अवैद्य धंदे बंद करावेत. अन्यथा त्यांच्यावर कारवाई करण्याची शिफारस करण्यात येणार असल्याचे आमदारांनी सांगितले.

**अनेक विभागप्रमुखांची दांडी**

आमसभा ठरल्यानंतर संबंधित विभागप्रमुखांना उपस्थित राहण्याचे सूचना देण्यात आले होते. मात्र अनेक विभागप्रमुखांनी आमसभेत त्यांच्याविरोधात तक्रार करणार असल्याने दांडी मारली. तर गटविकास अधिकारी शंकर कवितके यांनी नाव घेतल्यानंतरही अनेक विभागप्रमुखांनी व्यासपीठावर उत्तर देण्याचे टाळून नागरीकांमध्येच ठिया मारले. काही अधिकारी आमसभा संपण्यापूर्वी निघून गेले. त्यामुळे त्यांच्यावर कारवाईची मागणी करण्यात आली.

**मुख्यमंत्र्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देगाव एकरूख सिंचन योजनेसाठी निधी उपलब्ध करून दिल्याने नागरीकांना उजनीचे पाणी मिळाले. शिवाय मतदारसंघातील अनेक विकासकामांसाठी मोठया प्रमाणात निधी दिल्याने दोन्ही आमदारांकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन ठराव करण्यात आले.

**एमआयडीसी करणारच**

मंद्रुपसह परीसरातील तरूणांच्या रोजगारनिर्मितीसाठी शेतकर्यांची संमती घेऊन मंद्रुपसह निंबर्गी, कंदलगाव व माळकवठे या भागात एमआयडीसी करणार आहे. त्यामुळे राजकारण न करता शेतकर्यांनी संमती द्यावे.

**देवकते स्मारक अध्यक्ष नको**

माजी मंत्री आनंदराव देवकते यांनी दक्षिणच्या विकासासाठी मोठया प्रमाणात त्याग केला आहे. म्हणून दक्षिणमध्ये त्यांचे स्मारक होणे गरजेचे आहे. मात्र स्मारक समितीचा अध्यक्ष माझ्याकडे असल्याने सातही बैठकांना सदस्य गैरहजर गैरहजर राहीले आहेत. मी स्मारकसाठी निधी देण्यास तयार असून स्मारक समितीचे अध्यक्षपद दुसर्यांना देण्यात यावे. असे आ. देशमुख यांनी सांगितले.



## चपळगावच्या हनुमान मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठापनेसह कळसारोहण उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि.२८ मार्च-**

तालुक्यातील चपळगाव येथील जागृत दक्षिणमुखी हनुमान मंदिरात नवीन मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करून कळसारोहण कार्यक्रम मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला.

श्री स्वामी समर्थ समाधी मठाचे प.पु.अण्णु महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली येथील सर्व धार्मिक कार्यक्रम पार पडला. प्रारंभी मंगळवारी पंढरपूर येथुन आणलेल्या दक्षिणमुखी नवीन हनुमान मुर्तीची मिरवणूक गावातील मुख्य मार्गावरून काढण्यात आली. हजारो सुवासिनींनी कुंभकळस घेऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली.बुधवारी सायंकाळी नवीन मुर्तीची प्राणप्रतिष्ठापना व नव्याने बांधण्यात आलेल्या मंदिरावरील शिखरावर कळसारोहण कार्यक्रम पार पडले.दरम्यान या धार्मिक कार्यक्रमासाठी सहभागी भाविकांसाठी पंचकमिटीकडुन दिवसभर महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी चपळगाव व बावकरवाडीतील तरुण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.या धार्मिक कार्यक्रमास आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी भेट दिली.त्यांच्या हस्ते मंदिर सभागृहाचे लोकार्पण करण्यात आले.भरघोस निधी दिल्याबद्दल पंचकमिटी व ग्रामस्थांकडून आ. सचिन कल्याणशेट्टी यांचा सत्कार करण्यात आला.

## स्वामी समर्थ प्रकटदिनानिमित्त वटवृक्ष मंदिरात विविध कार्यक्रम

**पारंपारीक पध्दतीने स्वामींचा जन्म सोहळा, पाळणा अन् आरती**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२८ मार्च-**

सालाबादाप्रमाणे येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान मुळस्थान च्या वतीने श्री. वटवृक्ष स्वामी मंदिरात श्री स्वामी समर्थ महाराजांचा प्रकटदिन सोहळा सोमवार दिनांक ३१ मार्च रोजी साजरा होत आहे. या दिवशी श्री स्वामी प्रकटदिन ते श्री स्वामी समर्थांच्या पुण्यतिथी पर्यंत अक्कलकोट शहरातून निघणाऱ्या प्रभात फेरीस श्री. स्वामी प्रकटदिन रोजी पहाटे ४ वाजता प्रारंभ होईल.

पहाटे ५ वाजता श्रींची काकडआरती होईल. त्यानंतर स्वामी भक्तांच्या गर्दीमुळे श्री स्वामी समर्थांचे दर्शन सुलभतेने होणेसाठी स्वामी भक्तांचे नित्यनियमाने होणारे अभिषेक होणार नाहीत. जे स्वामी भक्त अभिषेकाची पावती करतील त्यांना प्रसाद व अंगारा मिळेल. सकाळी १० ते १२ या वेळेत देवस्थानच्या ज्योतीबा मंडपात सत्संग महिला भजनी मंडळ यांच्या वतीने सालाबादाप्रमाणे भजनसेवा होऊन गुलाल, पुष्प वाहिले जाईल. त्यानंतर दुपारी १२ वाजता पाळणा कार्यक्रम भजनगीताने संपन्न होवून मंदार महाराज यांच्या वाणीतून प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते पाळण्यातील श्रींची आरती होईल. आरती नंतर देवस्थानच्या वतीने सर्व भाविकांना पाळणा सोहळ्याचे सुंठवडा प्रसाद वाटप करण्यात येईल. दुपारी १२ ते २ या वेळेत देवस्थानच्या मैंदर्गी-गाणगापूर रोडवरील भक्त निवास भोजनकक्ष येथे स्वामी भक्तांना स्वामी प्रसाद म्हणून भोजन प्रसाद देण्यात येईल.



दुपारी २ ते ४ या वेळेत पुण्यातील गायिका जया कर्णिक यांची गायनसेवा स्वामी चरणी संपन्न होईल. यानंतर श्रींचा पाळणा कार्यक्रम झालेला असल्याने मंदिरात नित्य नियमाने रात्री ७. ४५ ते ८. ४० या वेळेत होणारी श्रींची शेजारती स्वामी प्रकट दिन रोजी होणार नाही. तसेच रविवार दि.३० मार्च रोजी गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर श्री स्वामी समर्थांच्या चरणी समर्थांच्या १४७ व्या पुण्यतिथी महोत्सवाच्या कार्यक्रम पत्रिकेचे पूजन सकाळी ११ वाजता होणार आहे. यानंतर श्रींची नैवेद्य आरती होईल. नैवेद्य आरतीनंतर देवस्थानकडून उपस्थित स्वामी भक्तांना प्रसाद वाटप करण्यात येईल. श्री. वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानची अधिकृत वेबसाईट लवकरच स्वामी भक्तांच्या सेवेत उपलब्ध होईल. तरी स्वामी भक्तांनी श्रींचे दर्शन, पाळणा कार्यक्रम, भोजन महाप्रसाद आदी सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन देवस्थान विश्वस्त समितीच्या वतीने देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांनी केले आहे.

## बार्शीत पर्यावरणविषयक ग्रंथालयाची उभारणी

**बार्शी, दि. २८ मार्च-**

बार्शी शहर व परिसरात शिवजयंतीचे औचित्य साधून वृक्ष संवर्धन समितीने झाडांसह पर्यावरणविषयक पुस्तके संकलित केली आहेत. या पुस्तकांच्या रुपाने ग्रंथालयाची उभारणी करण्यात आली आहे.

या ग्रंथालयामध्ये पर्यावरणाशी संबंधित सर्व घटक वनस्पती, वेली, झाडीझुडपे, प्राणी, पक्षी, शेती, जंगल, रानभाज्या, औषधी वनस्पती, पाणी आदी संदर्भात उपयुक्त माहिती असलेली पुस्तके वाचकांना मोफत वाचण्यासाठी उपलब्ध असतील. ग्रंथालयाचे उद्घाटन बार्शी विभागाचे वन अधिकारी मनोज बारबोले यांच्या उपस्थितीत करण्यात आले. मधुकर डोईफोडे, मदन देगावकर, संजय बारबोले, प्रशांत काळे, दिनेश मेटकरी, प्रा. शशिकांत धोत्रे, संदीप पवार आदी उपस्थित होते. उमेश काळे यांनी स्वागत तर सदस्य राहुल तावरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सचिन चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले.

## कुंभेज येथे रविवारपासून संगीतमय श्रीराम कथा

● प्रज्ञाचक्षू विद्याभूषण हभप मुकुंदकाका जाटदेवळेकर करणार कथा निरूपण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ मार्च-**

कुंभेज (ता.माढा) येथे श्रीरामनवमी जन्मोत्सवानिमित्त गुढीपाडवा रविवारी ३० मार्चपासून अखंड रामनाम सप्ताह व संगीत श्रीराम कथेचे आयोजन करण्यात आले आहे. प्रज्ञाचक्षू विद्याभूषण हभप मुकुंदकाका व हभप गोविंद महाराज जाटदेवळेकर रामकथेचे निरूपण करणार असल्याची माहिती संयोजक विजय कुलकर्णी यांनी दिली.





येथील श्रीराम मंदीरात रविवार ३० मार्च ते ७ एप्रिल दरम्यान होणाऱ्या या रामनाम सप्ताह व रामकथेचे आयोजन येथील सेवानिवृत्त बँक अधिकारी विजय कुलकर्णी व सुनिता कुलकर्णी यांनी केले आहे. या उत्सवाची सुरूवात रविवारी पहाटे चार वाजता अभिषेकपूजा, कलशपूजन, गुढी व ध्वजपूजनाने होईल. अध्यात्म रामायण संहितेचे वाचन वेदमूर्ती सर्वेश्वर शास्त्री कुलकर्णी हे करणार आहेत. तर रामकथेसाठी गायनाचार्य म्हणून हभप हरिओम पवार (आळंदी) तसेच तबलावादक म्हणून उपळाई (बु।।) येथील संगीत विशारद पवन पाटील यांची साथ लाभणार आहे. रामकथेची सुरूवात रविवारी सकाळी आठ ते दहा या वेळेत अयोध्या व सूर्यवंश वर्णन या विषयावर कथा निरूपणाने होणार आहे.

त्यानंतर ३१ मार्च ते ५ एप्रिल दररोज चार ते रात्री आठ वाजेपर्यंत कथा होणार आहे. यामध्ये पुत्रकामेष्टी यज्ञ, श्रीराम जन्म, विश्वामित्र गमन, अहिल्या उध्दार, श्रीसीता स्वयंवर, श्रीराम वनवास, केवट प्रसंग, भारद्वाजाश्रमागमन, पंचवटी वर्णन,सीताहरण, शबरीभेट, हनुमंत भेट, सुग्रीवाशी मित्रता, श्रीसीता शेध, सेतूबंधन याबाबतची कथा होईल तर सहा एप्रिल रोजी सकाळी आठ ते बारा या वेळेत श्रीराम रावण संग्राम, श्रीराम राज्याभिषेक सोहळा याबाबतची कथा होणार आहे. सहा एप्रिलला सायंकाळी सहा वाजता पालखी मिरवणूक होणार आहे. तर सात एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता समर्थभक्त हभप कौस्तुभबुवा रामदासी (मिरज) यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे.

त्यानंतर विजय कुलकर्णी व सुनिता कुलकर्णी यांच्यावतीने महाप्रसादाची पंगत होऊन उत्सवाची सांगता होणार असल्याचे विजय कुलकर्णी यांनी सांगितले. या सर्व कार्यक्रमासाठी कुंभेजकर ग्रामस्थ, कुंभेजकर, कुलकर्णी परिवार यांचे सहकार्य असल्याचेही श्री. कुलकर्णी यांनी सांगितले. रामकथा श्रवणासाठी परिसरातील नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहनही श्री. कुलकर्णी यांनी केले आहे.



## हसीना पैगंबर यांना राजमाता जिजाऊ पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. २८ मार्च-**

मोरोची (ता. माळशिरस) येथील देवबा सुळ वस्ती येथील जिल्हा परिषद शाळेतील सहशिक्षक हसीना पैनगंबर मुजावर यांना राज्यस्तरीय राजमाता जिजाऊ पुरस्कार २०२५ आविष्कार सोशल फाउंडेशन इंडिया या संस्थेच्या वतीने देण्यात आला.

संस्था गेल्या १९ वर्षापासून सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक कला व क्रीडा क्षेत्रात कार्यरत आहे समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांना या संस्थेतर्फे दरवर्षी गौरवण्यात येते. हसीना पैगंबर मुजावर यांना त्यांचे, शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीमुळे दि. २३ मार्च रोजी डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात पुरस्कार प्रदान करण्यात आला.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ग्रामदैवत केदारलिंग यात्रेनिमित्त आज दीपोत्सव, पालखी मिरवणूक

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२८ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील ग्राम ीण तीर्थक्षेत्र विकास योजनेत समावेश झालेल्या ग्रामदैवत श्री. केदारलिंगेश्वर देवालयाच्या यात्रेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. गुढीपाडव्यादिवशी ही यात्रा संपन्न होणार आहे.

जळकोट येथील ग्रामदैवत श्री. केदारलिंगेश्वर देवालयाची यात्रा ही प्रत्येक वर्षी गुढीपाडव्यादिवशी पार पडते. श्री केदारलिंगेश्वर मंदिर ट्रस्टच्यावतीने दरवर्षी गुढीपाडव्याला यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यावर्षीही यात्रेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. यात शनिवार (दि.२९) रोजी सायंकाळी ७ वा. मंदिरात दीपोत्सवाची ज्योत पेटवण्यात येणार आहे. त्यानंतर महाप्रसाद देण्यात येणार आहे. गुढीपाडवा (दि.३०) रोजी सकाळी श्री केदारलिंगेश्वर देवालयाची पालखी मिरवणूक वाजत गाजत नंदीकोलसह गावातून मिरवणूक करण्यात येणार आहे. या मिरवणुकीत पुरवंत आपला खेळ सादर करतील. त्यानंतर श्री केदारलिंगेश्वर मंदिरात सार्वजनिक पूजा व धर्मसभेचे आयोजन करण्यात आले आहे. या धर्मसभेत नंदगाव विरक्त मठाचे मठाधिपती श्री. श्री.श्री.शत राजशेखर महास्वामी यांच्या दिव्य सानिध्याखाली गावातील दानशूर व्यक्ती, विविध क्षेत्रात यश मिळवलेल्या मान्यवरांचा सत्कार करण्यात येणार आहे. त्याचबरोबर दिवसभर भाविकांना दर्शनाचा लाभ मिळणार आहे.

# वशिल्याने पुरस्कार दिल्याची चर्चा : आरोग्य विभागाच्या नीतिमत्तेचे आरोग्य धोक्यात?

### अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून पैसे घेऊन पुरस्कार दिल्याचा आरोप ?

### माजी पालकमंत्र्यांचा पीए राहिल्याने आरोग्य अधिकाऱ्यास कोणी काही बोलेना!

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ मार्च -**

आरोग्य विभागाच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. पुरस्कार वाटपात वशिलेबाजी आणि आर्थिक देवाणघेवाण झाल्याचा आरोप होत असून, संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई होत नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या वादग्रस्त अधिकाऱ्याने काही काळ माजी पालकमंत्र्यांचा पीए म्हणून जबाबदारी पार पाडली होती. त्यामुळेच त्यांच्या विरुद्ध कोणीही आवाज उठवण्यास धजावत नसल्याचे बोलले जात आहे.

आरोग्य विभागात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दरवर्षी पुरस्कार दिले जातात. या पुरस्कारांमुळे अधिकारी आणि कर्मचारी अधिक प्रेरित होतात, तसेच त्यांच्या कार्यक्षमतेला पाठबळ मिळते. मात्र, यावर्षी पुरस्कार मिळवण्यासाठी काही कर्मचाऱ्यांकडून मोठी रक्कम वसूल केली गेल्याचा गंभीर आरोप केला जात आहे. काही निवडक कर्मचाऱ्यांनाच पुरस्कार मिळाले, तर खऱ्या अर्थाने चांगली आरोग्य सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना वंचित राहवे लागले आहे. आरोग्य विभागातील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ठराविक कर्मचाऱ्यांकडून लाच घेतली आणि त्यानंतरच त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामुळे अनेक कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे.

या संपूर्ण प्रकारात एका विशिष्ट अधिकाऱ्याचे नाव वारंवार समोर येत आहे. हा अधिकारी पूर्वी पालकमंत्र्यांचा पीए राहिल्याने त्याला विशेष संरक्षण मिळत असल्याची चर्चा शुक्रवारी पुरस्कार वितरण झाल्या नंतर ऐकावयास मिळत होती. त्या अधिकाऱ्याने आरोग्य विभागात आल्यानंतर काही निवडक कर्मचाऱ्यांना फायदा करून दिला असून, अनेक नीतिमत्तेच्या चौकटी मोडीत काढल्याचे बोलले जात आहे.

पुरस्कारांसाठी निकष ठरवलेले असतात, मात्र यंदा अनेक निकष झुगारून देत ज्या कर्मचाऱ्यांनी पैसे दिले त्यांनाच पुरस्कार दिल्याची चर्चा आहे. हे गंभीर प्रकरण आहे, मात्र वरिष्ठ स्तरावरून कोणीही लक्ष देत नाही, असे एका कर्मचाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले.

आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना पुरस्कार देताना पारदर्शकता अत्यंत म हत्वाची असते. अशा प्रकारच्या घटनांम ुळे प्रामाणिक कर्मचारी हताश होत असून, त्यांचा विभागावरचा विश्वास कमी होत आहे. केवळ आर्थिक देवाणघेवाण आणि वशिल्याच्या जोरावरच जर सन्मान दिले जात असतील, तर या पुरस्कारांचे महत्त्वच नष्ट होईल.

हा प्रकार केवळ एका तालुक्यातच नव्हे, तर इतर तालुक्यांमध्येही घडला असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. अशा परिस्थितीत, शासनाने आणि संबंधित उच्च अधिकाऱ्यांनी याची गंभीर दखल घेणे आवश्यक आहे.

या संपूर्ण प्रकरणाची चौकशी व्हावी, अशी मागणी अनेक कर्मचारी करत आहेत. आरोग्य विभागाने यावर तत्काळ चौकशी करून सत्य समोर आणले नाही, तर या विभागावरील विश्वास कमी होईल. तसेच, चुकीच्या पद्धतीने पुरस्कार मिळवणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रोत्साहन मिळेल, हे प्रशासनाने लक्षात घ्यायला हवे.

सरकार आणि वरिष्ठ अधिकारी या प्रकरणाकडे दुर्लक्ष करत असतील, तर आमच्या मेहनतीची किंमत काय? असा सवाल अनेक कर्मचाऱ्यांनी उपस्थित केला आहे. आता हे पाहावे लागेल की, शासन यावर काय भूमिका घेते आणि दोषींवर कारवाई करण्यास कितपत तत्पर राहते.

## संक्षिप्त वृत्त...



### जळकोटवाडी शाळेत स्वयंशासन दिन

**जळकोट, दि.२८ मार्च -**

येथून जवळच असलेल्या जळकोटवाडी (नळ) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या चौथीच्या विद्यार्थ्यांचा स्वयंशासन दिन उत्साहात साजरा झाला. विद्यार्थ्यांना शिक्षकी पेशांची जाणीव व्हावी व त्यांना अध्यापनाचा अनुभव यावा. यासाठी दि.२८ रोजी शाळेत स्वयंशासन दिन साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका म्हणून आर्या जामगे हिने तर आदिती राठोड हिने उपमुख्याध्यापक म्हणून कार्य केले. श्रेया लष्करे, स्वरा सुरवसे, विराट राठोड, तेजस कदम यांनी अध्यापन केला. परिपाठ सुरुवात झाल्यानंतर सर्वात स्वच्छ विद्यार्थी कोणता याची खातरजमा करून प्रथम क्रमांक काढण्यात आला व त्या विद्यार्थ्याला बक्षीस देण्यात आले. विद्यार्थ्यांनी मनसोक्त अध्यापनाचा आनंद घेतला. विद्यार्थ्यांनीही आपले विचार व्यक्त केले.



### निधय हुक्कीरे याची नवोदयसाठी निवड

**इटकळ, दि.२८ मार्च -**

तुळजापुर तालुक्यातील खडकी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा विद्यार्थी निधय सिद्धेश्वर हुक्कीरे याची तुळजापूर येथील जवाहर नवोदय विद्यालय येथे निवड झाली आहे. शाळेच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्याचा व मार्गदर्शक शिक्षक व मुख्याध्यापक जेटीथोर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महादेव पाटील, स्वामी, सुतार, बदोले, ओहाळ, रब्बेवार, जेटीथोर, केंद्रप्रमुख सुरवसे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्ता हळदे, राम जवान उपस्थित होते. यावेळी सर्वांनी शुभेच्छा दिल्या व जेटीथोर यांनी मार्गदर्शन केले. आभार स्वामी यांनी मानले.

### हिंदू नववर्षानिमित्त धाराशिवात शोभायात्रा

**धाराशिव, दि.२८ मार्च -**

हिंदू नवसंवत्सर नवीन वर्ष गुढीपाडवानिमित्त धाराशिव शहरातील सकल हिंदू समाजाच्या वतीने नववर्ष स्वागत शोभायात्रा दुचाकी रॅली बाईक रॅली आयोजित करण्यात आली आहे. धाराशिव शहरातील सेंट्रल बिल्डिंग समोरील महात्मा बसवेश्वर चौकापासून ही बाईक रॅली निघणार असून सकाळी दहा वाजता या बाईक रॅलीची सुरुवात होणार आहे. श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे या रॅलीचा समारोप होणार असून या रॅलीत धाराशिव शहरातील हिंदू महिला, पुरुष, युवक, युवतींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि हिंदूंच्या या शक्ती प्रदर्शनात आपण आपले योगदान द्यावे, असे आवाहन सकल हिंदू समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.



### पोलीस ठाण्याच्यावतीने इफ्तार पार्टी

**धाराशिव, दि.२८ मार्च -**

मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना सुरू आहे. त्यांच्यासाठी धाराशिव शहर पोलीस ठाण्याच्यावतीने मार्च रोजी उत्तर पार्टीचे आयोजन दि.२८ मार्च रोजी करण्यात आले होते. धाराशिव शहर पोलीस ठाण्याच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या इफ्तार पार्टीस उप विभागीय पोलीस अधिकारी स्वप्निल राठोड, शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शकील शेख, सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनेश जाधव, रवींद्र अंभोरे, पोलीस उप निरीक्षक संदीप ओव्हाळ, अक्षय दिघोळे यांच्यासह विश्वास शिंदे, खलिफा कुरेशी, धनंजय शिंगाडे, मसूद शेख, वाजीद पठाण, खादर खान पठाण, सलीम शेख, बाबा मुजावर, गणेश वाघमारे आदींसह शहरातील मुस्लिम बांधवांसह,प्रतिष्ठित नागरिक पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## तुळजापूरात स्मशानभूमीतून गायब होत आहेत सुहासिनींची राख

### जादूटोणा आणि सुवासिनीच्या अंगावरील सोन्यासाठी निंदनीय घटनेचे सत्र...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२८ मार्च -**

शहरात गेल्या महिनाभरापासून मृत पावलेल्या सुहासिनीच्या अंत्यविधीनंतर पार्थिवाची राख स्मशानभूमी मधून चोरी होत असल्याची माहिती काँग्रेसचे युवा नेते अमोल कुतवळ यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

गेल्या एक-दीड महिन्यामध्ये एकूण सात सुहासिनी महिलांच्या अंत्यविधीनंतर पार्थिवाची झालेली राख गायब होत असल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे. सुहासिनीची राख चोरीला जात असल्याच्या चर्चेला उधाण आले आहे. सुहासिनीच्या अंगावर असणारे सोने घेण्यासाठी आणि



शहरात जादूटोणा करणाऱ्या लोकांकडून असे गंभीर प्रकार घडत आहेत.

शहरात अंधश्रद्धेतून घडणाऱ्या अशा प्रकारावर पोलीस प्रशासनाने लक्ष घालून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी कुतवळ यांनी केली आहे तसेच नगरपरिषद प्रशासनाने दीड कोटी रुपये खर्चून स्मशानभूमी बांधली आहे पण तेथे मानधन देऊन मस्साजोगी किंवा वॉचमन ठेवला नाही.

स्मशानभूमी मध्ये अंत्यविधीसाठी येणाऱ्याची कुठलीही नोंद केली जात नाही. तसेच कोणीही कोणाचेही प्रेत आणून जाळल्यास त्याला जबाबदार कोण असा प्रश्न त्यांनी पत्रकार परिषदेमध्ये उपस्थित केला आहे.

गुन्हेगारी प्रवृत्तीला पायाबंदी घालण्यासाठी पोलीस आणि नगरपरिषद प्रशासनाने उपाययोजना कराव्यात आणि नगरपरिषद प्रशासनाने कायमस्वरूपी वॉचमन किंवा मस्साजोगी ठेवण्याची म ागणी यावेळी कुतवळ यांनी केली आहे.

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत सूक्ष्म नियोजन प्रशिक्षण संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२८ मार्च -**

तालुका कृषी अधिकारी कार्यालय येथे नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत लोकसहभागीय सूक्ष्म नियोजन प्रक्रिया राबवून हवामान अनुकूलन गाव विकास आराखडा तयार करण्यासाठीचे प्रशिक्षण घेण्यात आले यावेळी उपविभागीय कृषी अधिकारी म हादेव आसलकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत उमरगा तालुक्यातील २१ गावे व लोहारा तालुक्यातील ६ गांवांचा समावेश करण्यात आला आहे.

या गावामध्ये ग्राम कृषि विकास समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. या समितीच्या अध्यक्षांचे देखील प्रशिक्षण पूर्ण झालेले आहे. तालुका बिज गुणन केंद्र उमरगा येथे ग्रामस्तरावर नेम ण्यात आलेल्या स्वयंसेवकांना नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाची ओळख व गावस्तरावर करावयाचे सुक्ष्म नियोजन या बाबत तालुकास्तरीय एक दिवशीय कार्यशाळा आयोजीत करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्तावीक तालुका कृषि अधिकारी रितापुरे यांनी केले.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे केले. तर उपविभागीय कृषि अधिकारी महादेव आसलकर यांनी सुक्ष्म नियोजन, गांव आराखडा यांचे प्रकल्पातील महत्व याबाबत माहिती दिली.

यावेळी प्रशिक्षणास उमरगा व लोहारा तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, कृषी सहाय्यक, स्वयंसेवक यांची उपस्थिती होती.

## उमरगा पोलीस ठाण्याची पोलीस महानरीक्षकांनी केली वार्षिक तपासणी




**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२८ मार्च -**

संभाजीनगर परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा यांनी वार्षिक तपासणी २०२५ अंतर्गत उमरगा पोलीस ठाण्याची बुधवारी तपासणी केली.

येथील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांच्या मेळाव्यात कर्मचाऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या, अडचणी जाणून घेतल्या. चांगले कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांची पाठ थोपटली. पोलिसांच्या समाजातील वर्तनात आपुलकी असली पाहिजे, याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. उमरगा पोलीस स्थानकात मनुष्यबळाची कमतरता, पोलीस कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी निवासस्थाने आदी प्रश्नावर येणाऱ्या काळात मार्ग काढणार असल्याची त्यांनी सांगितले. उमरगा पोलीस स्टेशन आयडिल पोलीस स्टेशन असल्याचे सांगत महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा यांनी पोलीस अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.

यावेळी पोलीस अधीक्षक संजय जाधव, अप्पर पोलीस अधीक्षक शफकत आमना, उपविभागीय पोलीस अधिकारी, सदाशिव शेलार, पोलीस निरीक्षक अश्विनी भोसले यांच्यासह सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## साठवण तलावातील पाणबुडी मोटर आणि वायरावर चोरट्यांचा डल्ला

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२८ मार्च -**

हंगरगा (तूळ) येथील शेतकरी अनिल हंगरगेकर यांनी शेतीला पाणी देण्यासाठी हंगरगा साठवण तलावामध्ये दहा एचपी पाणबुडी मोटर सोडून त्याद्वारे पाईपलाईनने शेतात पाणी आणले आहे. १९ मार्च रोजी नेहमीप्रमाणे सकाळी सात वाजण्याच्या सुमारास हंगरगेकर मोटर चालू करण्यासाठी गेले असता साठवण तलावात असलेली पानबुडी मोटर, मोटारीचे कॉपर वायर व केबल वायर असा एकुण ३०२५० रुपयांचा मुद्देमाल चोरट्याने लंपास केल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

तुळजापूर पोलीस स्टेशनमध्ये २४ मार्च रोजी तक्रार केली आहे त्यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा नोंद झाला आहे.

## जळकोट कॅन्सर शिबिरात १७२ रुग्णांची तपासणी



**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२८ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या कॅन्सर निदान व चिकित्सा शिबिरात १७२ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

धाराशिव जिल्हा परिषद आरोग्य विभाग व जळकोट प्राथमिक आरोग्य केंद्राच्या संयुक्त विद्यमाने बुधवार (दि.२६) रोजी कर्करोग तपासणी व जनजागृती अभियान अंतर्गत या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सध्या देशभरात जागतिक कर्करोग दिनानिमित्त कर्करोग तपासणी व जनजागृती अभियान घेण्यात येत आहे. या शिबिराची सुरुवात धन्वंतरी प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आली. याप्रसंगी कृषि उत्पन्न बाजार समि ती संचालक अशोक पाटील, सरपंच गजेंद्र कदम, महेश कदम, कृष्णात मोरे, अनिल छत्रे, बसवराज कवठे, डॉ. संजय कदम आदि उपस्थित होते.

या शिबिरात आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित असलेल्या कॅन्सरची तपासणी करण्यात आली. यात स्त्री-पुरुषांच्या मौखिक कर्करोग तपासणी, स्तन कर्करोग तपासणी, गर्भाशय मूख तपासणी तज्ञ डॉक्टर मंडळीकडून करण्यात आली. तीस वर्षाच्या पुढील महिला, पुरुष यांची तपासणी स्त्रीरोग तज्ञ डॉ. नीतू मलबा, मुखरोग तज्ञ डॉ. मंजिरी शिनगारे, डॉ. बारास्कर यांनी केले. कॅन्सरबाबत जनजागृती यावेळी करण्यात आली.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राचे प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण कुंडले, डॉ. ईश्वरी धालगडे, डॉ. अक्षय पवार, डॉ. रिंकन बारगल, डॉ. सुप्रिया मोकाशे, डॉ. बर्मा, डॉ. नाशिक पठाण, प्राथमिक आरोग्य केंद्राचे कर्मचारी, आरोग्य सहाय्यक, म्बुलन्स टीम, आशा कार्यकर्ते, मदतनीस यांनी परिश्रम घेतले.

# तुळजाभवानी मंदिरात पुजाऱ्यांनाच विश्वस्तांकडून धक्काबुक्की

### संतप्त पुजाऱ्यांनी तहसीलदार तथा विश्वस्त अरविंद बोळंगे यांना जाब विचारण्यासाठी घातला घेराव...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२८ मार्च -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेची वंशपरंपरेने अनंत काळापासून पूजा करून देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांच्या विधीवत कुलाचार कुलधर्म करणाऱ्या पुजाऱ्यांनाच मंदिर विश्वस्त तथा तहसीलदार यांच्याकडून धक्काबुक्की होण्यासारखे लाजिरवाणी गोष्ट आई तुळजाभवानीच्याच मंदिरामध्ये घडल्याने समस्त पुजारी वर्गात संतापाची लाट पसरली आहे.

तुळजाभवानी मंदिरामध्ये आणि मंदिर परिसरात देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांची कुलधर्म कुलाचार पूजाअर्चा करण्यासाठी पुजारी बांधव उभे असतात. येणाऱ्या भाविकांची पूजा करून पुजाऱ्यांसह



पुजाऱ्याचे संपूर्ण कुटुंब भाविकांच्या सोयीसुविधेसाठी अहोरात्र झटत असते. वेळ काळ न पाहता पहाटेपासून रात्रीपर्यंत भाविकांसाठी झटणाऱ्या पुजाऱ्यांना मात्र मंदिर संस्थान आणि विश्वस्तांकडून तुच्छ वागणूक दिली जाते. याचेच उदाहरण म्हणजे दि.२८ मार्च शुक्रवार रोजी पुजारी मकरंद नवले हे मंदिरातील होमासमोर उभे असताना अचानक घडलेल्या घटनेने त्यांच्यासह समस्त पुजारी वर्ग आश्चर्यचकित झाले.

पुरातन विभागाच्या आर्किटेक तेजस्विनी आपळे या मंदिराची पाहणी करण्यासाठी मंदिरात आल्या होत्या त्यांच्या समवेत तहसीलदार तथा मंदिर विश्वस्त अरविंद बोळंगे हे ही होते.

पाहणी करताना होमा शेजारी उभा असणारे पुजारी मकरंद नवले यांना येथे भाविकांना त्रास देण्यासाठी का उभा राहिलास म्हणून ढकलून दिले. आई तुळजाभवानी मातेची सेवापूजा करणाऱ्या पुजाऱ्यांच्या संपूर्ण महाराष्ट्रातील भाविक भक्त श्रद्धेने पाया पडतात. आशा पुजाऱ्यांना मात्र विश्वस्ताकडून आरेतूरेची भाषा वापरली जाते ही अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे. ज्यांच्याकडे भाविक श्रद्धेने पाहतात त्यांना असे अपमानित केल्यानंतर भाविक भक्तांच्या देखील भावना दुखावल्या जातात.

मंदिरातील या घटनेने ३० ते ३५ पुजारी एकत्र येऊन मंदिर प्रशासकीय कार्यालय समोर तहसीलदारांना घेरावा घालून पुजाऱ्यांची नेमकी चूक काय होती. जे की तुम्ही पुजाऱ्यांना ढकलून दिले हे विचारत धारेवर धरले. यावेळी भाजप युवामोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद कंदले यांनी संतप्त पुजाऱ्यांची समजूत काढून त्यांना शांत करत परिस्थिती हाताळून नेहली. तसेच प्रकरण जास्तच वाढत चाललेले पाहून मंदिर अधिकारी सिद्धेश्वर इंतुले आणि नागेश शितोळे यांनी देखील मध्यस्थी करून पुजाऱ्यांना समजावत शांत केले. तहसीलदार यांच्यावर जमलेल्या पुजाऱ्यांनी केलेल्या प्रश्नाच्या भडीमारामुळे ते तेथून तडकाफडकी निघून गेले.

याबाबत तहसीलदार अरविंद बोळंगे यांना भ्रमणध्वनीवरून संपर्क केला असता त्यांनी फोन न उचलून प्रतिक्रिया देण्यास टाळाटाळ केली.

> मंदिरातील पिंपळाच्या झाडाखाली थांबलेलो असताना अचानक तहसीलदार साहेबांनी मला फेकल्यासारखं ढकलून दिले. त्यांना विचारलं साहेब असं मला का ढकल. तर ते म्हणाले तू येथे का थांबला. आम्ही साहेब कुठे थांबायचे असे विचारले असता याला नोटीस काढा असं म्हणू लागले. हा सगळा प्रकार तेथे उभा असणाऱ्या बाकीच्या पुजाऱ्यांच्या लक्षात आला की तहसीलदार साहेब विनाकारण बोलत आहेत. असे प्रकार नेहमीच मंदिरात घडतात. शिट्टी वाजवत पुजारी भाविकांना गर्दी असो नसो बाजूला सरकावत वाट काढून जातात. यावेळी भाविकांना धक्काबुक्की यांच्याकडूनच होते. पण यांना विचारणार कोण? आता तर हे पुजारी वर्गांना धक्काबुक्कीवर आले आहेत. धक्का का मारला म्हणून आम्ही सर्व पुजारी विचारण्यासाठी गेलो असता आरेवारी करत आमच्या प्रश्नाचे उत्तर न देता ऑफिसमध्ये जाऊन बसले.
>
> **- मकरंद नवले,** श्री तुळजाभवानी देवीचे पुजारी, तुळजापूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महायुतीचे खरेदी-विक्री संघांचे बिनविरोध संचालकांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ मार्च -**

शिवसेना मध्यवर्ती कार्यालय धाराशिव येथे महायुतीच्या खरेदी-विक्री संघ धाराशिवचे बिनविरोध निवडून आलेले संचालकांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांच्या हस्ते निवडून आलेल्या संचालकांचा सत्कार करण्यात आला आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

या कार्यक्रमात बिनविरोध निवडून आलेले संचालक म्हणून अनंतराव अण्णा देशमुख, गुणवंत पापा देशमुख, किशोर देशमुख, समीरा जीवन बर्डे, रामेश्वर शेटे, शिवाजी सरडे, अण्णासाहेब पवार, दिनेश देशमुख, सुभाष पाटोळे, मीरा इंगळे आणि गणेश दत्तात्रेय फंड यांचा समावेश आहे.

सत्कार समारंभानंतर जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांनी नवनिर्वाचित संचालकांचे अभिनंदन करताना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

महायुतीच्या या बिनविरोध निवडीनंतर संघाचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

# जिल्ह्याचा कायापालट करण्याची क्षमता असलेल्या प्रकल्पांना प्रचंड पाठबळ

## शनिवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा जिल्हावासीयांच्या वतीने तुळजापुरात भव्य सत्कार...

### आ. राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ मार्च -**

कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीचे तीर्थक्षेत्र आपल्या रेल्वेच्या राष्ट्रीय नकाशावर आणणे.कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा, कौडगाव एमआयडीसीत देशातील पहिला स्वतंत्र टेक्निकल टेक्स्टाईल प्रकल्प, निम्न तेरणा प्रकल्पाच्या दुरुस्ती प्रस्तावास मान्यता असे जिल्ह्याचा कायापालट करण्याची क्षमता असलेले अनेक महत्वपूर्ण प्रकल्प मार्गी लावल्याबद्दल जिल्हावासीयांच्या वतीने राज्याचे कर्तबगार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती मित्रचे उपाध्यक्ष तथा भाजपा आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शनिवार २९ मार्च रोजी तुळजापूर दौऱ्यावर येत आहेत. महायुती सरकारच्या माध्यमातून धाराशिव जिल्ह्यातील अनेक महत्वपूर्ण प्रकल्पांना मोठे पाठबळ दिल्याबद्दल संबंध जिल्हावासीयांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार करण्यात येणार आहे. जिल्ह्याच्या हक्काचे कृष्णा खोऱ्यातील पाणी आणण्यासाठी ११,७०० कोटी रुपयांची सुप्रमा देऊन निधी मिळवून दिला. त्यातील अनेक कामे प्रगतीपथावर आहेत. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वेमार्गाच्या कामाला फडणवीस साहेबांच्या सहकार्यानेच गती मिळाली. त्यामुळे तुळजाभवानी देवीचे तीर्थक्षेत्र आता रेल्वेच्या राष्ट्रीय नकाशावर आले आहे. या नवीन रेल्वेमार्गाच्या कामासाठी राज्यसरकारचा ४५२ कोटी रुपयांचा हिस्सा मिळाला. लवकरच आता या मार्गावर तुळजाभवानी एक्स्प्रेस धावताना पहायला मिळणार आहे. आपल्या महायुती सरकारच्या मदतीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रवेशास मान्यता मिळवून घेतली.वैद्यकीय शिक्षण संकुलासाठी राष्ट्रीय महामार्गाजवळ ३१ एकर जागा व पहील्या टप्प्यात ४३० कोटी इतका भरीव निधी मंजूर करवून देण्यातही फडणवीस साहेबांचे योगदान मोठे असल्याचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीचे क्षेत्र वैश्विक दर्जाचे धार्मिक पर्यटनस्थळ म्हणून विकसित व्हावे, नावारूपाला यावे याकरिता मराठवाड्यात झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत विकास आराखड्याचा महत्वपूर्ण निर्णय झाला. आता हा अंतिम प्रस्ताव मुख्यमंत्री फडणवीस यांच्या समोर आहे लवकरच त्यावर सकारात्मक शिक्कामोर्तब होईल असा विश्वासही आ. पाटील यांनी व्यक्त केला आहे. या आराखड्यानुसार आई तुळजाभवानी छत्रपती शिवाजी महाराजांना भवानी तलवार देतानाचे १०८ फूट उंचीचे शिल्प व भव्य शिवसृष्टीचाही त्यात समावेश आहे. कौडगाव एमआयडीसीत देशातील पहिला स्वतंत्र टेक्निकल टेक्स्टाईल पार्क उभारण्यात येणार आहे. २०१९ च्या निवडणुकीपूर्वी स्वतः फडणवीस साहेबांनी धाराशिव येथील महाजनादेश यात्रेदरम्यान त्याची जाहीर घोषणा केली होती.



तो शब्द त्यांनी पाळला असून पायाभूत सुविधांसाठी २४ कोटींची निविदा प्रसिद्ध झाली आहे. दहा हजार रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट या प्रकल्पाच्या माध्यमातून पूर्ण होणार आहे. संतश्रेष्ठ गोरोबकाकांचे समाधी मंदिर अंतर्बाह्य पुनः निर्माण करत मंदिर व परिसराचा कायापालट सध्या सुरू आहे. राज्यातील सर्वात पुरातन त्रिविक्रम मंदिर जिर्णोद्धाराचे कामही अंतिम टप्प्यात आहे. प्राचीन तगरचा वैभवशाली वारसा जतन व संवर्धन करून जागतिक पर्यटनाच्या नकाशावर आणण्यासाठी ७५ कोटींहून अधिक निधी आपल्या सरकारने मंजूर केला आहे.तुळजापूरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा तालुक्यातील पहिल्या पूर्णाकृती पुतळा, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या परिसर सुशोभीकरण आणि महामंडळामार्फत होणाऱ्या प्रशिक्षण केंद्रासाठी ५० कोटी, धाराशिव शहरात भव्य स्मारक उद्यानासाठी जागा आणि एक कोटी निधीला मंजूरी, नळदुर्ग येथे राज्यतील पहिली भव्य बसवसृष्टी, प्रशस्त ध्यानकेंद्रासाठी रु.५ कोटींचा निधी, हरितक्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या भव्य स्मारकास अडीच कोटींचा निधी, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या तुळजापूर येथील स्मारक उद्यानासाठी १ कोटी मंजूर, संतश्रेष्ठ गोरोबाकाका, झुंजारसेनानी भाई उद्धवराव पाटील आणि शिक्षणमहर्षी सि. ना. आलूरे गुरुजी यांचे जिल्ह्यातील अनुक्रमे कळंब, धाराशिव आणि तुळजापूर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना आपल्या मागणीवरून नाव देण्याचा महत्वपूर्ण निर्णय, तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथे ३७० एकरावर नवीन एमआयडीसी मंजुर, निम्न तेरणा उपसा सिंचन योजना दुरुस्तीच्या कामासाठी ११३ कोटींच्या प्रस्तावास मान्यता, ऐतिहासिक नळदुर्गची पुढील तीस वर्षाची गरज लक्षात घेऊन ४८ कोटींच्या पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू. शहरातील डीपी रस्ते, नाली व इतर विकासकामांसाठी १५० कोटींहून अधिकचा निधी, नळदुर्ग येथे अप्पर तहसील कार्यालय कार्यान्वित.

पन्नास वर्षांपासूनच्या स्वतंत्र नळदुर्ग तालुका निर्मितीच्या मागणीच्या दिशेने मोठे पाऊल, तुळजापूर शहरात जिजाऊ स्मृती उद्यान, महिलांसाठी स्वतंत्र व्यायामशाळा, विद्यार्थ्यांसाठी अद्ययावत अभ्यासिका, नळदुर्ग येथे २ कोटी निधीतून शादीखाना उभारणीचे काम सुरू, धाराशिव शहरात शादीखाना बांधण्यासाठी १ कोटी मंजूर अशा अनेक महत्वपूर्ण प्रकल्पांच्या पूर्णत्वासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धाराशिव जिल्ह्यासाठी खूप मोठे पाठबळ दिले आहे. ज्यामुळे जिल्ह्याचा चेहरा मोहरा बदलला जाणार आहे. त्यासाठी धाराशिव जिल्हावासीयांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा तुळजापुरात सत्कार करण्यात येणार असल्याचे आ. पाटील यांनी सांगितले आहे.

अर्थसंकल्पीय अधिवेशन यशस्वीपणे पार पडल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी माता, पंढरपूर ला श्री विठ्ठल रुक्मिणी व त्यांचे कुलदैवत श्री नृसिंहाचे दर्शन घेण्यासाठी खाजगी दौऱ्यावर येत आहेत. परंतु मुख्यमंत्री झाल्यानंतर ते प्रथमच धाराशिव जिल्ह्यात येत आहेत. धाराशिव जिल्ह्यासाठी त्यांनी जे भरभरून सहकार्य केले आहे त्यासाठी त्यांचा भव्य सत्कार करण्याची जिल्ह्यातील सामान्य नागरिकांची भावना आहे.

मात्र या दौऱ्यात वेळेअभावी हे शक्य नसल्याने जिल्हावासीयांच्या वतीने किमान छोटेखानी हृदय सत्कार तरी स्वीकारावा असा आग्रह केल्यानंतर मुख्यमंत्री महोदयांनी मोठ्या आनंदाने सत्कार स्वीकारण्यास अनुमती दिली असल्याचेही आमदार पाटील म्हणाले.

# वैचारिक, मूल्यात्मक, गुणात्मक, संस्कारक्षम शिक्षण मुलांना दिले पाहिजे : विश्वनाथअण्णा तोडकर



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२८ मार्च -**

वैचारिक, मूल्यात्मक, गुणात्मक, संस्कारक्षम शिक्षण मुलांना दिले पाहिजे आम्ही शिक्षणाच्या वैचारिक भूमिकेत जोडलो आहोत, स्पर्धा माणसाला प्रोत्साहन देते, बक्षीस विध्यार्थ्याला प्रोत्साहन देते त्यामुळे स्पर्धा हे माध्यम आहे, पुढे जाण्याची उर्मी जागे करण्याचे काम विविध स्पर्धेच्या माध्यमातून पर्याय संस्था करणार आहे, असे प्रतिपादन पर्याय सामाजिक संस्थेचे कार्यवाहक विश्वनाथअण्णा तोडकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात दि. २७ मार्च रोजी विध्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले. या बाबतचे सविस्तर वृत्त असे आहे कि, पर्याय सामाजिक संस्था, सावित्रीबाई फुले म्युच्युअल बेनिफिट ट्रस्ट आणि आनिक फायनान्सियल सर्व्हिसेस प्रा. ली. यांच्या संयुक्त विद्यमानाने दि. ५ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी २०२५ या कालावधीमध्ये महाराष्ट्राचे आराध्य दैवत कुलभूषण शिवछत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त कळंब आणि वाशी तालुक्यातील ४७ गावातील ६० प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावी या दोन गटामध्ये रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज या विषयावरती निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते त्याच्या बक्षीस वितरण कार्यक्रमाचे आयोजन पर्याय संस्था प्रशिक्षण सभागृह हासेगाव के. येथे दि.२७ मार्च रोजी करण्यात आले होते.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पर्याय चे अध्यक्ष सुभाष तगारे, कळंब पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंढरीनाथ मगर, पदमश्री शंकर बापू माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्याक परमेश्वर पालकर, राजेंद्र बिक्कड, संतोष भोजने, चंद्रकांत शिंदे, अनिताताई तोडकर, आणिक फायनान्स चे मोहीम प्रमुख विलास गोडगे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. शाहीर बंडू खराटे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन कार्यावर पोवाडा गायन करून कार्यक्रमास रंगत आणली, तसेच मोनिका मोरे दसमेगाव (झीन्नर) या मुलीने अतिशय उत्कृष्ठ भाषणातून आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्याय संस्थेचे समन्वयक आश्रुबा गायकवाड यांनी केले तर सूत्रसंचालन तेजश्री भालेराव यांनी केले.

पर्यायचे अध्यक्ष सुभाष तगारे, आणिक फायनान्सचे मोहीम प्रमुख विलास गोडगे, मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड, परमेश्वर पालकर, प्रशांत निन्हाळ, पांडुरंग शिंदे, चंद्रकांत शिंदे यांनी विध्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पर्याय परिवारातील श्रीमती सुनंदा खराटे, बालाजी शेंडगे, भिकाजी जाधव, विकास कुदळे, वैभव शिंदे, वैभव चोंदे, कल्पना जतकर, दर्शन जोगी, अशोक शिंदे, दिगंबर लडके, माया लडके, अशा तोडकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

## लतान ए हिंद प्रतिष्ठानच्या वतीने रोजा इफ्तार पार्टी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ मार्च -**

पवित्र रमजान महिन्यानिमित्त सुलतान ए हिंद प्रतिष्ठान, उस्मानाबाद यांच्या वतीने एम. के. फंक्शन हॉल, खाजानगर, उस्मानाबाद येथे रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विविध राजकीय, सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून सामाजिक एकतेचा संदेश दिला.

कार्यक्रमाला सुलतान ए हिंद प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष खलील सय्यद आणि सचिव इम्तियाज बागवान यांच्या नेतृत्वाखाली आयोजन करण्यात आले होते.

# कळंब येथे निपुन महाराष्ट्र अभियानांतर्गत शिक्षक कार्यशाळा




## जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ मार्च -**

शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर कॉलेज, कळंब येथे निपुन (NIPUN) महाराष्ट्र अभियानांतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान कौशल्य कृती कार्यक्रमावर आधारित कार्यशाळेचे आयोजन आज २६ मार्च रोजी करण्यात आले. ही कार्यशाळा आज सकाळी ८.३० ते दुपारी १ या वेळेत संपन्न झाली.

कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. दयानंद जटनुरे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) अशोक पाटील, गटविकास अधिकारी रावसाहेब चकोर, गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते व शिक्षक संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष बाळकृष्ण तांबारे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

कार्यशाळेच्या प्रारंभी गट शिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते यांनी प्रास्ताविक केले, तर सूत्रसंचालन हनुमंत पडवळ यांनी केले. ५ मार्चच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा व शंका निरसन करण्यात आले. तसेच, तालुक्यातील इयत्ता २ री ते ५ वीच्या १०० टक्के क्षमता प्राप्त वर्ग शिक्षकांनी आपले अनुभव कथन केले. शिक्षक हनुमंत घाडगे व श्री उत्तरेश्वर शिंदे यांनी मार्गदर्शन केले. तर श्रीकांत तांबारे, भोरे, कासले व पवार यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. आभार सोमनाथ चंदनशिव यांनी मानले.

## उमेदवारांना संधी : मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना ५ महिने कालावधीत वाढ

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ मार्च -**

युवकांना प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण मिळून त्यांची रोजगारसंधी वाढावी यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना आर्थिक वर्ष २०२४-२५ पासून सुरू करण्यात आली आहे.या योजनेंतर्गत,शासकीय व खाजगी आस्थापनांमध्ये रुजू झालेल्या आणि ६ महिने कार्यप्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांसाठी कालावधी ५ महिने वाढविण्यात आला आहे. त्यामुळे या योजनेचा एकूण प्रशिक्षण कालावधी ११ महिने करण्यात आला आहे.

१० मार्च २०२५ पर्यंत ६ महिने पूर्ण झाले नसतील, तर रुजू झालेल्या दिनांकापासून ११ महिने प्रशिक्षण कालावधी राहील. यापुढे अधिक मुदतवाढ दिली जाणार नाही, तसेच यामुळे कायमस्वरूपी नोकरीचा हक्क निर्माण होणार नाही. प्रशिक्षणार्थ्यांनी http://cmykpy.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावरील (Intern Login) My Profile Tab येथे आपली माहिती अद्ययावत करावी. ६ महिने पूर्ण केलेल्या उमेदवारांनी संबंधित आस्थापनांशी संपर्क साधावा व ३० एप्रिलपर्यंत उर्वरित ५ महिन्यांसाठी रुजू व्हावे.

काही तांत्रिक अडचण आल्यास जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, धाराशिव येथे संपर्क साधावा, असे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त संजय गुरव यांनी कळविले आहे.

## सायबर लॅबचे विशेष पोलीस महानिरीक्षकांच्या हस्ते उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ मार्च -**

वीरेंद्र मिश्र विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर, यांनी मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे १०० दिवसीय कृती आराखडाच्या अनुषंगाने अंमलबजाणी संदर्भात वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करुन पोलीस अधीक्षक संजय जाधव व अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांचे मार्गदर्शनाखाली दि.२७ मार्च रोजी सायबर गुन्ह्याचा तपास आधुनिक पध्दतीने करण्या करीता पोलीस अधीक्षक कार्यायल धाराशिव येथे आधुनिक यंत्र सामुग्रीने सुसज्ज सायबर लॅबची उभारणी करण्यात आली आहे. सदर सायबर लॅबचे वीरेंद्र मिश्र, विशेष पोलीस महानिरीक्षक,छत्रपती संभाजीनगर यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले.

## धाराशिवमध्ये ई मुद्देमाल कक्ष आणि सायबर लॅबचे उद्घाटन

**धाराशिव, दि.२८ मार्च -**

जिल्ह्यातील पोलिस व्यवस्थेच्या आधुनिकीकरणाला चालना देण्यासाठी आणि सुसज्ज यंत्रणेद्वारे कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने दोन महत्त्वपूर्ण प्रकल्पांची सुरुवात करण्यात आली आहे. ई मुद्देमाल कक्ष प्रणाली आणि आधुनिक सायबर लॅब या दोन्ही उपक्रमांचे दि.२७ मार्च २ रोजी विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांच्या हस्ते व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उद्घाटन करण्यात आले.

**करमाळा नगरपरिषद, करमाळा**

जावक क्रमांक/बांधकाम विभाग/३९१/२०२५ — दिनांक २७/०३/२०२५

**जाहीर निविदा प्रसिध्दीकरण**

करमाळा नगरपरिषद, करमाळा, जि. सोलापूर
जाहिर निविदा प्रसिध्दीकरण सूचना

करमाळा नगरपरिषदेकडील विद्युत विभागासाठी सन 2024-25 या आर्थिक वर्षासाठी रस्ता, अनुदान योजना अंतर्गत करावयाच्या खालील कामांसाठी जाहीर निविदा अनुभवी ठेकेदारांकडून तांत्रिक ब-१ च्या नमुन्यात स्पर्धात्मक मागवित आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम | कोरी निविदा फी |
|---|---|---|---|---|
| 1 | पांडुरंग नगर येथे प्लॉट नं. 11 ते प्लॉट नं.19 रस्ता काँक्रीटीकरण करणे. | 998858 | 10000 | 1000 |
| 2 | पांडुरंग नगर येथे प्लॉट नं. 22 ते प्लॉट नं.25 रस्ता 2 काँक्रीटीकरण करणे. | 998858 | 10000 | 1000 |
| 3 | पांडुरंग नगर येथे प्लॉट नं. 25 ते प्लॉट नं.28 रस्ता 3 काँक्रीटीकरण करणे. | 998858 | 10000 | 1000 |

१) जाहिर निविदा फॉर्म न.पा. कार्यालयात दि. 28/03/2025 पासून ते दि. 11/04/2025 सायं. 6.00 वाजेपर्यंत उपलब्ध आहेत.
२) जाहिर निविदा फॉर्म स्वीकृती दि.28/03/2025 ते दि.15/04/2025 रोजी सायं. 4.00 वाजेपर्यंत.
३) जाहिर निविदा उघडण्याचा दिनांक 15/04/2025 रोजी सायं 4.00 वा. (शक्य झाल्यास)
४) सर्व पात्र इच्छुक निविदाधारकांनी निविदा फॉर्म घेणेसाठी न.पा.च्या कार्यालयीन वेळेत कार्यालयात उपलब्ध आहेत.

**शर्ती व अटी-**
१) कोणतीही निविदा स्विकारणेचा नामंजूर करणेचा अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवला आहे.
२) निविदा धारकांनी निविदा फॉर्म लिफाफे दि.15/04/2025 रोजी दु. 4.00 वाजेपर्यंत करमाळा नगरपरिषद कार्यालयात जमा करावयाची आहेत.
३) कोणत्याही बाबींसाठी काही तंटा निर्माण झाल्यास याबाबत नगरपरिषदेचा निर्णय अंतिम राहिल.

सही
(सचिन तपसे)
मुख्याधिकारी/प्रशासक
करमाळा नगरपरिषद

**जाहीर प्रगटन**
**तहसिल कार्यालय, लोहारा**
**(सिलींग विभाग)**
E mail ID :- loharatahgmail.com
जा.क्र/२०१५/ सिलिंग/कावी- १७ — दूरध्वनी क्र. ०२४७५-२६६५०७
दिनांक : १८/०३/२०२५

लोकांना कळविण्यात येते कि, मौ. शिवकरवाडी ता.लोहारा जि. धाराशिव येथील कै. तात्या शेकू कांबळे यांचे नावे असलेली मौजे मौ. शिवकरवाडी येथील शासनाकडुन सिलींगमध्ये मिळालेली जमीन गट नं.७७ क्षेत्र ०१ हे ०१ आर, मिळाली असुन सदर जमीन विक्रीसाठी मयताची वारस अर्जदार श्री.रविंद्र तात्या कांबळे यांनी या कार्यालयास परवानगी मागीतली आहे.
तरी अर्जदार श्री. रविंद्र तात्या कांबळे यांचे नावे असलेली मौजे मौ. शिवकरवाडी येथील जमीन गट नं. ७७ क्षेत्र ०१ हे ०१ आर, विक्री परवानगी देण्यापुर्वी कोणाची हरकत । तक्रार असेल तर त्यांनी सदर जाहिर प्रगटना नंतर ७ दिवसाच्या आत या कार्यालयास येवुन हरकत नोंदवावी. याबाबत मुदतीत हरकत किंवा तक्रार प्राप्त न झाल्यास प्रकरणात नियमाप्रमाणे परवानगी देण्यात येईल.

स्थळ : - तहसिल कार्यालय लोहारा
दिनांक : १८/०३/२०२५
स्वाक्षरित/-
(रणजितसिंह कोळेकर)
तहसिलदार लोहारा तहसीलदार, लोहारा

**नळदुर्ग नगरपरिषद नळदुर्ग**
**ई-निविदा**
**सुचना क्र. ०६ २०२४ २०२५**

नळदुर्ग नगर परीषद अंतर्गत रस्ते साफ करणे, सार्वजनिक ठिकाणे साफ करणे, गटार नाली साफ करणे तसेच दैनंदिन विलगीकृत कचऱ्याचे घरोघरी जावून संकलन करून ठठ कोड स्कैन करणे, घनकचरा प्रक्रिया केंद्र चालविणे या कामाकरिता अनुभवी व पात्र निविदाधारकामार्फत निविदा मागविण्यात येत आहेत.

या कामाचा सविस्तर तपाशील www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

निविदा भरण्याची मुदत **दि. ०५/०४/२०२५ सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत** आहे.

**स्वाक्षरीत / -**
**मुख्याधिकारी,**
**नळदुर्ग नगर परिषद**

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# महिला तक्रार निवारण समिती कागदावरच

**दत्तात्रे कांबळे**
**लोहा, दि. २८ मार्च**

प्रत्येक विभागात महिला तक्रार निवारण समितीची स्थापना करा असे शासनाचे आदेश असताना शासकीय व निमशासकीय विभागितील महिला तक्रार निवारण समित्या वाऱ्यावर आहेत. कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळाच्या तक्रारीची सखोल चौकशी व त्यांचे निराकरण करण्यासाठी आस्थापनामध्ये महिला तक्रार निवारण समिती गठीत न केल्यास ५० हजाराचा दंड लागू शकतो पण कार्यालयातील आस्थापना विभाग प्रमुखांचा निष्काळजी पणा दिसुन येत आहे.

शासकीय व निमशासकीय आस्थापना कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध मनाई व निवारण अधिनियम २०१३ च्या कलम ४(१) नुसार कार्यालय अंतर्गत येणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारीची सखोल चौकशी व त्यांचे निराकरण करण्यासाठी ज्या आस्थापनामध्ये दहा किंवा दहा पेक्षा जास्त अधिकारी कर्मचारी कार्यरत आहेत अशा प्रत्येक ठिकाणी तक्रार निवारण समिती स्थापन करणे आवश्यक असल्याचे शासन पत्रकात आदेशीत केले आहे .

शासकीय ,निमशासकीय कार्यालय ,संघटना महामंडळ, आस्थापना, संस्था शासकीय कंपनी किंवा खाजगी उपक्रम इंटरप्रायजसचे अशासकीय संघटना, सोसायटी, ट्रस्ट, उत्पादक ,पुरवठा व विक्री यासह वाणिज्य व्यवसायिक, शैक्षणिक, करमणूक ,औद्योगिक, आरोग्य आदी सेवा किंवा वित्तय कामकाज पार पाडणारे युनिट किंवा सेवा पुरवठादार ,रुग्णालय सुश्रुषाग्रहे , क्रीडा संकुले एमआयडीसी ,धर्मदाय आयुक्त, आरोग्य विभाग, कामगार कल्याण, शिक्षण विभाग ,शासकीय निमशासकीय व खाजगी शिक्षण संस्था, नगरपालिका, सहकार विभाग ,बँकिंग विभाग ,सहकारी पतसंस्था पतपेढी, शासकीय रुग्णालय, खाजगी रुग्णालय शॉपिंग मॉल,व्यापारी महामंडळ, मार्केट कमिटी, कोचिंग क्लासेस या ठिकाणी तक्रार निवारण समिती स्थापन करणे बंधनकारक आहे.

कायद्यातील व नियमातील विविध तरतुदी व जबाबदारीचे पालन न केल्यास मालकाला ५० हजार रुपयाचा दंड आकारणे तसेच हाच प्रकार पुन्हा केल्यास अस्थापनेचा परवाना रद्द करुन दुप्पट दंड वसुल करण्याचे आदेशात नमुद आहे.तशी तरतूद आहे पण कोणत्याही विभागात महिला तक्रार निवारण समितीचा दर्शनी फलक नाही. तसे भिंतीवर सुध्दा समिती स्थापन केले त्यामधील सदस्य संख्या कोणकोण आहेत याची अनेक महिला कर्मचाऱ्याना माहित नाही. तसे फलक सुध्दा कुठेच दिसत नाहीत . प्रत्येक विभागात फलक लावावे की लावून नये असे या संदर्भात माहिती विचारली असता कोणीच उत्तर दिले नाही. विभागातील कार्यालयात महिला तक्रार निवारण समिती आहे की नाही या बाबत महिला कर्मचारी अनभिज्ञ आहेत या संदर्भात अनेक महिला कर्मचाऱ्यांना विचारणा केली पण काही महिलानी काहिच उत्तर दिले नाही.

पुरुष कर्मचाऱ्याला कार्यालयातील विभाग प्रमुखांनी त्रास दिला तर थेट वरिष्ठांच्या दालनात तक्रार करता येते पण अशा घटनेला थोडा कालावधी पुरुष कर्मचारी तक्रार देऊन निर्वपुरुषांसाठी सुध्दा पुरुष कर्मचारी तक्रार निवारण समिती आवश्यक आहे. असल्याचे काही पुरुष कर्मचारी मंडळींनी बोलून दाखवले. महिला तक्रार निवारण समिती आहे त्याच प्रमाणे पुरुष कर्मचारी तक्रार निवारण समिती स्थापन केली पाहिजे असेही काही पुरुष कर्मचारी मंडळींनी बोलून दाखवले.

# सर्वांनाच सीमेवर जाऊनच देशसेवा करण्याची आवश्यकता नाही : मुंडकर

**तभा वृतसेवा**
**बिलोली , दि. २८ मार्च**

सर्वांनाच सीमेवर जाऊन हातात बंदूक घेऊन देश सेवा करण्याची आवश्यकता नाही. प्रत्येकाने आपापल्या क्षेत्रात प्रामाणिकपणे आणि निष्ठेने काम केल्यास ही सुद्धा देश सेवाच होय.असे प्रतिपादन प्रश्न सीमावर्ती भागाचे प्रमुख समन्वयक तथा ज्येष्ठ पत्रकार गोविंद मुंडकर यांनी केले. ते बिलोली येथील पंचायत समिती सभागृहात आयोजित निराधार, वृद्ध आणि दिव्यांगांच्या मेळाव्यात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी पोलीस उप निरीक्षक सोमनाथ स्वामी, आगारप्रमुख नरसिंग निमनवाड, सामाजिक कार्यकर्ते माधव आटगोरे यांचे प्रमुख उपस्थिती होती.

मुंडकर पुढे म्हणाले की, येथे उपस्थित असलेले आगार प्रमुख यांनी जन्मतः दिव्यांगांच्या, निराधारांच्या बाबतीत सर्व चालक आणि वाहकांची बैठक घेऊन त्यांना आजच्या कार्यक्रमाविषयी आणि अपंग निराधार यांच्या विषयीच्या संवेदना ज्या (आगार प्रमुखाच्या मनात निर्माण झाल्या)त्यांच्या मनात निर्माण झाल्या त्या चालक आणि वाहकांच्या मनातही निर्माण कराव्यात ज्यायोगे खऱ्या अर्थाने निराधार, दिव्यांगांना परिवहन महामंडळाच्या बसने प्रवास करताना, प्रवासात लाभदायक ठरेल. मुंडकर यांचे भाषण सुरू असताना आगारप्रमुखांनी उभे राहून याबाबत जाहीर अभिवचन दिले. याप्रसंगी अवयव दान समितीचे श्री माधव आटकोरे यांनी आपल्या कार्याविषयीची माहिती उपस्थित निराधार आणि वृद्ध बांधवांना दिली. यावेळी आगार प्रमुख यासह अनेकांनी आपापल्या क्षेत्रात काम करणाऱ्या सहकाऱ्यांना निराधार आणि वृद्धांच्या संवेदना प्रकट करून ही चळवळ लोकाभिमुख केली जाईल अशा भावना व्यक्त केले. समारोप चंपत डाकोरे यांनी केले.यावेळी निराधार आणि वृद्ध बंधू भगिनींनी सभागृह खचाखच भरला होता. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन गौतम भालेराव यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त

### आर्य वैश्य महिलामंडळाच्या वतीने कडूलिंब सालामृत व रस सेवनाचे आयोजन



**हदगाव**-हदगाव येथील आर्य वैश्य महिलामंडळाच्या वतीने व्याधीमुक्त निरामय आरोग्यासाठी जागतिक महिला दिनानिमित्त किशोर बनगिनवार दिग्रस यांचा कडुलिंब सालामृत व रस प्राशनाचा पाच दिवसीय शिबीराचे आयोजन एक एप्रिल ते पाच एप्रिल ला केले आहे. कडुलिंबाच्या झाडाला आयुर्वेदात अत्यंत महत्त्व पाडव्यास नवीन मोहर आलेल्या कडुलिंबाचे औषधीयुक्त गुण अधिक परिणामकारक होत असल्याने संपूर्ण चैत्र महिन्यात अनेक नागरिक कडुलिंबाच्या अंतर सालीच्या रसाचे किंवा पाल्याचे पाण्याचा रसाचे सेवन करतात शरीरातील अनेक व्याधीवर गुणकारी असलेल्या कडुलिंबाच्या आंतरसालीच्या रसाचे सेवन दिग्रस येथील कृषी व्यवसायिक ७७ वर्षीय किशोर बनगिनवार हे मागील ४० वर्षापासून करीत असून त्यांना त्यापासून फायदा म्हणजे ते निरोगी जीवन जगत आहे. त्यांच्या या अनुभवाचा फायदा जास्तीत जास्त नागरिकांना व्हावा या उद्दात हेतुने ते मागील बारा वर्षांपासून या शिबिराचे आयोजन करीत आहेत १एप्रिल ते ५ एप्रिल पर्यंत सतत पाच दिवस हनुमान मंदिर कोर्टाजवळ वेळ सकाळी ६.३० ते ७.३० वाजता कडुलिंबाच्या आंतरजालीच्या साला मृताचे प्राशन शिबीर आयोजित केले आहे . या शिबिराचा लाभ शहरातील सर्व नागरिकांनी घेण्याचे आव्हान आर्य वैश्य महिला मंडळाने केले आहे. कडूलिंब सहलामृत मातृप्रस्थल्याची थोडक्यात माहिती कडुलिंबाची झाडाची अंतर साल काढण्याकरिता ब्रह्म मुहूर्तावर कडूलिंबाच्या झाडाजवळ प्रार्थना करून झाडाला क्षती पोहचनार नाही याची दक्षता घेऊन आंतरसाल काढावी व साल काढलेल्या जागेवर माती व शेनाच्या लिहावे. काढलेल्या सालीच्या वरील कणखर भाग काढून आंतरजालीचे बारीक तुकडे करून खलबत्यात बारीक करावे नंतर त्यात थोडे पाणी घालून तयार झालेल्या लगद्यावर त्या नंतर आवश्यकतेनुसार पाणी टाकून ते मिश्रण खलबत्याने रगडावे आणि पातळ कपड्याने गाळून तयार झालेल्या रसात गारगोटी गरम करून त्याचा चटका त्या रसात द्यावा हा रस दररोज सकाळी उपाशीपोटी एक तास काहीही न खाता हा रस सतत पाच दिवस घेतल्यास रक्त शुद्धी सोबतच त्वचारोग, शुगर चक्कर येणे , शरीरातील अनेक व्याधीवर आराम मिळतो तरी जास्तीत जास्त नागरिकांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन आर्य वैश्य समाज महीला मंडळा कडुन करण्यात आले.

### प्रश्नमंजुषा स्पर्धेस प्रतिसाद



**कुंडलवाडी**-अध्ययन संस्था मुंबई व संस्कृती सवंर्धन मंडळ सगरोळी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २७ मार्च रोजी अध्ययन संपर्क विज्ञान मंडळा ची प्रश्नमंजुषा स्पर्धा परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत कुंडलवाडी पासून जवळच असलेल्या हुनगुंदा येथील सोन्याबाई ठक्करवाड माध्यमिक विद्यालय प्रथम क्रमांक पटकावला आहे. दरवर्षी प्रमाणे यंदाही अध्ययन संस्था मुंबई व संस्कृती सवंर्धन मंडळ सगरोळी यांच्या संयुक्त विद्यमाने ओलंपियाड विज्ञान मंडळा ची प्रश्नमंजुषा स्पर्धा परीक्षा घेण्यात आली. यात तालुक्यातील एकुण सात शाळा सहभागी झाल्या होत्या.सर्वच शाळांतील विद्यार्थ्यांनी अध्ययन संपर्क मासिकाचा अभ्यास करून छान प्रतिसाद दिला. त्यात हुनगुंदा येथील सोन्याबाई ठक्करवाड माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थीनी कु.अंजली विनोद भाले व म्याकलवार प्रशांत मदारी या विद्यार्थ्यांनी एकशे दहा पैकी एकशे पाच गुण घेऊन तालुक्यातुन प्रथम क्रमांक पटकावला असल्याने पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात आले आहे. सोन्याबाई ठक्करवाड माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थीनी कु. अंजली विनोद भाले व म्याकलवार प्रशांत मदारी हे प्रथम आल्याने संस्थेचे अध्यक्ष अॅड. विलासराव कुलकर्णी सर, संस्थेचे सचिव तथा माजी जिल्हा परिषद सदस्य लक्ष्मणराव ठक्करवाड, सहसचिव अरविंद लक्ष्मणराव ठक्करवाड यांच्यासह सर्व संचालक मंडळ व विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.बी.जिंकले,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक व अभिनंदन केले.

# स्वस्वरूप संप्रदायच्या वतीने शोभायात्रेचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. २८ मार्च**



हिंदू नववर्षाचा प्रथम दिवस म्हणजे गुढीपाडवा या निमित्ताने अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज दक्षिणपीठ नाणीजधाम रत्नागिरी यांच्या दिव्य प्रेरणेने स्वस्वरुप संप्रदाय दक्षिण नांदेड जिल्ह्याच्या वतीने देगलूर येथे दि.३० मार्च रोजी भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आली आहे.

राज्यभर हिंदू नववर्ष, चैत्र प्रतिपदा व वसंत ऋतुचा दिवस म्हणजे गुढीपडवा, यशाचा व कीर्तीचा तथा प्रभू रामचंद्र रावणाला पराभूत करुन अयोध्योत आगमन केले. हा विजयाचा दिवस मानला जातो.

भारतीय संस्कृतीचे जतन व वारसा पुढील सांप्रदायासाठी आदर्श राहावा सालाबाद म्हणून संप्रदाय बंधू-भगनी पारंपरिक वेशभूषेत ३० मार्च रोजी स्वरूप संप्रदाय दक्षिण नांदेड जिल्हा समितीच्या वतीने सकाळी ८ वा. देगलूर येथील बंड्याप्पा मठ येथून प्रारंभ होणार असून प्रमुख मार्गाने जात तूकाराम नगर येथे समाप्त होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. या यात्रेत जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज संस्थानाचे जनकल्याणकारी, सामाजिक उपक्रमाची जनजागृती केली जाणार आहे. या नववर्षाच्या शोभायात्रेत देगलूर, मूखेड,बिलोली तालुक्यातील भाविकांनी शोभायात्रेत सहभाग घेत या शुभ दिनाचा, यशाचा, कीर्तीचा व विजयाचा आनंद घ्यावा असे आवाहन नांदेड दक्षिण जिल्हा निरीक्षक बालाजी कोठारे, जिल्हा अध्यक्ष शामभाऊ नागलगावे, मूखेड तालुका अध्यक्ष मारोती ईबितवार यांनी केले आहे.

# साईरुद्राक्ष मठदेवरूची नवोदयसाठी निवड

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. २८ मार्च**



तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तडखेल येथील विद्यार्थी साईरुद्राक्ष चन्नबस मठदेवरू याची केंद्रीय जवाहर नवोदय विद्यालय शंकरनगर येथे प्रवेशाकरिता निवड झाली आहे.

नांदेड जिल्ह्यातील जवाहर नवोदय विद्यालयच्या इयत्ता सहावी वर्गासाठी जानेवारी मध्ये प्रवेश परीक्षा घेण्यात आली होती. त्याचा निकाल नुकताच लागला असून यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तडखेल येथील विद्यार्थी साईरुद्राक्ष चन्नबस मठदेवरु याची निवड झाली आहे. त्याच्या या यशाबद्दल शंकरप्पा मठदेवरू, गंगाधर स्वामी, महालिंग स्वामी, शिवानंद स्वामी,प्रा.सी.एस.मठदेवरू, बस्वराज स्वामी, डॉ. राचप्पा हसगुलकर,शिवप्रसाद स्वामी, डॉ. प्रशांत स्वामी,अमोल मठदेवरू, प्रफुल्ल मठदेवरू, बसवलिंग स्वामी, डॉ. शिवकार्तिक स्वामी, डॉ. एस. शिवपूजिता आदींनी अभिनंदन केले आहे.

# रायुकाँच्या प्रदेश सरचिटणीसपदी राहुल हंबर्डे

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २८ मार्च**



नांदेड दक्षिण मतदार संघातील धडाडीचे युवा कार्यकर्ते राहुल मोहनराव हंबर्डे यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्या या नियुक्तीचे सर्वत्र स्वागत होत आहे.

माजी आमदार मोहनराव हंबर्डे यांचे सुपुत्र राहुल हंबर्डे यांचा शहर व ग्रामीण परिसरात दांडगा जनसंपर्क आहे. पक्षाध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, युवक राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या संघटनवाढीसाठी सुरुवातीपासूनच जोमाने काम सुरू केले आहे. सदस्य नोंदणी अभियानात जिल्ह्याचा अहवाल क्रमांक यावा यासाठी त्यांची धडपड सुरू आहे. या भागातील जिल्हा परिषद सर्कलमध्ये त्यांच्या कार्यकर्त्यांची मोठी फौज आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या शिफारशीवरून राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी त्यांची ही नियुक्ती केली आहे. आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते त्यांना नुकतेच नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले, यावेळी माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, माजी आमदार मोहनराव हंबर्डे, अविनाश राव घाटे, जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, बाळासाहेब रावणगावकर, जीवन घोगरे, वसंत सुगावे, मोहसीन खान पठाण, श्रीधर नागपूरकर, बालाजी शिंदे, माधव चिंचाळे, प्रसाद पवार, शिवा डांगे, गणेश येरकले प्रदीप देमगुंडे आदीची उपस्थिती होती.या नियुक्तीबद्दल राहुल हंबर्डे यांनी पक्षश्रेष्ठींचे आभार मानले. त्यांच्या या नियुक्तीबद्दल नांदेड दक्षिण मतदार संघातील माजी नगरसेवक, माजी जिल्हा परिषद सदस्य, माजी पंचायत समिती सदस्य, सरपंच, उपसरपंच, पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# वन्य प्राण्यांसाठी वन विभागाकडून पानवठ्याची सोय!



**तभा वृतसेवा**
**हाणेगाव, दि. २८ मार्च**

देगलूर वन परिक्षेत्रात येणाऱ्या मौजे मानूर, भूतन हिप्परगा, बेंबरा, परिसरात आढळणारी वन्य प्राणी मोर, हरिण, नीलगाय, कोल्हा, सायाळ, रानडुक्कर, काळवीट यांच्यासह अनेक प्रजातींच्या पक्षांचे वास्तव्य असून परिसरात पाण्याअभावी गेल्या अनेक महीण्यापासून पाण्यासाठी भटकंती करत असल्याने पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून नांदेड जिल्ह्याचे उपवनसंरक्षक केशव वाबळे, भीमसिंह ठाकूर, देगलूर वनपरिक्षेत्र अधिकारी निखिल हिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली परिसरात गुरुवार दि. २७ रोजी कृत्रिम पानवटा निर्माण करून टँकरद्वारे पाण्याची सोय करण्यात आली आहे. सदरील पानवटा निर्माण करण्याकरिता वनपाल शंकर गेडाम, वनरक्षक कदम, वनमजूर राठोड यांचे प्रयत्न लागले आहे.

# गुढीपाडवा, रमजान ईद, रामनवमी सणाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना पायाभूत सुविधा द्या

## युवानेते व्यंकट नेम्मानिवार यांची मागणी

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २८ मार्च**



गुढीपाडवा सण,मुस्लिम बांधवांचा रमजान व त्यानंतर येणाऱ्या रामनवमी सणाच्या पार्श्वभूमीवर किनवट नगरपालिकेने शहरातील पथदिवे,नालेसफाई तसेच रस्ता सुधारण्याची कामे त्वरित हाती घ्यावीत अशी मागणी भाजपाचे युवानेते,किनवट नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष व्यंकट नेमानीवार यांनी केली आहे.


गुढीपाडवा या दिवसापासून हिंदू धर्मियांच्या नवीन वर्षाला प्रारंभ होतो. ३० मार्च रोजी गुढीपाडवा असून किनवट शहरात ठीक ठिकाणी हा सण विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाने उत्साहात साजरा केला जाणार आहे तर ३१ मार्च रोजी मुस्लिम बांधवांचा रमजान ईद हा सर्वात मोठा सण आहे.त्यानंतर ६ एप्रिल रोजी रोजी रामनवमी हा सण साजरा केला जाणार आहे. या पार्श्वभूमीवर नगरपालिका प्रशासनाने पायाभूत सुविधांची कामे हाती घेण्याची आवश्यकता आहे. शहरातील मुख्य मार्गावरील तसेच अनेक प्रभागातील बहुतांश पथदिवे बंद असून ते पूर्ववत सुरू करावेत. रामनवमीच्या रथयात्रेत नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी मिरवणूक निघणाऱ्या प्रमुख मार्गांची दुरुस्ती करावी तसेच नालेसफाई व स्वच्छतेची कामे हाती घ्यावीत अशी मागणी भाजपाचे युवानेते, माजी उपनगराध्यक्ष व्यंकट नेम्मानीवार यांनी केली आहे.



**नांदेड-आर्य वैश्य मंगल कार्यालय मुखेड येथे गुढीपाडवा व रमजान ईद व रामनवमी व महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती सण उत्सवानिमित्त आमदार डॉ .तुषार राठोड साहेब यांच्या अध्यक्षखाली शांतता समितीची बैठक पार पडली. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत गोसावी, तहसीलदार राजेश जाधव, पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे , लक्ष्मणराव पाटील, खुशालराव पाटील, अशोकराव गजलवाड, बालाजी पाटील आदी उपस्थित होते.**

# तामसा भागात गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना राबविण्याची गरज

**महेश मठपती**
**तामसा, दि. २८ मार्च**



तामसा भागातील तलाव गाळात रुतल्यामुळे सिंचनक्षेत्र कमालीचे घटले आहे. जिल्हा प्रशासनाने तामसा भागात राज्य शासनाकडून राबविण्याल्या जाणारी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही महत्वकांक्षी योजना राबविण्याची गरज निर्माण झाली आहे.

तामसा भागात साधारणतः नऊ सिंचन तलाव आहेत. तलावाच्या निर्मितीपासून त्या तलावातील गाळ काढण्यात आला नसल्याने सर्वच तलाव गळात रुतले आहेत. गाळामुळे तलावाची पाणी साठवण क्षमता घटली आहे. अर्थातच भिजवण क्षेत्र देखील कमालीचे घटले आहे. केदारगुडा तलावावर २ हजार हेक्टर जमीन भिजवण्याची क्षमता होती. तलाव गाळात रुतल्याने सध्या केवळ ७०० ते ८०० हेक्टर एवढेच क्षेत्र पाण्याखाली आहे. पिंपराळा तलावासह ईतर तलावाची देखील परिस्थिती यापेक्षा वेगळी नाही. चांगला पाऊस पडला आणि तलाव भरले तरच शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील गहू, हरभरा, उन्हाळी ज्वारी ही पिके घेता येतात. अन्यथा खरीप हंगामातील एकाच पिकावर समाधान मानावे लागते. परिणामी या भागातील शेतकरी सदानकदा आर्थिकदृष्ट्या दुर्बल असतो. बारमाही सिंचन व्यवस्थेसाठी लोकप्रतिनिधींची उदासीनता शेतकऱ्याच्या मुळावर आहे. राज्य शासनाने नुकतीच गाळमुक्त धरण व गाळयुक्त शेती ही महत्वकांक्षी योजना राबविण्याचे ठरविले आहे. जिल्हा प्रशासनाकडून तलावातील गाळ काढून गाळमुक्त धरण करुन निघालेला गाळ शेतात टाकून गाळयुक्त शेती केली जात आहे. त्याशिवाय नद्या नाला सरळीकरणाची कामे मोठ्या प्रमाणात केली जात आहेत. जिल्हाभरात ही योजना शक्तीने राबवल्या जात आहे. परंतु हदगाव तालुक्यात या योजनेबद्दल प्रशासनाकडून किंवा लोकप्रतिनिधीकडून कुठची वाच्यता केली जात नसल्याने या योजनेपासून हदगाव तालुका वंचित राहणार का? अशी शेतकऱ्यांना धास्ती वाटत आहे. जिल्हा प्रशासनाने गाळमुक्त धरण व गाळयुक्त शेती ही योजना हदगाव तालुक्यात राबवून गळात रुचलेले सगळेच तलाव गाळमुक्त करावेत, नदीनाल्यांचे सरळीकरण करण्यासाठी जिल्हा प्रशासनानेच पुढारकार घ्यावा. अशी मागणी शेतकऱ्यातून पुढे आली आहे.

# आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबातील विद्यार्थीनीस वेदांत संगणक प्रशिक्षण केंद्रात नि:शुल्क प्रवेश

**तभा वृतसेवा**
**अर्धापूर, दि. २८ मार्च**



तालुक्यातील आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांनीस शहरातील वेदांत संगणक प्रशिक्षण केंद्राचे संचालक संदीप धांडे पाटील यांनी सामाजिक बांधिलकी जपत नि:शुल्क प्रवेश दिला आहे,या प्रवेशामुळे नांदला दिग्रस येथील दुर्गा क्षिरसागरचा संगणक प्रशिक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे.

पुण्यातील शंकरराव भोई प्रतिष्ठानच्या वतीने नांदेड जिल्ह्यातील आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी पुण्यजागर प्रकल्प राबवण्यात येत आहे.या प्रकल्पातील विद्यार्थीनी दहावीची परीक्षा देऊन गावी परत आल्या आहेत.या उन्हाळ्याच्या सुट्टीत एम एस सिआयटी हा संगणक प्रशिक्षण शिक्षणक्रम करण्याचा निर्णय घेतला होता.पण या शिक्षणक्रमसाठी लागणारे शुल्क क्षिरसागर कुटुंबाला परवडणारे नव्हते.ह्या शिक्षणक्रम करण्यासाठी त्यांनी भोई प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ मिलिंद भोई व पुण्यजगार प्रकल्पाचे जिल्हा समन्वयक लक्ष्मीकांत मुळे, सामाजिक कार्यकर्ते दत्ता पाटील नवले, गुणवंत विरकर यांच्याशी संपर्क केला. वेदांत संगणक प्रशिक्षण केंद्राचे संचालक संदीप धांडे पाटील यांचीही संपर्क करुन शेतकरी कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बद्दल व पुण्यजागर प्रकल्पाची माहिती समन्वयक लक्ष्मीकांत मुळे यांनी दिली. तेव्हा संदीप धांडे पाटील यांनी सामाजिक बांधिलकी जपत अल्प शुल्कात प्रवेश दिला. या सहकार्यामुळे दुर्गा ज्ञानेश्वर क्षिरसागर हीचे संगणक प्रशिक्षणाचे स्वप्न साकार होणार आहे.

आत्महत्या केली शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी जो पुण्यजागर प्रकल्प राबवण्यात येत आहे आहे. हा एक स्तुत्य उपक्रम असून या शैक्षणिक उपक्रमांत सहभागी होण्याची संधी मला मिळाली आहे. यापुढेही आशा कुटुंबातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करण्यात येईल अशा भावना संदीप धांडे यांनी व्यक्त केल्या.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## लातूरच्या तरुणाचे अवयदान, सहा जणांचे आयुष्य फुलले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मार्च -** दुचाकी अपघातात ब्रेनडेड झालेल्या लातूर येथील भावेष संतोष तिवारी (वय २० रा. बालाजी मंदिराजवळ, हमाल गल्ली, लातूर) या तरूणाचे गुरुवारी हैद्राबाद येथील खाजगी रुग्णालयात २७ मार्च रोजी अवयवदान करण्यात आले.

आई-वडिलांनी संमती दिल्यावर भावेषच्या दोन्ही किडनी, लिव्हर, हार्ट, डोळे दान करण्यात आले आहेत. त्यामुळे ज्याद्वारे सहा जणांचे आयुष्य फुलले आहे.

रंगपंचमीच्या दिवशी (१९ मार्च) सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास औसा रोडवरील वासनगाव येथील राधास्वामी सत्संग मंडळाचा सत्संग होता. त्यासाठी भावेश संतोष तिवारी (वय २० रा. हमाल गल्ली, लातूर) हा आईसोबत दुचाकीवर निघाला होता.

वासनगाव पाटी येथे दुचाकीला समोरून भरधाव आलेल्या मोटारसायकलची धडक बसली. यात भातेष गंभीर जखमी झाला तर आई अरूणा तिवारी यांनाही मार लागला होता. त्यानंतर त्यांना लातुरातील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

भावेषच्या मेंदूला मार लागल्याने त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. मात्र, तीन दिवसांनंतरही प्रकृतीत सुधारणा होत नसल्याने रुग्णास इतरत्र हलविण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला. तद्नंतर भावेषला हैदराबाद येथील यशोदा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथील डॉक्टरांनी रुग्णास वाचविण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. मात्र, तिसऱ्या दिवशी ब्रेनडेड झाल्याचे डॉक्टरांनी कुटुंबीयांना सांगितले. डॉक्टरांनी भावेश ब्रेनडेड झाल्याचे सांगीतल्यावर तिवारी कुटूंबावर आभाळ कोसळले. याही परिस्थीती स्वत:ला सावरून भावेशच्या आई वडीलांनी मुलाचे अवयवदान करण्याचा निर्णय घेतला.



### संक्षिप्त वृत्त...

## रमजान ईद निमित्त ३१ मार्च रोजी जिल्ह्यात मद्यविक्री बंद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मार्च -** जिल्ह्यात ३१ मार्च, २०२५ रोजी (एक दिवस पुढे मागे चंद्र दर्शनानुसार) मुस्लिम बांधवातर्फे रमजान ईद साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्त लातूर जिल्ह्यातील सर्व किरकोळ अबकारी मद्यविक्री अनुज्ञप्त्या बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिले आहेत. मुंबई मद्य निषेध कायदा १९४९ चे कलम १४२ नुसार तसेच नमुद कायद्यांतर्गत केलेल्या विविध नियमानुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन हे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

या आदेशाची सर्व किरकोळ मद्यविक्री अबकारी अनज्ञप्तीधारकांनी पालन करावे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या अबकारी मद्यविक्री अनुज्ञप्तीधारक यांच्या विरुध्द मुंबई दारुबंदी कायदा १९४९ व अनुषंगिक नियमांच्या आधारे कडक कारवाई करण्यात येईल, असे राज्य उत्पादन शुल्क विभागाने कळविले आहे.

## महावाचन उत्सवातील ९९ विजेत्यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मार्च -** जिल्हा परिषदेच्या समग्र शिक्षाच्या वतीने महावाचन विद्यार्थी लेखन स्पर्धेतील ९९ विजेत्यांचा सन्मानपत्र देऊन सन्मान केला. भारत स्काऊट गाईडच्या जिल्हा कार्यालय सभागृहात शिक्षणाधिकारी (प्रा.) वंदना फुटाणे, उपशिक्षणाधिकारी (प्रा.) प्रमोद पवार यांच्या हस्ते हा कार्यक्रम पार पडला. यावेळी उत्सवाचे प्रमुख विवेक सौताडेकर, समन्वयक दत्तात्रय माळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

सर्व माध्यमांच्या शाळांत महावाचन उत्सव गतवर्षीपासून सुरू झाला. यंदा लातूर जिल्ह्यातील सर्व माध्यमांच्या शाळांनी उत्सवात सहभाग नोंदवला. शाळास्तरावर विद्यार्थी लेखन स्पर्धा आयोजिली. लेखन स्पर्धा ३री, ५वी, ६वी ते ८वी, ९वी ते १२वी अशा तीन टप्प्यांत झाली. प्रत्येक शाळेतून सर्व गटांतून ३ विजेते तालुक्यावर पाठवली. तालुक्याहून प्रत्येक गटातून ३ याप्रमाणे विजेत्यांची नावे जिल्ह्यास पाठवली. तालुक्यातून सर्व गटांचे ९ विद्यार्थीप्रमाणे दहा तालुक्यांचे ९० विद्यार्थी अशा एकूण ९९ विद्यार्थ्यांचा सन्मान केला. फुटाणे, पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक विवेक सौताडेकर यांनी केले तर आभार दत्तात्रय माळकर यांनी मानले.

## काशी विश्वेश्वर मंदिरात विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वितरण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मार्च -** श्री जगद्गुरु विश्वाराध्य जनकल्याण प्रतिष्ठान व श्री काशी विश्वेश्वर मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने गरीब, गरजू व होतकरु विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रतिवर्षी शिष्यवृत्तीच्या रुपाने मदतीचा हात दिला जातो. यंदाही काशी विश्वेश्वर मंदिरात २५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वितरण करुन मदतीचा हात देण्यात आला. अध्यक्षस्थानी शांतवीरलिंग शिवाचार्य महाराज होते. यावेळी डॉ. दीपक गुगळे दाम्पत्य, मंदिराचे विश्वस्त बसवंत भरडे, ॲड. गंगाधर हामणे, भालचंद्र मानकरी उपस्थित होते. यावेळी २५ होतकरु व गरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्तीच्या रुपाने मदतीचे वितरण करण्यात आले.

## आरटीईचे ४३५ प्रवेश पडताळणीच्या प्रतिक्षेत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मार्च -** आरटीई अंतर्गत मोफत प्रवेशाची प्रक्रिया प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांसाठी २४ मार्चपर्यंत होती. परंतु, सध्या ६१३ प्रवेश असल्याने प्राथमिक शिक्षण विभाग कागदपत्रांची पडताळणी करीत आहे. ४३५ पालक कागदपत्र पडताळणीनिमित्त शिक्षक विभागाशी येऊन भेटले. मात्र, ७२ पालक अजून संपर्कात आलेले नाहीत. प्राथमिक शिक्षण विभागाने प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांच्या पालकांना भ्रमणध्वनीद्वारे मेसेज पाठवून प्रवेश घेण्यासंबंधी कळविले आहे. ६१३ पैकी फक्त ४३५ पालकच शिक्षण विभागाशी संपर्कात आले असून, ते कागदपत्र पडताळणी करण्यासाठी शिक्षण विभागात येत आहेत.

# पालिकेचा १७ लाखांचा शिलकी अर्थसंकल्प सादर

## कोणतीही करवाढ नाही; ५० ई-बसेस धावणार



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मार्च -** महानगरपालिकेचे २०२५-२०२६ या वर्षासाठीचे कोणतीही करवाढ नसलेले १७ लाखांचे शिलकी अंदाजपत्र आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी गुरुवारी (दि. २७) सादर केले. या अर्थसंकल्पात एकूण अपेक्षीत जमा १०६४.०७ कोटी तर खर्च १०६३.९० कोटी रुपये दर्शवण्यात आला आहे.

गुरुवारी (दि. २७) महानगरपालिकेच्या यशवंतराव सभागृहात आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी आगामी वर्षाचा अर्थसंकल्प सादर केला. प्रारंभी मुख्य लेखाधिकारी रावसाहेब कोलगणे यांनी अर्थसंकल्प पुस्तिकेचे प्रकाशन करून वाचन केले. मंचावर अतिरिक्त आयुक्त देवीदास जाधव, उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, मुख्य लेखा परीक्षक कांचन तावडे उपस्थित होते.

यावेळी आयुक्त मनोहरे म्हणाले, यापुढे बेकायदा बांधकामे सहन करणार नाही. अशा बांधकामांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे. नळाला पिवळे पाणी येत होते. त्यावर उपाययोजना करण्यात आली आहे. पंधरा दिवसांत जनसंवाद कक्ष सुरू करण्यात येईल. पर्यावरणावर उपाय म्हणून झाडे लावणे, धुळीचे कण कमी करण्यात येतील. आगामी वर्षासाठी महापालिकेला ५० ई-बसेस मंजूर झाल्या असून त्या शहरात लवकरच धावतील. ई-ऑफिस प्रणाली सुरू करण्यात येणार आहे. महापालिकेच्या श्री शिव छत्रपती ग्रंथालयाची भव्य इमारत बांधण्यात येईल. अमृत-२ ची कामे वेगाने सुरू करण्यात येणार आहेत. ड्रेनेजचे जिथे चुकीच्या पध्दतीने काम झाले आहे, अशापैकी नमुना म्हणून एक-दोन ठिकाणच्या कामाचे परीक्षण करू, अशी हमी यावेळी आयुक्त मनोहरे यांनी दिली. शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासोबतच शिक्षण, आरोग्य, पाणी यासारख्या मूलभूत गरजा पुरविण्यास प्राधान्य दिले जाणार असल्याची माहिती आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी दिली.

### पिवळ्या पाण्यावर उपाय

महापालिकेच्यावतीने शहरातील नागरिकांना नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो. सद्यस्थितीत शहराला पाणीपुरवठा होणाऱ्या धरणात ४८ टक्के जीवंत पाणीसाठी आहे. त्यामुळे पाणीटंचाईची काळजी करू नये. गेल्या काही दिवसांपासून शहरातील अनेक भागात नळाला पिवळे पाणी आले. पिवळ्या पाण्यामुळे पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक काही प्रमाणात कोलमडले होते. नळाला येणाऱ्या पिवळ्या पाण्यावर उपाय करण्यात आला असून यापुढे शहरवासीयांना आठवड्यातून दोनवेळा पाणीपुरवठा करण्यात येणार असल्याचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी सांगितले.

### बस प्रवासासाठी स्मार्ट कार्ड बंधनकारक

गेल्या तीन वर्षांपासून महापालिकेच्यावतीने महिलांसाठी मोफत शहर बस प्रवास सुरू करण्यात आला आहे. महिलांसाठी मोफत बस प्रवास सुरू करणारी लातूर ही राज्यातील पहिलीच महापालिका आहे. शहर बसमधून महिलांना मोफत बस प्रवास परवडत नसला तरी पुढील आर्थिक वर्षात ती सुरूच राहणार असून १ एप्रिलपासून अशा बसमधून प्रवास करणाऱ्या महिलांना स्मार्ट कार्ड बंधनकारक असणार आहे, असे यावेळी आयुक्तांनी सांगितले.

### डॉ. आंबेडकरांचा ७५ फूट उंच पुतळा उभारणार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७५ फूट उंच पुतळ्याचे बांधकाम कला संचालनालयाची परवानगी मिळाल्यानंतर सुरू करण्यात येईल. विवेकानंद चौक येथे अद्ययावत अशी अग्निशामक दलाची शाखा सुरू करणे, भाजीपाला विक्रीसाठी आठवडी बाजार संकल्पना राबविण्यात येईल, असे यावेळी आयुक्त मनोहरे यांनी सांगितले.

## संस्कारक्षम पिढी निर्माण झाली पाहिजे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मार्च -** येथील श्री बालक मंदिर , प्राथमिक, श्री माध्यमिक विद्यालय व शामराव पाटील कनिष्ठ. महाविद्यालयाचा 'श्री संकुल कला महोत्सव संस्कृतीचा' कार्यक्रमाचा उद्घाटन सोहळा प्रा .डॉ . दिलीप गुंजरगे, प्राचार्य प्रशांत घार, मुख्याधापिका मनिषा शिंदे, सरस्वती शिंदे, घाटके व्ही. आर., प्राचार्य कुलकर्णी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला .

या प्रसंगी प्राचार्य प्रशांत घार म्हणाले, स्नेह संमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या उपजत गुणांना वाव मिळतो . अध्ययना सोबत कला, क्रिडा क्षेत्रात करिअर संधी असुन श्री संकुलातील विद्यार्थी ग्रामिण भागातील असुन प्रचंड श्रम करण्याची क्षमता त्यांच्या मध्ये असते . क्षमता सोबत आत्मविश्वास असेल तर जगात विद्यार्थ्यांसाठी अशक्य कांहीच नाही. पालकांचा आपल्या मुलासोबत संवाद कमी होत आहे ही खंत त्यांनी व्यक्त केली. श्री संकुल विद्यार्थ्यां मध्ये ज्ञान, तंत्रज्ञान व कौशल्या सोबत मूल्य संस्कारात रूजवत आहे, आजची संस्कारक्षम पिढीच उद्याचा सशक्त भारत घडवणार आहे असे विचार व्यक्त केले.

डॉ. गुंजरगे यांनी अध्यक्षीय समारोपात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. मनिषा शिंदे यांनी केले. सुत्रसंचलन विशाल गायकवाड व किरण जगताप यांनी तर आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख एस .डी. मोरे यांनी मानले.

## पलिंकाबाई गव्हाणे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मार्च -** रेणापूर तालुक्यातील पळशी येथील



पलिंकाबाई सत्यवान गव्हाणे (वय ७२ वर्षे)यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना-नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर पळशी येथील स्मशानभूमित मंगळवारी अंत्यसंस्कार करण्यात आले.

## दंत वैद्यकीय संशोधनासाठी ई - स्वरूपातील माहिती उपयुक्त



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मार्च -** सध्याची बदलती जीवनशैली आणि दंत रोगांमधील गुंतागुंत पाहता या विषयात नवनवीन संशोधने होणे गरजेचे आहे. दंत वैद्यकीय शाखेतील संशोधनासाठी ई - स्वरुपातील माहिती उपयुक्त असून ऑनलाईन स्वरुपातील उपलब्ध माहिती विद्यार्थी व संशोधकांनी अभ्यासावी, असे प्रतिपादन इल्सविएर प्रकाशनाचे प्रतिनिधी डॉ. विशाल नागदेव यांनी केले.

एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग व इल्सविएर प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने प्राध्यापक व विद्यार्थ्यांसाठी 'ई - संसाधने शोध आणि जतन' या विषयावरील एक दिवशीय कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. विशाल नागदेव हे बोलत होते. यावेळी उप प्राचार्य डॉ. यतीशकुमार जोशी, ग्रंथालय विभाग प्रमुख ज्ञानोबा केंद्रे हे उपस्थित होते.

दंत वैद्यकीय शाखेत सध्या स्थितीत उपलब्ध असलेल्या विविध विषयावरील ई - बुक्स, जर्नल्स, क्लीनिकल ओव्हरयुज, क्लिनिकल ट्रायल्स, ड्रग्स मोनोग्राफ, क्लीनिकल कॅल्क्युलेटर, क्लीनिकल फोकस, मल्टीमीडिया, प्रोसिजर व्हिडिओज ही ई - साधने इंटरनेटवर मोठ्या स्वरूपात उपलब्ध आहेत. या उपलब्ध संसाधनांचा शोध आणि जतन करुन योग्य व्यवस्थापन करुन त्याचा संशोधनासाठी उपयोग करावा, असे सांगून यावेळी पुढे बोलताना डॉ. विशाल नागदेव म्हणाले की, दंत शाखेतील जगभरातील उपलब्ध माहिती मिळविण्यासाठी इंटरनेटचे दालन उघडे आहे.

सध्या स्थितीत डिजिटलायझेशनच्या जमान्यात मुद्रित स्वरूपात माहिती उपलब्ध होण्यामध्ये मर्यादा येत आहेत.

त्यामुळे आपल्याकडील उपलब्ध डिजिटल उपकरणांचा वापर अभ्यासासाठी व संशोधनासाठी करणे गरजेचे आहे. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.

## उत्कृष्ट ग्रंथ वाचक स्पर्धेत चिंचोलकर प्रथम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मार्च -** येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालय ग्रंथालय विभाग आयोजित उत्कृष्ट ग्रंथ वाचक व उत्कृष्ट ग्रंथ परीक्षण स्पर्धेचे निकाल नुकतेच जाहीर झाले. उत्कृष्ट ग्रंथ वाचक स्पर्धेत करण चिंचोलकर तर उत्कृष्ट ग्रंथ परीक्षण स्पर्धेत राजनंदिनी अरसुडे हिने सलग दुसऱ्याही वर्षी प्रथम क्रमांक पटकावला.

या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन 'उत्कर्ष'च्या समारोपप्रसंगी झाला. 'उत्कृष्ट ग्रंथ वाचक' या स्पर्धेत बी. कॉम द्वितीय वर्गात शिकत असलेल्या करण चिंचोलकर याने वर्षभरामध्ये एकूण



५६ पुस्तके वाचून प्रथम क्रमांक पटकावला. बी. कॉम तृतीय वर्गातील वैशाली गिरी हिने ४८ पुस्तके वाचून द्वितीय, बी. कॉम द्वितीय वर्गातील सरस्वती पाटील हिने ४२ ग्रंथांचे वाचन करून तृतीय क्रमांक पटकावला तर श्रध्दा सहालुगुडे व ऐश्वर्या कासार यांनी ३५ ग्रंथांचे वाचन करून उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त केले.

'उत्कृष्ट ग्रंथ परीक्षण' या स्पर्धेत राजनंदिनी ज्ञानेश्वर अरसुडे हिने लिहिलेल्या 'पैश्याची गोष्ट' या ग्रंथाच्या परीक्षणास प्रथम क्रमांक मिळाला. श्रेया मनोहर शेळके हिने लिहिलेल्या 'रिच डॅड पुअर डॅड' या ग्रंथाच्या परीक्षणास द्वितीय, पूजा भराटे हिने लिहिलेल्या 'श्यामची आई' या ग्रंथाच्या परीक्षणास तृतीय क्रमांक मिळाला. गौतमी गोरे हिने लिहिलेल्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' व समृध्दी काळे हिने लिहिलेल्या 'हीयर देअर अँड एवेरी व्हेर' या ग्रंथाच्या परीक्षणास उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले. यावेळी ॲड. शैलेश गोजमगुंडे, प्र. प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, डॉ. बाळासाहेब चव्हाण, डॉ. मनीषा आष्टेकर आदींच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना रोख रक्कम, प्रमाणपत्र, मधुप वार्षिकांक व पेन भेट स्वरूपात देऊन गौरविण्यात आले.

## जिल्हाधिकाऱ्यांनी केली कार्यालयांची पाहणी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मार्च -** जुने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमधील विविध शासकीय कार्यालयांना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी भेट दिली. शासनाच्या शंभर दिवसीय सात कलमी कृती कार्यक्रमांतर्गत करण्यात येत असलेल्या कामकाजाची त्यांनी पाहणी केली. तसेच या इमारतीमधील प्रशासकीय विभाग प्रमुखांची त्यांनी बैठक घेतली.

जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. उज्ज्वला पाटील, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी रमेश जाधव, राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक केशव राऊत, आत्माचे प्रकल्प संचालक शिवसांब लाडके, जिल्हा जलसंधारण अधिकारी अनिल कांबळे यांच्यासह अन्न औषध प्रशासन, सहकार संस्थेचे सहनिबंधक, उपनिबंधक यावेळी उपस्थित होते.

मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमध्ये असलेल्या सर्व शासकीय कार्यालयांमध्ये व परिसरात स्वच्छतेला प्राधान्य द्यावे. तसेच कार्यालयातील अभिलेखांचे योग्य प्रकारे वर्गीकरण करावे. कार्यालयामध्ये येणाऱ्या अभ्यागतांसाठी स्वतंत्र कक्ष, पिण्याचे पाणी उपलब्ध करावे. दर्शनी भागात विभागाशी संबंधित योजनांची माहिती लावावी. प्रत्येक कर्मचारी यांचे नाव, त्यांच्याकडे सोपविलेल्या जबाबदाऱ्यांची माहिती दर्शनी भागात लावावी, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले.

जिल्हा कोषागार कार्यालय, राज्य उत्पादन शुल्क विभाग, सिटी सर्व्हे कार्यालय, जिल्हा जलसंधारण अधिकारी कार्यालय, कृषि विभाग, विभागीय माहिती कार्यालय, आत्मा कार्यालय, जिल्हा दुग्धविकास अधिकारी कार्यालय आदी कार्यालयांना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर घुगे यांनी यावेळी भेटी दिल्या. तसेच इमारतीच्या परिसराची पाहणी करून सार्वजनिक बांधकाम विभाग, महानगरपालिका यांना स्वच्छतेबाबत सूचना दिल्या.

## न्यायालय परिसरात झाडांना येळणी बांधून पक्षासाठी केली पाण्याची सोय

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मार्च -** प्रभुराज प्रतिष्ठान व लातूर जिल्हा वकील मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा न्यायलंय परिसरात झाडांना येळणी बांधून पक्ष्याना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली आहे.

कडाक्याच्या उन्हात पक्ष्याची पिण्याच्या पाण्यासाठी हेळसांड व भटकंती होऊ नये या करिता एक सामाजिक बांधिलकी जपून पक्ष्यासाठी पाण्याची सोय करण्यात आली. तसेच सध्या पाणी टंचाई भासू नये याकरिता पाणी जपून वापरा आणि पाणी आडवा पाणी जिरवा या संदेशाने पाणीचे जतन करून उन्हाळ्यात पाणी पिण्यासाठी कमी पडणार नाही या करिता जन तेने पाण्याचे अपव्यय व गैरवापर वापर टाळण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

निसर्गाने पाण्याचे निर्माण केले असल्याने त्याचे वापर काटकरीने करूया.. थेंब थेंब पाणी वाचवा आणि संपूर्ण सजीव सृष्टी वाचवा



ही जावाबदारी पूर्ण करण्यासाठी सर्व नागरिकांनी प्रयत्न करावेत असे ही आवाहन यावेळी करण्यात आले.

यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही.व्ही. पाटील, जिल्हा न्यायाधीश (१) आर. बी. रोटे, प्रभुराज प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. अजय कलशेटे, जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ॲड. शरद इंगळे, उपाध्यक्ष ॲड.आनंद खांडेकर, सचिव प्रदिपसिंग गंगने, नरेश कुलकर्णी, रोहित सोमवंशी, सचिव ॲड. रोहित सोमवंशी, जिल्हा सरकारी वकील संतोष देशपांडे, प्रबंधक बी.के. राऊत, ॲड. सुरेश सलगरे, ॲड.कल्पना भुरे, ॲड. किरण चिंते, ॲड.वसुदा देशपांडे, ॲड. मोहिनी रामपूर, ॲड. वैशाली निलेगावकर, महिला उपाध्यक्ष मनिषा दिवेपाटील, महिला सहसचिव तृप्ती इटकरी, ॲड. गुरुप्रसाद येरटे, ॲड.शिरीष दहिवाल, ॲड. योगेश जगताप, ॲड. विजयकुमार चिखलीकर, ॲड. जाभूवंतराव सोनकवडे, नामदेव काकडे, ॲड.गुरुप्रसाद संदीकर, ॲड. विजयकुमार खानापुरे, सादिक शेख, ॲड. वैभव बिराजदार आदी उपस्थित होते.